




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# विधानपरिषदेच्या 17 जागांसाठी लढत



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी अखेर आज उमेदवारी अर्ज भरण्यात आले असून महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच थेट लढत होणार आहे. मात्र, जवळपास सर्वच मतदारसंघात काही नेत्यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी केली, तर काहींनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने एकाच जागेसाठी अनेक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मात्र, प्रमुख लढत ही महायुतीचे उमेदवार विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार यांच्यातच होणार आहे. सोलापूर ते संभाजीनगर आणि जळगाव ते नागपूरपर्यंत एकूण १७ मतदारसंघातील उमेदवारांची नावे आता समोर आली असून कोणत्या मतदारसंघात (पान २ वर)

### • राज्यातील 17 मतदारसंघातील प्रमुख लढती •

१. **सोलापूर :** काँग्रेस मविआचे आदित्य फत्तेपूरकर V/s भाजप महायुतीचे राजेंद्र राउत
२. **अहिल्यानगर :** काँग्रेस मविआचे करण ससाणे V/s भाजप महायुतीचे प्राजक्त तनपुरे
३. **ठाणे :** राष्ट्रवादी काँग्रेस मविआचे अभिजीत पवार V/s शिवसेना महायुतीचे रविंद्र फाटक
४. **जळगाव :** शिवसेना ठाकरे मविआचे शरद तायडे V/s भाजप महायुतीचे नंदकिशोर महाजन
५. **सांगली-सातारा :** राष्ट्रवादी मविआचे बाळासाहेब पाटील/अभयसिंह जगताप विरुद्ध भाजप धैर्यशील माने
६. **नांदेड :** काँग्रेस मविआचे रामदास पाटील V/s भाजप महायुतीचे अमर राजूरकर
७. **यवतमाळ :** काँग्रेस मविआचे साहेबराव कांबळे V/s शिवसेना महायुतीचे दुष्यंत चतुर्वेदी
८. **पुणे : राष्ट्रवादी** काँग्रेस मविआचे श्रीकांत पाटील V/sराष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे विक्रम काकडे
९. **भंडारा-गोंदिया :** काँग्रेस मविआचे दिलीप बनसोड V/sभाजप महायुतीचे अविनाश ब्राह्मणकर
१०. **रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग :** शिवसेना ठाकरे गट V/s राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे अनिकेत तटकरे
११. **नाशिक :** मविआचा उमेदवार नाही, अपक्ष V/s शिवसेना महायुतीचे नरेंद्र दराडे
१२. **वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली :** काँग्रेस मविआचे शैलेश अग्रवाल V/s भाजप महायुतीचे अरुण लखानी
१३. **अमरावती :** काँग्रेस मविआचे हर्षदीप देशमुख V/s भाजप महायुतीचे प्रवीण पोटे
१४. **धाराशिव-लातूर-बीड :** काँग्रेस मविआचेचे महेश देशमुख V/s भाजप महायुतीचे बसवराज पाटील
१५. **परभणी-हिंगोली :** शिवसेना मविआचे डॉ. विवेक नावंदर V/s शिवसेना महायुतीच सईद खान
१६. **छत्रपती संभाजीनगर-जालना :** शिवसेना ठाकरे गट V/s भाजप किंवा शिवसेना
१७. **नागपूर (पोटनिवडणूक) :** काँग्रेस मविआचे अतुल लोंढे V/s भाजप महायुतीचे डॉ. राजीव पोतदार

## भारतात राहण्याची मला लाज वाटते



**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी आणि कल्याण बॅनर्जी यांच्यावरील हल्ल्यांच्या घटनांनंतर राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी अशा देशात राहण्याची लाज वाटते असे वक्तव्य केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. सोनारपूर येथे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर काही लोकांनी दगड आणि अंडी फेकली, तसेच त्यांना शिवीगाळही केली होती. या घटनेच्या दुस-याच दिवशी हुगळी जिल्ह्यात पक्षाचे (पान २ वर)

## अभिषेक, कल्याण बॅनर्जी हल्ला प्रकरणात 6 जणांना अटक



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये अभिषेक बॅनर्जी यांच्यावर झालेले हल्ल्याचे प्रकरण ताजे असतानाच कल्याण बॅनर्जी यांच्यावरही हल्ला झाला. या घटनेनंतर तृणमूल काँग्रेस आणि भाजपा आमनेसामने आले आहेत. दोन्ही राजकीय पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत, तर दुसरीकडे पोलीस (पान २ वर)

## एलपीजी सिलेंडरमध्ये 42 रुपयांची वाढ



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट आणि मोठा फटका आता भारताला बसू लागला आहे. या जागतिक तणावामुळे भारतामध्ये महागाई झपाट्याने वाढत असून पेट्रोल, डिझेल, सीएनजी आणि एलपीजी गॅसच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ आणि पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने देशांतर्गत इंधन दरांचा भडका उडाला आहे.

**पेट्रोल-डिझेलच्या किमतीत सलग चौथ्यांदा वाढ-** मिळालेल्या माहितीनुसार, सरकारकडून पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत तब्बल चौथ्यांदा वाढ करण्यात आली आहे. पेट्रोल-डिझेलचे दर सातत्याने वाढत असल्याने देशातील सर्वसामान्य नागरिकांचे बजेट कोलमडले असून त्यांना मोठा आर्थिक दणका बसला आहे. जर इराण आणि अमेरिका यांच्यातील हा संघर्ष असाच सुरू राहिला, तर येत्या काळात परिस्थिती आणखी बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या गंभीर परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि यातून मार्ग काढण्यासाठी केंद्र सरकार काही मोठे निर्णय घेण्याच्या तयारीत आहे.

**व्यावसायिक एलपीजी सिलेंडर ४२ रुपयांनी महागला-** इंधनासोबतच देशात एलपीजी गॅसच्या किमतीही सातत्याने वाढत आहेत. सर्वसामान्यांना महागाईचा आणखी (पान २ वर)

## इराणचे कुवैतवर हवाई हल्ले



**तेहरान /वृत्तसंस्था :** अमेरिकेसोबत चर्चा सुरू असली, तरी तूर्तास युद्ध थांबवण्याच्या शक्यता मावळताना दिसत आहेत. कारण आधी अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर दिल्यानंतर आता इराणने कुवैतवर हवाई हल्ले केले. कुवैतमध्ये पहाटेच मोठा हवाई हल्ला केला. इराणकडून मिसाईल्स आणि ड्रोन्स डागण्यात आलेत. त्यामुळे संपूर्ण देशभरात धोक्याचा इशारा देणारा सायरन वाजला. अचानक दिलेल्या या इशा-यामुळे नागरिकांची सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी धावपळ उडाली.

कुना रिपोर्टनुसार, देशभरात नागरिकांना हल्ल्यांची माहिती देउन सावध करण्यासाठी सायरन वाजवले जात आहेत. कुवैतच्या लष्कराने एअर डिफेन्स सिस्टिम कार्यान्वित केली आहे. इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाईल्स आणि ड्रोन्स (पान २ वर)

## जेईई अॅडव्हान्स्ड 2026 निकाल जाहीर

### शुभम कुमार देशात अव्वल, आरोही देशपांडे ठरली टॉपर विद्यार्थिनी




**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील सर्वात प्रतिष्ठित अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या जेईई अॅडव्हान्स्ड २०२६ चा निकाल जाहीर झाला असून यंदा आयआयटी दिल्ली झोनच्या विद्यार्थ्यांनी शानदार कामगिरी करत कामन रँक लिस्टमधील पहिल्या तीन क्रमांकांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या परीक्षेत शुभम कुमार याने ३६० पैकी तब्बल ३३० गुण मिळवत ऑल इंडिया रँक १ पटकावला आहे. तर मुलींमध्ये आरोही देशपांडे हिने सर्वोच्च स्थान मिळवत देशातील अव्वल विद्यार्थिनी होण्याचा मान पटकावला. यंदाच्या निकालात आयआयटी दिल्ली झोनची विशेष छाप पाहायला मिळाली. शुभम कुमारनंतर कबीर छिल्लर आणि जतिन चाहर यांनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवत दिल्ली झोनचे वर्चस्व अधोरेखित केले. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेत अव्वल स्थान मिळवणे ही अत्यंत उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे. निकालानुसार, देशातील सुमारे ५५ हजार विद्यार्थी आता भारतातील २३ आयआयटींमधील बी-टेक, इंटिग्रेटेड एम-टेक आणि ड्युअल डिग्री अभ्यासक्रमांसाठी होणा-या प्रवेश समुपदेशन प्रक्रियेस पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, अधिकृत वेळापत्रकानुसार निकाल १ जून रोजी सकाळी १० वाजता जाहीर होणार होता. मात्र विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढवत (पान २ वर)

## 'कॉकरोच' 6 जूनला दिल्लीत

**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके ६ जून रोजी भारतात परततील. ते दिल्लीतील जंतर-मंतरवर शांततापूर्ण निदर्शने करतील. यामध्ये शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करतील.दिपके यांनी स्वतः याची माहिती एक्स वरील कॉकरोच इज बॅक अकाउंटवर दिली. दिल्ली उच्च न्यायालयाने २९ मे रोजी कॉकरोच जनता पार्टीच्या एक्स अकाउंटवरील बंदी हटवण्यास नकार दिला होता. न्यायालयाने सरकारकडून ४ आठवड्यांत उत्तर मागितले. दिल्ली उच्च न्यायालयात दिपके यांनी सीजेपीचे अकाउंट ब्लॉक करण्याला आव्हान दिले आहे. न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांच्या खंडपीठाने म्हटले की, सरकारची बाजू ऐकल्याशिवाय असा आदेश दिला जाउ शकत नाही, कारण या प्रकरणाचे व्यापक परिणाम आणि दूरगामी परिणाम आहेत. न्यायालयाने केंद्र सरकारला चार आठवड्यांत उत्तर दाखल करण्यास सांगितले आणि प्रकरणाची पुढील सुनावणी ६ जुलै रोजी निश्चित केली. कॉकरोच जनता पार्टी हे एक सोशल मीडिया प्लॅटफार्म आहे, जे भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील कॉकरोच टिप्पणीनंतर समोर आले. सोमवारी दुपारी २ वाजेपर्यंत सीजेआयच्या इंस्टाग्रामवर २.२३ कोटी (२२.३ दशलक्ष) फॉलोअर्स आहेत. (पान २ वर)



## अमेरिकेकडून इराणच्या रडार आणि ड्रोन नियंत्रण केंद्रांवर हल्ला



**तेहरान /वृत्तसंस्था :** एकीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणसोबत करार झाल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे मात्र दोन्ही देशांमधील लष्करी संघर्ष वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेच्या सैन्याने तेहरानच्या ड्रोन कमांड तळांवर जोरदार हल्ले केल्याचे वृत्त आहे. अमेरिकेने या आठवड्याच्या शेवटी इराणच्या गोरुक आणि केशम बेटांवरील रडार आणि ड्रोन नियंत्रण केंद्रांना लक्ष्य केल्याची माहिती समोर आली आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने (सेंटकाम) सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्स वर या कारवाईची माहिती दिली. इराणने आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीवरून उड्डाण करणारे अमेरिकेचे एमक्यू-१ हे ड्रोन पाडल्याचे सेंटकामने म्हटले आहे. इराणच्या या कारवायांना प्रत्युत्तर देण्यासाठी आणि स्वसंरक्षणासाठी अमेरिकेने हे हवाई हल्ले केले. या कारवाईत अमेरिकेच्या लढाउ विमानांनी इराणची हवाई सुरक्षा प्रणाली, एक (पान २ वर)

## महायुतीला लाडक्या बहिणींचा श्राप लागणार-वडेट्टीवार



**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी माझी लाडकी बहीण योजना, ओबीसी आरक्षण, वाढती महागाईवरून सरकारला सडकून धारेवर धरले आहे. त्यांनी थेट लाडक्या बहिणींना वा-यावर सोडून दिले आहे असे खळबळजनक विधान केले आहे. लाडकी बहीण योजनेतून तब्बल ८० लाख महिलांना वगळण्यात आले आहे. या मुद्द्यावरून वडेट्टीवार यांनी सरकारचा खरपूस समाचार घेतला. ते म्हणाले, ८० लाख लाडक्या बहिणी कमी केल्या याचा अर्थ निवडणुकीत वापर झाला. निवडणुका झाल्या आता लाडकी बहीण तुझा आणि आमचा काय संबंध.. भाउ इकडे बहीण तिकडे.. भाउ खुर्चीवर (पान २ वर)

## लाडकी बहीण योजनेतून तब्बल 1 कोटी 25 लाख महिला अपात्र

### सुप्रिया सुळेंनी दिली पोर्टलची आकडेवारी

**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून लाडकी बहीण योजना चांगलीच चर्चेत आहे, त्याला कारण आहे ते यंदाच्या हफ्त्यात ५० लाखांहून अधिक लाडक्या बहिणींना पैसे मिळालेच नाहीत. लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिलांना विविध कारणास्तव वगळण्यात आल्याचं समोर आलं आहे. त्यानंतर, विरोधी पक्षातील नेत्यांनी जोरदार आवाज उठवला असून हा लाडक्या बहिणींवर अन्याय असल्याचं म्हटलं आहे. निवडणुकांवेळी सरकारने पात्रतेच्या निकषाला कात्री लावली होती, मात्र आता निकष देउन लाडक्या बहिणींनाच योजनेसाठी कात्री लावण्यात येत असल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे, तब्बल १.२५ कोटींहून अधिक महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आल्याचं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.



सुप्रिया सुळेंनी ट्विटरवर पोस्ट करत म्हटलंय की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुरुवातीला २.३७ कोटी महिलांना लाभ दिल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला होता. डिसेंबर २०२४ पर्यंत या महिलांना तब्बल १७ हजार ५०५ कोटींपेक्षा अधिक रक्कम वितरित झाल्याची माहिती देखील देण्यात आली. पुढे या योजनेअंतर्गत लाभार्थी संख्या २.४६ ते २.४८ कोटींपर्यंत गेल्याचे सांगण्यात आले, जो या योजनेचा उच्चांक होता. त्यानंतर e-KYC बंधनकारक केल्यानंतर टप्प्याटप्प्याने लाभार्थी संख्या कमी होत गेली. माध्यमांमधील सध्याच्या आकडेवारीनुसार तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरविण्यात आल्याचे सांगितले जात आहे आणि आता सुमारे १.६६ कोटी महिलांनाच योजनेचा लाभ मिळणार असल्याचे समोर येत आहे. लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवरील प्रत्यक्ष आकडे पाहिले असता अर्जांची आणि मंजूर लाभार्थ्यांची संख्या आणखीच कमी दिसत आहे. पोर्टलवर एकूण अर्जांची संख्या फक्त१.१२ कोटी तर मंजूर अर्जांची संख्या (पान २ वर)

## भारताच्या ब्रह्मोससाठी व्हिएतनामसह इंडोनेशियाही प्रयत्नशील



**नवी दिल्ली :** भारताने आपली अत्यंत प्रगत आणि घातक समजली जाणारी ब्रम्होस क्षेपणास्त्र प्रणाली व्हिएतनामला विकण्यासाठी करार केला आहे. सिंगापुर येथे आयोजित शांग्री-ला डायलाग या जागतिक सुरक्षा परिषदेत भारताचे संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी नुकताच या वृत्ताला अधिकृत दुजोरा दिला. भारताने व्हिएतनामसोबत असाच ब्रह्मोस विक्रीचा करार केल्याची ही पहिलीच अधिकृत कबुली आहे. याशिवाय इंडोनेशियासोबतचा असाच एक करार सध्या अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले. संरक्षण सचिवांनी स्पष्ट केले की, व्हिएतनामसोबतचा करार पुर्ण झाला असून त्यावर स्वाक्षरी झाली आहे, मात्र त्याची अद्याप सार्वजनिक घोषणा करण्यात आलेली नव्हती. भारत (पान २ वर)

## कर्नाटकात भाजपच्या अडचणीत वाढ



**बंगळूरू /वृत्तसंस्था :** कर्नाटकात काँग्रेसने नेतृत्वबदल घडवून आणण्याचा प्रयोग यशस्वी केला आहे. काँग्रेस नेते दोड्डलाहल्ली केंपेगौडा अर्थात डी.के. शिवकुमार यांना मुख्यमंत्री पद देण्याची तयारी काँग्रेसने पूर्ण केली आहे. विनाअडथळा ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. दरम्यान, काँग्रेसच्या या रणनीतीमुळे भाजपा व एनडीएला कर्नाटकसाठी केलेले पूर्वनियोजन व रणनीति बदलावी लागणार आहे. कर्नाटकात भाजपाला प्रदेशाध्यक्ष नियुक्तकरायचा होता. परंतु, काँग्रेसमध्ये अंतर्गत घडामोडी घडत असल्याने भाजपाने प्रदेशाध्यक्षांची नियुक्ती पुढे ढकलली. याच कालावधीत पंजाब, हरयाणा, दिल्ली आणि त्रिपुरा या राज्यांच्या नव्या प्रदेशाध्यक्षांची घोषणा भाजपने केली.भाजपच्या एका नेत्याने दिलेल्या माहितीनुसार, डी. के. शिवकुमार यांनी आतापर्यंत प्रशासक म्हणून छाप पाडलेली नाही. जर मुख्यमंत्री पद मिळाल्यानंतर त्यांनी उत्तमपणे प्रशासन हाताळले, तर भाजपासाठी अडचणी आणखी वाढतील. डी. के. शिवकुमार हे एक चांगले प्रशासन देउ शकतात, अशी अपेक्षा कर्नाटकातील मतदारांना आहे. शिवकुमार हे (पान २ वर)


## फसव्या जाहिराती करणा-या सेलिब्रिटींवरही कारवाई ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी धडाडीचे पाउल

### तुकाराम मुंढेंचा इशारा


**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील धडाकेबाजी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध विभागाचा पदभार स्वीकारल्यापासूनच कारवाईचा धडाका सुरू केला आहे. दोनच दिवसांत अन्न व औषध प्रशासनाचा चार्ज स्वीकारल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे चांगलेच अॅक्शन मोडमध्ये आले असून अवैध गुटखा, भेसळयुक्त पदार्थांच्या दुकानांवर कारवाई केल्यानंतर आता पुढील अध्याय सुरू केल्याचं दिसून येतं. आत्तापर्यंत २८ दुकाने सील करण्यात आली असून ३३ आरोपींना अटकही करण्यात आल्याची माहिती आहे. आता, तुकाराम मुंढेंनी टीव्ही आणि पेपरात मिसलीडिंग अॅडव्हर्टायझिंग करणा-या सेलिब्रिटींवरकारवाई करण्याचा बडगा उगारला आहे. ब्रँड आणि मोठमोठी आश्वासने देत, फायदे दाखवत कंपन्यांकडून अनेकदा ग्राहकांची फसवणूक केली जाते. चुकीच्या आणि मिसलिडिंग जाहिराती दाखवून (पान २ वर)



## मान्सून 2-3 दिवसांत केरळममध्ये पोहोचेल



राजस्थानमध्ये सलग दुस-या दिवशी वाळूचे वादळ



मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये सोमवारी दुपारी जोरदार पाउस झाला.



उत्तराखंडमधील नदीचा प्रवाह वाढला. सुरक्षा दलांनी ५० लोकांची सुटका केली.

### देशभरातील उष्णतेची लाट संपली; राजस्थानमधील 3 जिल्ह्यांमध्ये गारपीट, 5 राज्यांमध्ये वादळी वा-यासह पाउस

**नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनउ/वृत्तसंस्था :** भारतीय हवामान विभागाने (क्षन्न) सांगितले आहे की, नैऋत्य मान्सून पुढील २ ते ३ दिवसांत केरळममध्ये दाखल होउ शकतो. साधारणपणे मान्सून १ जूनच्या आसपास केरळममध्ये दाखल होतो, परंतु यावेळी त्याचा वेग थोडा मंद राहिला आहे. हवामान विभागाच्या मते, अरबी समुद्र, लक्षद्वीप, केरळम आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये मान्सूनच्या प्रगतीसाठी हवामान अनुकूल बनले आहे. यासोबतच बंगालच्या उपसागरातील अनेक भागांमध्येही मान्सून पुढे सरकू शकतो. IMD ने यापूर्वी मान्सून २६ मे रोजी केरळममध्ये दाखल होईल असा अंदाज वर्तवला होता, परंतु नंतर त्यात विलंब झाला आणि विभागाने सांगितले की, त्याची सुरुवात जूनच्या पहिल्या आठवड्यात होउ शकते.

हवामान विभागाच्या माहितीनुसार, देशभरात सध्या उष्णतेच्या लाटेची (हीटवेव) स्थिती संपली आहे. राजस्थानमधील अजमेर, नागौर आणि चित्तौडगडमध्ये सोमवारी गारपीट झाली. मध्य प्रदेशातील ४ जिल्ह्यांमध्येही वादळी वा-यासह पावसाचा जोर सुरू आहे.उत्तर प्रदेशातील झाशी आणि ललितपूरमध्ये जोरदार पाउस झाला. राज्यातील ६३ जिल्ह्यांमध्ये वादळी वा-यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बिहारमधील सासाराममध्ये दुपारनंतर जोरदार पाउस झाला.तर झारखंड, छत्तीसगड, हरियाणा आणि पंजाबसह २७ राज्यांमध्ये हलक्या ते जोरदार पावसाचा इशारा आहे. उत्तराखंडमधील नैनितालसह ६ जिल्ह्यांमध्ये पाउस झाला. खराब हवामानामुळे पिथौरागढमध्ये १२वी पर्यंतच्या सर्व शाळा बंद राहिल्या. केदारनाथ यात्रा तात्पुरती थांबवण्यात आली. तर चंपावतमध्ये दुथडी भरून वाहणा-या नदीत अडकलेल्या ५० हून अधिक भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

**यावर्षी पाउस कमी होण्याची शक्यता-** हवामान विभागाने म्हटले आहे की, यावर्षी (पान २ वर)




पान १ व १० वरून

## भारतात राहण्याची मला लाज

दुसरे खासदार कल्याण बॅनर्जी यांना एका पोलिस ठाण्यासमोर कथितपणे धक्काबुक्की करण्यात आली होती. तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांवरील या हल्ल्यांवर प्रतिक्रिया देताना सिब्बल म्हणाले हे अत्यंत लाजीरवाणे आहे. मला अशा देशात राहण्याची लाज वाटते जिथे अशा घटना घडतात, जिथे सत्तेत असलेला राजकीय पक्ष आपल्या महान नेत्यांनी प्रजासत्ताक स्थापनेच्या वेळी रचलेला लोकशाहीचा पाया नष्ट करण्यासाठी कोणत्याही थराला जाउ शकतो.

**भाजपचा सिब्बल यांच्यावर पलटवार-**सत्ताधारी पक्षावर टीका केल्याबद्दल भाजपने सोमवारी ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांच्यावर जोरदार निशाणा साधला. भाजपने त्यांच्यावर भारतद्वेषी असल्याचा आरोप केला आणि २०२१ मधील पश्चिम बंगालमधील निवडणुकीनंतरच्या हिंसेवर ते गप्प का राहिले, असा सवाल केला. भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी एका व्हिडिओ निवेदनात म्हटले आहे की, देशाच्या सर्वोच्च न्यायालयात प्रॅक्टिस करून सिब्बल यांनी कोट्यवधी रुपये कमावले आणि तरीही त्यांना भारतात राहण्याची लाज वाटते.

## अभिषेक, कल्याण बॅनर्जी हल्ला

अभिषेक बॅनर्जी यांच्यासोबत झालेल्या मारहाणीच्या प्रकरणाचा तपास करत आहेत. अभिषेक बॅनर्जीच्या हल्ला प्रकरणी पोलिसांनी आधी पाच जणांना अटक केली होती. त्यानंतर या प्रकरणात सहावी अटक झाल्याची माहिती समोर आली. सर्व आरोपी स्थानिक रहिवासी असून त्यांनी सोनारपूर येथे अभिषेक यांच्या दौ-यादरम्यान त्यांना विरोध केला होता. या घटनेनंतर नोंदवण्यात आलेल्या तक्रारीच्या आधारे सोनारपूर पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले. भाजपा नेत्यांनी निवडणुकीच्या निकालानंतर जनतेमध्ये असलेला संताप हे या घटनेचे कारण असल्याचे सांगितले आहे.भाजपच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी अटक करण्यात आलेले सहाही जण अवघ्या एक महिन्यापूर्वीपर्यंत टीएमसीच्या माजी आमदार लवली मैत्रा यांचे जवळचे सहकारी होते. या खुलाशामुळे आता नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. टीएमसीमधील अंतर्गत वाद आता उघडपणे समोर येत आहे का? असा सवाल विचारला जात आहे. भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्सवर माहिती दिली की, अभिषेक बॅनर्जी यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले सहा जण तृणमूल काँग्रेसच्या माजी आमदार लवली मैत्रा यांचे जवळचे सहकारी होते, जे महिनाभरापूर्वीपर्यंत त्यांच्यासोबत कार्यरत होते.

## जेईई ॲडव्हान्स्ड 2026 निकाल

तो अपेक्षेपेक्षा आधीच, ३१ मेच्या मध्यरात्री सुमारे २.३० वाजता संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला. यंदाची परीक्षा भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) रुरकी यांनी आयोजित केली होती. परीक्षेच्या गुणवत्तेबाबतही महत्त्वाची बाब समोर आली आहे. गेल्या वर्षी पात्रतेसाठी आवश्यक असलेला कटऑफ ७४ गुणांचा होता, तो यंदा वाढून ९२ गुणांवर पोहोचला आहे. यावरून परीक्षेतील स्पर्धा अधिक तीव्र झाल्याचे स्पष्ट होते. तसेच यंदा कोणत्याही प्रश्नाला बोनस गुण देण्यात आलेले नाहीत. विशेषतः रसायनशास्त्र आणि गणित विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये कोणतीही त्रुटी आढळून न आल्याचे परीक्षाधिका-यांनी स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनीही या राष्ट्रीय स्पर्धेत दमदार उपस्थिती नोंदवली आहे. देशातील अव्वल ५०० विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा सुमारे १० टक्के, तर अव्वल १००० विद्यार्थ्यांमध्ये हा वाटा १०.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. राज्यातून सर्वाधिक गुण मिळवण्याचा मान नागपूरच्या माधव साधुराम नोटानी याने मिळवला असून त्याने ३६० पैकी ३०० गुणांची प्रभावी कमाई केली आहे.यंदाच्या जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेत एकूण ५६,८८० विद्यार्थी पात्र ठरले आहेत. परीक्षेसाठी देशभरातून १ लाख ८७ हजार ३८९ अर्ज प्राप्त झाले होते, त्यापैकी १ लाख ७९ हजार ६९४ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित राहिले. १७ मे रोजी घेण्यात आलेल्या या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांमध्ये निकालाबाबत प्रचंड उत्सुकता होती. निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना जेईई ॲडव्हान्स्डच्या अधिकृत संकेतस्थळावर जाउन आपले रोल नंबर, जन्मतारीख आणि नोंदणीकृत मोबाईल क्रमांक वापरून स्कोअरकार्ड डाउनलोड करता येणार आहे. आता सर्वांचे लक्ष आयआयटी प्रवेशासाठीच्या समुपदेशन प्रक्रियेकडे लागले असून देशातील सर्वोत्तम अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची पुढील स्पर्धा सुरू होणार आहे.

## 'कॉकरोच' 6 जूनला

**सीजेपी राजकीय आणि सामाजिक व्यंग्य-** सीजेपी राजकीय आणि सामाजिक व्यंग्यावर (सटायर) आधारित एक उपक्रम आहे. जर काही पोस्ट आक्षेपार्ह असतील, तर फक्त त्यांना ब्लाक केले जाउ शकते.

**संपूर्ण खाते बंद करणे योग्य नाही.** यापूर्वीही अशा प्रकरणांमध्ये न्यायालयांनी दिलासा दिला आहे आणि काही खाती पूर्ववत झाली आहेत.

**ब्लॉकिंग ऑर्डरचे कारण अजून स्पष्ट नाही-** सध्या फक्त नोटीस जारी केली जाउ शकते. या प्रकरणात कायदा अजून सुरुवातीच्या टप्प्यात आहे. ब्लॉकिंग ऑर्डरचे कारण अजून स्पष्ट नाही. याचिकाकर्त्याने ब्लॉकिंग ऑर्डर पाहिली नाही, ना न्यायालयाने. ज्या जुन्या प्रकरणांचा उल्लेख करण्यात आला, ती वेगळी होती. तिथे काही पोस्ट वादग्रस्त होत्या, इथे संपूर्ण खात्याच्या गतिविधींवर प्रश्न आहे.

## अमेरिकेकडून इराणच्या रडार आणि

भू-नियंत्रण केंद्र आणि दोन ड्रोन पूर्णपणे नष्ट केले. या संपूर्ण मोहिमेत अमेरिकेचे कोणतेही लष्करी जवान जखमी झाले नसल्याचे व?शिंग्टनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दुसरीकडे, इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कार्प्स ने या हल्ल्याला दुजोरा दिला असून अमेरिकेला प्रत्युत्तर दिल्याचा दावा केला आहे. सिरिक बेटावरील दूरसंचार टावरवर झालेल्या अमेरिकन हल्ल्याचा बदला म्हणून इराणच्या हवाई दलाने अमेरिकेच्या एका हवाई तळाला लक्ष्य केल्याचे आयआरजीसीने सोमवारी सांगितले. मात्र, सुरक्षा कारणास्तव इराणने या हवाई तळाच्या अचूक ठिकाणाचा खुलासा केलेला नाही.

गेल्या आठवड्यापासून दोन्ही देशांमध्ये एकमेकांवर प्रत्युत्तरात्मक हल्ले सुरू आहेत. अमेरिकेच्या एका अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकन लष्कराने होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ इराणच्या ड्रोन तळांना लक्ष्य केले होते, त्यानंतर संतप्त झालेल्या इराणने अमेरिकेच्या तळावर हल्ला चढवला. एका बाजूला शांततेच्या आणि कराराच्या चर्चा सुरू असतानाच, दुसरीकडे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने आखाती देशांमधील तणाव कमालीचा वाढला आहे.

## भारताच्या ब्रह्मोससाठी व्हिएतनामसह

आपल्या अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा पुरवठा केवळ विश्वासू आणि मित्र देशांनाच करतो, असे सांगत त्यांनी या व्यवहाराचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित केले. भारताकडून ब्रम्होस क्षेपणास्त्र खरेदी करणारा फिलिपिन्स हा २०२२ मध्ये पहिला परदेशी देश ठरला होता. फिलिपिन्सने भारतासोबत ३७५ दशलक्ष डालर्सचा (सुमारे ३,१०० कोटी रुपये) करार केला होता. त्यानंतर आता व्हिएतनाम आणि इंडोनेशिया या देशांनीही भारताच्या संरक्षण सामग्रीवर विश्वास दाखवला आहे. आशियाई देशांसोबतचे संरक्षण संबंध अधिक दृढ करण्यास भारत कटिबद्ध असून या देशांना भारत मित्र राष्ट्र मानतो असे सिंगापूरमधील परिषदेत सांगण्यात आले. गेल्या दशकभरात भारताने संरक्षण क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. या क्षेत्रात आता खासगी कंपन्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. सध्या भारताच्या एकूण संरक्षण उत्पादनात सरकारी कंपन्यांचा वाटा ७२ऽ आहे, तर उर्वरित वाटा खासगी क्षेत्राचा आहे. विशेष म्हणजे, जगातील पहिल्या १०० शस्त्र उत्पादक कंपन्यांमध्ये भारताच्या ३ सरकारी कंपन्यांचा समावेश आहे. भारताने क्षेपणास्त्र प्रणाली, फायटर जेट्स आणि युद्धनौका निर्मितीमध्ये मोठी स्वावलंबी झेप घेतली आहे. भारताचे उद्दिष्ट कोणतेही वेगळे गट तयार करणे नसून, सामूहिक सुरक्षा मजबूत करण्यासाठी सर्वसमावेशक आणि विश्वासू भागीदारी निर्माण करणे हेच आहे असे स्पष्ट मत संरक्षण सचिवांनी मांडले. कोण प्रमुख उमेदवार आहेत याची माहिती खाली देण्यात आली आहे.महायुतीमध्ये भाजप ११ जागांवर निवडणूक लढवत असून शिंदेंची शिवसेना ४ जागांवर मैदानात आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेसला जागावाटपात २ जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे महाविकास आघाडीचा विचार केल्यास, काँग्रेस सर्वाधिक ८ जागांवर निवडणूक लढवत आहे, ठाकरेंची शिवसेना ६ जागांवर उमेदवार देत असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीने तीन मतदारसंघात उमेदवार दिले आहेत. त्यामुळे, या सर्व जागांवरील प्रमुख लढती आता निश्चित झाल्या असल्या तरी खरे चित्र ४ जून रोजीच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर (पोटनिवडणूक)

## एलपीजी सिलेंडरमध्ये 42

एक मोठा फटका देत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे. प्रति व्यावसायिक सिलेंडर तब्बल ४२ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीमुळे आता हाटेलमधील खाद्यपदार्थ आणि बाहेरचे जेवण महागण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या वाढत्या किमतींमुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांवर याचा थेट परिणाम होणार आहे.

**१ जून २०२६ पासून नवे दर लागू; घरगुती ग्राहकांना दिलासा-** नवे दर १ जून २०२६ पासूनच लागू करण्यात आले आहेत. नवीन दरवाढीनुसार दिल्लीत आता १९ किलोग्रामच्या व्यावसायिक सिलेंडरसाठी ग्राहकांना ३,११३.५० रुपये मोजावे लागणार आहेत. ५ किलोग्रामच्या फ्री ट्रेड एलपीजी सिलेंडरच्या दरातही ११ रुपयांची वाढ करण्यात आली असून, दिल्लीत आता त्याची किंमत ८२१.५० रुपये झाली आहे. या संपूर्ण दरवाढीत सर्वसामान्य कुटुंबांना एक मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारने घरगुती गॅस सिलेंडरच्या (१४.२ किलो) किमतींमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केलेली नाही. घरगुती गॅसचे दर स्थिर ठेवण्यात आले आहेत.

**होर्मुजची सामुद्रधुनी बंद; पुरवठा साखळी कोलमडली-**इराण आणि अमेरिकेतील युद्धामुळे जागतिक स्तरावर होर्मुजची सामुद्रधुनी बंद करण्यात आली आहे. हा सागरी मार्ग बंद झाल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली असून, कच्च्या तेलाची आयात-निर्यात विस्कळीत झाली आहे. परिणामी, जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाचे भाव कडाडले आहेत आणि एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. याच टंचाईमुळे भारतामध्ये व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत एकापाठोपाठ एक अशा मोठ्या दरवाढी पाहायला मिळत आहेत.

## इराणचे कुवैतवर हवाई

हवेत निष्क्रिय करण्याचे काम कुवैतच्या लष्कराकडून केले जात आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने इराणवर हल्ले केल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. सेंटकाम अर्थात अमेरिकेच्या सैन्याने म्हटले आहे की, अमेरिकेने इराणच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी आणि स्वसंरक्षणार्थ कारवाई केली आहे. इराणने आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत उडत असलेले अमेरिकेचे एमक्यू१ हे ड्रोन हल्ला करून पाडले. त्यानंतर प्रत्युत्तरात कारवाई करण्यात आली आहे.अमेरिकेच्या लष्कराने म्हटले आहे की, शनिवारी आणि रविवारी केले गेले. अमेरिकेच्या लढाउ विमानांनी इराणच्या एअर डिफेन्स सिस्टिम, जमिनीवरील नियंत्रण कक्ष आणि दोन ड्रोन्स नष्ट केले आहेत. इराणच्या गोरुक परिसरात आणि केश्म बेटावरील रडार आणि ड्रोन नियंत्रण ठिकाणालाही लक्ष्य करण्यात आले आहे. इराणच्या आक्रमकतेला हे उत्तर आहे. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी इस्रायल आणि लेबन?नच्या नेत्यांशी चर्चा केली. लेबनानचे राष्ट्रपती जोसेफ आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी त्यांनी संवाद साधला. अमेरिकेच्या एका अधिका-याने सांगितले की, अमेरिकेने असा प्रस्ताव दिला आहे की, पहिले पाउल म्हणून हिजबुल्लाहने इस्रायलवर केले जाणारे सर्व हल्ले थांबवावेत आणि इस्रायलनेही बेरूतमध्ये तणाव वाढणार नाही, याची काळजी घेईल.

## महायुतीला लाडक्या बहिणीचा

बसून मज्जा करत दाबून माल खात आहे. महाराष्ट्र लुटत आहे आणि लाडक्या बहिणींना हवेवर सोडून दिला आहे. पुढे ते म्हणाले, ८० लाख महिला कमी केल्या त्यांचं श्राप या महायुतीच्या सरकारला लागणार. या महिलांचं श्राप मोठा असतो. जेव्हा महिला अंतकरणातून श्राप देते तेव्हा यांचा सत्यानाश झाल्याशिवाय राहणार नाही. असंच आता गावागावात सत्यनास करण्यासाठी टपलेली आहे. हे जेव्हा आता पुन्हा मतं मागण्यासाठी जातील तेव्हा यांची पूजा केली जाईल.

**भाजप आता काँग्रेसयुक्त-** भाजपकडून काँग्रेसचे चार उमेदवार आयात केल्याच्या प्रश्नावर त्यांनी भाजपची खिल्ली उडवली. मी आता काँग्रेसवाल्यांना सांगतो की आपण सर्वच भाजपात जाउ आणि भाजपला घेउन काँग्रेसमध्ये येउ, म्हणजे देश भाजपमुक्त होउन जाईल. आज अर्ध्याहून जास्त मुख्यमंत्री, आमदार आणि विधान परिषदेचे उमेदवार काँग्रेसमधून आलेले आहेत. काँग्रेसमुक्त भारतचा नारा देणारी भाजप आता काँग्रेसयुक्त होत चालली आहे, असा खोचक टोला त्यांनी लगावला. भाजपची एवढी ताकद असूनही ते घाबरलेले आहेत, त्यामुळे त्यांनी अत्यंत सावधगिरीने पावले टाकत शेवटपर्यंत उमेदवारी जाहीर केली नाही. काँग्रेस मात्र पूर्ण ताकतीने लढत असून चंद्रपूरमध्ये शैलेंद्र अग्रवाल यांना उमेदवारी दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अग्रवाल हे केवळ व्यापारी नसून किसान सेलचे राष्ट्रीय सचिव व तीन-चार राज्यांचे प्रभारी आहेत, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

## लाडकी बहीण योजनेतून तब्बल

फक्त १.०६ कोटी इतकीच दिसत आहे. म्हणजे डिसेंबर २०२४ मधील आकडेवारी गृहीत धरली तर तब्बल १.२५ कोटीहून अधिक महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे, असे स्पष्टपणे दिसत आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटलंय. जर शासनानुसार आजही १.६६ ते १.६८ कोटी लाभार्थी असतील, तर पोर्टलवर त्यापेक्षा कमी आकडे का दिसत आहेत? सुरुवातीला जाहीर केलेले लाभार्थी नेमके कोण होते? पडताळणीदरम्यान एवढ्या मोठ्या प्रमाणावर महिलांना अपात्र का ठरवण्यात आले? या सर्व बाबींवर सरकारने स्पष्ट, सविस्तर आणि पारदर्शक भूमिका मांडणे आवश्यक आहे. जनतेच्या कष्टातून निर्माण झालेल्या कररूपी पैशांतून ही योजना चालविली जाते. त्यामुळे गेली वर्ष-दीड वर्ष सरकार अपात्र लाभार्थ्यांनाच जनतेचा पैसा वाटत होते का, असा अत्यंत गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे. ही संपूर्ण बाब मूळात या सरकारचे घोर अपयश उघड करणारी आहे.

**प्रत्येक भगिनीला योजनेचा लाभ मिळालाच पाहिजे** -दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात यावी. या योजनेचे स्वतंत्र आर्थिक आणि प्रशासकीय ऑडिट देखील करण्यात यावे. प्रामाणिकपणे कर भरणा-या महाराष्ट्रातील जनतेचा पैसा चुकीच्या पद्धतीने नेमका कोणाकडे वळवला गेला, यामध्ये कोण जबाबदार आहे आणि प्रत्यक्ष लाभार्थी कोण होते, याची संपूर्ण माहिती पारदर्शकपणे महाराष्ट्रासमोर आणली गेली पाहिजे, ही आमची ठाम मागणी आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील प्रत्येक भगिनीला लाडकी बहीण योजनेचा लाभ नियमितपणे मिळालाच पाहिजे, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. यासाठी विशिष्ट मुदतीत ई-केवायसी करण्याची अट महिलांसाठी अन्यायकारक ठरू नये. राज्यातील एकही पात्र महिला केवळ तांत्रिक कारणांमुळे या योजनेपासून वंचित राहू नये, याची जबाबदारी सरकारने प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे.

## कर्नाटकात भाजपच्या अडचणीत

त्यांच्याकडे असलेल्या पैशांसाठी तसेच मसल पॉवरसाठी ओळखले जातात. ते उत्तम प्रशासक ठरले, तर त्यांना कोणत्याच अडचणी येणार नाहीत. कर्नाटकात असलेल्या सत्ता विरोधी लाटेचाही भाजपाला उपयोग होणार नाही. त्यामुळे भाजपाला रणनीति बदलावी लागेल असे सूत्राने सांगितले.

**डी. के. शिवकुमार व सिद्धरामय्या-**कर्नाटकात मुख्यमंत्री पद मिळवण्यासाठी डी.के. शिवकुमार यांनी प्रयत्न सुरू केले होते. सत्तेचा अर्धा कालावधी संपल्यानंतरही शिवकुमार यांना मुख्यमंत्री पद मिळत नव्हते. परंतु, त्यांनी काँग्रेस पक्षश्रेष्ठींविरोधात कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. मुख्यमंत्री पदावरून पायउतार होण्याची सिद्धरामय्या यांची इच्छा नव्हती, तरी त्यांनी चेह-यावर स्मित हास्य कायम ठेवले होते. तर शिवकुमार यांनी सिद्धरामय्या यांच्या पाया पडून आशीर्वाद घेत मुख्यमंत्री पद स्वीकारत असल्याचा संदेश दिला. सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिल्याची घोषणा करताच शिवकुमार व सिद्धरामय्या यांचे एकमेकांना आलिंगन करतानाचे फोटो व्हायरल झाले आहेत.

**कर्नाटकात डी. के. शिवकुमार यांची प्रतिमा कशी?-** शिवकुमार यांचा मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी काही दिवसांत पार पडेल. ते वोक्कालिगा समाजातून येतात. कर्नाटकात वोक्कालिगा समाजाची लोकसंख्या १० टक्के आहे. २०२८ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी वोक्कालिगा समाज काँग्रेसच्या बाजूने असेल, यासाठी शिवकुमार प्रयत्न करतील. काही भाजपा नेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवकुमार हे बंगळुरूतील एक यशस्वी उद्योजक आहेत. तसेच त्यांचे त्या भागातील भाजपा आमदारांशी चांगले संबंध आहे. काँग्रेस पक्षश्रेष्ठी शिवकुमार यांच्याशी कशा प्रकारे जुळवून घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. कारण भाजपाच्या अनेक नेत्यांचे त्यांच्याशी संबंध आहेत. ईडीने शिवकुमार यांच्याविरोधात एका मनी लाँड्रिंग प्रकरणाचा तपास केला होता. त्यामुळे भाजपा शिवकुमार यांच्या नेतृत्वातील सरकार भ्रष्ट असल्याचा प्रचार करू शकतो, अशी माहिती भाजपच्या एका माजी खासदाराने दिली.

**भाजपाला येदियुरप्पांशिवाय पर्याय नाही?-** कर्नाटकात भाजप लिंगायत मतपेढीवर अवलंबून आहे. कर्नाटकातील एकूण लोकसंख्येपैकी ११.१ टक्के लोकसंख्या लिंगायत समाजाची आहे. भाजपाकडे अनेक लिंगायत नेते आहेत, परंतु, त्यांपैकी कोणीही बी. एस. येदियुरप्पा यांच्याइतके प्रभावी नाही. येदियुरप्पा यांचे पुत्र आणि कर्नाटक भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बी. वाय. विजयेंद्र हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्या टीममध्ये पद मिळवण्यासाठी इच्छुक आहेत. तर लिंगायत समाजातील नेते बसनगौडा पाटील यत्नाळ यांना पक्ष विरोधी कारवाया केल्याबद्दल सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे.

## फसव्या जाहिराती करणा-या

ग्राहकांना उत्पादन घेण्यास भाग पाडले जाते. मात्र, आता मिसलीडिंग ॲडव्हर्टायझिंग करणा-यांवर कडक कारवाईचा इशारा तुकाराम मुंढे यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आला आहे. यापुढे ग्राहकांची दिशाभूल करणा-या जाहिराती आता खपवून घेतल्या जाणार नाहीत, विशेष म्हणजे भ्रामक जाहिरातींमध्ये सहभागी सेलिब्रिटींवरही कारवाई होणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. ग्राहक संरक्षणासाठी प्रशासनाची आक्रमक भूमिका असणार आहे. त्यामळे, तुकाराम मुंढे पुन्हा आपल्या विभागात सक्रीय झाल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे, सर्वसामान्य नागरिकांकडून त्यांच्या या कर्तव्याचे कौतुक होत आहे. उत्पादन तयार करणा-या उत्पादकांपासून कारवाईला ह्या सुरुवात होणार आहे. ग्राहकांची फसवणूक करणा-या कंपन्यांवर अन्न व औषध प्रशासनाची नजर राहणार आहे. मात्र, ग्राहकांपर्यंत जाहिरातीच्या माध्यमातून उत्पादन पोहोचवणा-या या प्रक्रियेत सहभागी जाहिरातदार, उत्पादक आणि ब्रँड ॲम्बेसेडर सर्वांची जबाबदारी निश्चित होणार आहे. दिशाभूल करणा-या जाहिरातींविरोधात कठोर पावले उचलण्याचा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

**२५ मे रोजी तुकाराम मुंढेंनी स्वीकारला पदभार-** भ्रष्टाचाराच्या गर्तेत अडकलेल्या यंत्रणेला शिस्त लावण्यासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी २५ मे रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा नवीन कार्यभार स्वीकारला आहे. पदभार हाती घेताच त्यांनी राज्यातील जनतेच्या आरोग्याशी खेळणा-यांना कडक इशारा दिला होता. त्यांनी सर्व विभागांतील अन्न सुरक्षा अधिका-यांना तातडीने धाडी व जप्तीची विशेष मोहीम राबविण्याबाबत कडक निर्देश दिले. आयुक्तांच्या या आदेशानंतर यंत्रणेनं कमालीची तत्परता दाखवत बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या सर्वच विभागांमध्ये एकाच वेळी धडक कारवाई केली.

## मान्सून 2-3 दिवसांत केरळममध्ये

देशात मान्सूनदरम्यान सामान्यपेक्षा कमी पाउस होण्याची शक्यता आहे. संपूर्ण हंगामात पाउस दीर्घकालीन सरासरी (LPA) च्या सुमारे ९०ऽ राहण्याचा अंदाज आहे. LPA म्हणजे लान्ग पीरियड अव्हरेज (दीर्घकालीन सरासरी) म्हणजे एखाद्या प्रदेशात ३० ते ५० वर्षांच्या कालावधीत झालेल्या सरासरी पावसाला म्हणतात. भारतात १९७१ ते २०२० पर्यंतच्या आकडेवारीनुसार मान्सूनची सरासरी पर्जन्यवृष्टी ८७ सेंटीमीटर मानली जाते. जर एखाद्या वर्षी पाउस LPA च्या ९०% पेक्षा कमी राहिला, तर त्याला सामान्यपेक्षा कमी पावसाच्या श्रेणीत ठेवले जाते. यावर्षी कमी पावसाचे एक मोठे कारण अल निनो असू शकते. अल निनो ही एक हवामानाची स्थिती आहे, ज्या दरम्यान प्रशांत महासागरातील पाणी सामान्यपेक्षा जास्त गरम होते. याचा परिणाम भारताच्या मान्सूनवर होतो आणि अनेकदा पाउस कमी पडतो.सध्या प्रशांत महासागरातील स्थिती हळूहळू अल निनोच्या दिशेने सरकत आहे. हवामान विभागाचा अंदाज आहे की, जूनमध्ये अल निनो कमकुवत राहू शकते, परंतु सप्टेंबरपर्यंत ते मध्यम किंवा मजबूत रूप धारण करू शकते. राजस्थानमधील जैसलमेर येथे रविवारी संध्याकाळी पुन्हा वाळूचे वादळ उठले. त्यामुळे दिवसा अंधार पसरला. याचा व्हिडिओही समोर आला आहे, ज्यात आकाशात दूरूनच धुळीचा लोट उठताना दिसला, जो हळूहळू पुढे सरकला. यापूर्वी शनिवारी दुपारी ३ वाजता राजस्थानमधील ५ जिल्ह्यांमध्ये, श्रीगंगानगर, बिकानेर, चुरू, हनुमानगड आणि सीकर येथे वाळूचे वादळ आले होते. याचा परिणाम सुमारे २०० चौरस किलोमीटर परिसरात जाणवला. वाळूच्या वादळाची सुरुवात हनुमानगड आणि श्रीगंगानगर येथून झाली होती. यावेळी ५६ किमी प्रतितास वेगाने वादळ आले.

**मान्सून ४ जूनपर्यंत केरळममध्ये दाखल होईल-** हवामान विभागाने सांगितले की, मान्सून ४ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होउ शकतो. तथापि, विभागाने यावर्षी मान्सून सामान्यपेक्षा कमकुवत राहण्याचा अंदाजही वर्तवला आहे. आयएमडीनुसार, जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीपेक्षा कमी पाउस पडू शकतो. यावेळी मान्सून हंगामात ७८ सेंटीमीटर पाउस पडण्याचा अंदाज आहे. देशात सामान्य मान्सून पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर मानली जाते.हवामान विभागाने सांगितले की, बिहार, यूपीमध्ये सामान्य पाउस पडू शकतो, परंतु इतर अनेक भागांमध्ये सामान्यपेक्षा कमी पाउस पडण्याची शक्यता आहे. विशेषत? पावसावर अवलंबून असलेल्या शेती क्षेत्रांमध्ये मान्सून कमकुवत राहू शकतो.

**पुढील दोन दिवसांच्या हवामानाचा अंदाज**

**२ जून:** पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, झारखंड आणि राजस्थानच्या काही भागांमध्ये ४० ते ५० किमी प्रति तास वेगाने वारे वाहू शकतात. महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या काही भागांमध्येही जोरदार वारे वाहण्याची आणि वीज कोसळण्याची शक्यता आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी, केरळम आणि कर्नाटकमध्ये अनेक ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही भागांमध्ये मुसळधार पाउसही पडू शकतो. ईशान्येकडील राज्ये आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्येही पाउस आणि वादळी वा-यांचे सत्र सुरू राहण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, दिल्ली, चंदीगड, उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या अनेक भागांमध्ये ४०-५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात.मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड आणि बिहारच्या काही भागांमध्ये पाउस आणि वादळाची शक्यता आहे. केरळम, कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेशमध्ये पावसाचा अंदाज आहे. किनारपट्टीच्या काही भागांमध्ये जोरदार पाउस देखील होउ शकतो. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये पाउस आणि वादळी वा-यांचा प्रभाव राहील.

## पोटे, निलेश विश्वकर्मा,

बाजोरिया यांनीही अपक्ष म्हणून शड्डू ठोकत नामांकन दाखल केल्याने महायुतीच्या गोटात प्रचंड खळबळ उडाली आहे. बाजोरिया यांची ही अनपेक्षित एन्ट्री भाजप उमेदवारासाठी राजकीयदृष्ट्या अत्यंत धोकादायक मानली जात आहे.तर वंचित बहुजन आघाडी कडून चांदुर रेल्वे नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांचे पती निलेश विश्वकर्मा यांनी उमेदवारी दाखल केली. काँग्रेस कडून हर्षदीप देशमुख यांनी बी फॉर्म भरून आपली उमेदवारी पक्की केली. यामुळे आता निवडणुकीचा रोमांच आणखीन वाढलेला आहे. प्रवीण पोटे यांच्या नावावर काल रात्री शिक्कामोर्तब झाले. ते गेल्या २९ मे रोजीच उमेदवारी अर्ज दाखल करणार होते, तयारीही झाली होती, पण नंतर त्यांनी आजचा मुहूर्त निवडला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, आमदार बच्चू कडू, माजी खासदार आनंदराव अडसूळ, तिवसाचे भाजपचे आमदार राजेश वानखडे, प्रताप अडसड, महापौर श्रीचंद्र तेजवानी यांच्या सह इतर नेते यावेळी उपस्थित होते. तसेच हर्षजीत देशमुख यांच्यासोबत खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, बबलू देशमुख, बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, पराग गुडधे सह महाविकास आघाडीचे नेते उपस्थित होते. निलेश विश्वकर्मा यांच्यासोबत प्रदेश उपाध्यक्ष हर्षवर्धन पुंडकर , प्रदेश सचिव राजेंद्र पातोडे, जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम, नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा, सदस्य हर्षवर्धन वाघ, अरिहंत गेडाम, संजय चोरपगार, प्राजक्ता पिल्लेवान, अभय तायडे, बाबाराव गायकवाड ,सुरेंद्र खंडारे, सह आदि उपस्थित होते. अमरावतीमध्ये तिरंगी लढत पाहायला मिळत आहे.

**रवी राणांच्या नाराजीची चर्चा-** युवा स्वाभिमान पक्ष हा महायुतीतील एक घटक पक्ष आहे. त्यामुळे राणा यावेळी उपस्थित राहतील, अशी अपेक्षा पोटे समर्थकांनी व्यक्त केली होती. पण, काल रात्री अमरावतीत शिवपरिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहून ते दिल्ली येथे गेल्याचे सांगितले जात आहे. माजी खासदार नवनीत राणा देखील दिल्ली येथे आहेत. राणा दाम्पत्याच्या अनुपस्थितीमुळे हे दोघेही नाराज असल्याची चर्चा आहे. प्रवीण पोटे यांच्या उमेदवारीला राणा दाम्पत्याने जोरदार विरोध केल्याचेही बोलले जात आहे.

## अमरावतीत भरदिवसा धाडसी

ती पंचवटी चौक मार्गे पायी घराकडे परतत होती. सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान ती अर्जुन नगर चौकाजवळ पोहोचली असता, एका मोटारसायकलवरून आलेल्या दोन तरुणांनी तिच्या अगदी जवळून निष्काळजीपणे वाहन चालवले. अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याने महिलेने त्यांना 'नीट गाडी चालवा' असे सुनावले. मात्र, याच क्षणाचा फायदा घेत दुचाकीवरील मागे बसलेल्या भामट्याने महिलेच्या गळ्यातील सोन्याच्या मंगळसूत्रावर झडप घातली. काही क्षणांतच आरोपींनी महिलेच्या गळ्यातील सुमारे १५ ते १८ ग्रॅम वजनाचे आणि अंदाजे १ लाख ८० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हिसकावून घेतले आणि भरधाव वेगाने घटनास्थळावरून पसार झाले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे महिला हादरून गेली. घटनेनंतर पीडित महिलेने तातडीने गाडगेनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध लुटमारीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात येत असून आरोपींचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## तंत्रज्ञाची बदली दुर्भावनापूर्ण

होईल, असे त्यांनी नमूद केले. या बदलीमुळे कॅटमधील खटलाही निष्प्रभ होईल, असा युक्तिवाद त्यांनी केला. कंपनीने 'अंतर्गत बदली धोरणा'नुसार आणि आयआयएमसी दिल्ली येथील 'तातडीच्या प्रशासकीय निकडी'मुळे ही बदली केल्याचे सांगितले. प्रशिक्षित कर्मचारी असल्याने शेख यांची तेथे गरज असल्याचे कंपनीने म्हटले. सेवा शर्तीमध्ये कोणताही बदल नसून आदेशाला स्थगिती दिल्यास कामकाजावर परिणाम होईल, असा दावा कंपनीने केला.प्रभारी सदस्य पी. एस. कुळकर्णी यांनी नमूद केले की, बदली आदेशात केवळ 'अंतर्गत बदली धोरणाचा' उल्लेख असून दिल्ली येथील प्रशासकीय निकड किंवा रिक्त पदाचा कोणताही उल्लेख नाही. अमरावतीत शेख यांच्या जागी कोणाचीही नियुक्ती करण्यात आलेली नाही. निकड सिद्ध करण्यासाठी कंपनीने कोणताही दस्तऐवज दाखल केला नसून आदेश व कंपनीच्या उत्तरात तफावत असल्याचे न्यायालयाने म्हटले. प्रथमदर्शनी दुर्भावना व सोयीचा समतोल शेख यांच्या बाजूने असल्याचे आढळून आल्याने न्यायालयाने १२ मे च्या बदली आदेशाला तक्रारीच्या अंतिम निकालापर्यंत स्थगिती दिली. कंपनीला शेख यांना तात्काळ आयआयएमसी अमरावती येथे कर्तव्यावर रुजू करून घेण्याचे निर्देश दिले. तक्रारदारातर्फे ॲड. डी. बी. गावंडे तर प्रतिवादींतर्फे ॲड. डी. पी. देशमुख यांनी काम पाहिले.

## वयोवृद्ध शेतकऱ्याला लुटणारा

त्यांना वडील दवाखान्यात भरती असल्याचे खोटे सांगून मोटारसायकलवर बसविले. त्यानंतर राजुरा बाजार शाळेजवळ नेऊन चिल्लर पैशांची मागणी केली. वृद्ध शेतकऱ्यांनी खिशातील पाकिटातून खत खरेदीसाठी आणलेले १० हजार रुपये बाहेर काढताच आरोपीने ती रक्कम हिसकावून घेतली आणि मोटारसायकलवरून वरुडच्या दिशेने पळ काढला. या प्रकरणी वरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाच्या सूचना दिल्या होत्या.

तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी मनिष अनिल जोशी (वय ३३, रा. पार्वती नगर, अमरावती, ह.मु. यश कॉलनी, टॉवर लाईन परिसर) हा माहुली मार्गे मोर्शीकडे जात आहे. माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपीला विश्वासात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्या झडतीदरम्यान ६,३०० रुपये रोख रक्कम, नोकिया कंपनीचा मोबाईल आणि सुमारे ५० हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल (एमएच-२७ डीएक्स-३१९१) जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे वृद्ध व्यक्तीला लुटण्याचा गुन्हा उघडकीस आला असून आरोपीला पुढील तपासासाठी वरुड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक नितीन इंगोले, मोहन मोरे, पुरुषोत्तम यादव, सय्यद अजमत, स्वप्निल तंवर, चेतन दुबे, नितीन वानखडे, नईम कासम शहा तसेच सायबर पोलिस ठाण्याचे रितेश गोसावी व रुपाली इंगोले यांनी पार पाडली.

## गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे

लेआऊट परिसरात त्यांना चारही बाजूंनी घेराव घालून ताब्यात घेतले. पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत आरोपींकडून घातक शस्त्रे आढळून आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये वंश दीपक साहू (वय २०, रा. शनिवारा, अंजनगाव सुर्जी), अनिल मदन सोळंके (वय २३, रा. विलास नगर, लोहार लाईन, अमरावती) आणि अल्केश दीपक पवार (वय २१, रा. आठवडी बाजार, परतवाडा) यांचा समावेश आहे.वंश साहू याच्याकडून एक देशी बनावटीचे गावठी पिस्तूल, धातूची मॅगझिन आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. तर अनिल सोळंके आणि अल्केश पवार या दोघांकडून प्रत्येकी एक धारदार लोखंडी तलवार हस्तगत करण्यात आली. आरोपींकडील मोबाईल फोन तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली सुझुकी ॲक्सेस (एमएच-२७ ईए-८०७७) मोपेडही पोलिसांनी जप्त केली. या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५, ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही धडक कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल चांदोरे, पोलीस उपनिरीक्षक विशाल पोळ तसेच डी.बी. पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल जयसिंग चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल रवि राठोड, अमित घाटे, मोहसिन पठाण, शुभम मारकंड आणि चालक अक्षय शेळके यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## वादळी वाऱ्यासह आलेल्या

चांगलेच झोडपले. दुपारी ३.३० वाजता सुरू झालेला पाऊस रात्री ९ वाजेपर्यंत ही सुरू होता. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. उकाड्यापासून नागरिकांना थोडाफार दिलासा मिळाला. शहरातील काही भागात झाडे पडली. एका घराचे छत पडले. सुदैवाने कुटुंब सुखरूप वाचले. जयस्तंभ चौक येथील जे-एन डी मॉलचा शोकाच तुटून रस्त्यावर पडला. कोणालाही यामध्ये क्षति झाली नाही. काही ठिकाणी होर्डिंग आणि बॅनर पडले. वीज पुरवठाही पावसामुळे अनेक ठिकाणी बाधित झाला होता. काही क्षेत्रांमध्ये नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते. वाऱ्यामुळे यास्मिन नगर, लाल खडी ,विलास नगर, देवरणकर नगर परिसरात झाडे पडली होती. पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पोहरादेवीचा १ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प लवकरच होणार कार्यान्वित - जिल्हाधिकारी

## वीज खर्च शून्यावर आणण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बंजारा समाजाची काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पोहरादेवी तीर्थक्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी उभारण्यात आलेला १ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प हा हरित ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल असून या प्रकल्पामुळे नंगारा भवन व परिसराचा वीज खर्च जवळपास शून्यावर येणार आहे. तसेच अतिरिक्त वीज विक्रीतून उत्पन्न मिळून विकासकामांना गती मिळणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी पाहणी दरम्यान केले.

जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी आज मौजे गिरोली, ता. मानोरा येथे उभारण्यात आलेल्या १ मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाच्या कार्यकारी अभियंता निता बोकाडे यांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण केले. तसेच





मानोरा तहसीलदार राजेंद्र पाटील, सार्वजनिक बांधकाम मंडळ अकोला विभागाचे अधीक्षक अभियंता सुनील थोटांगे, कार्यकारी अभियंता शुभम जोशी, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) उप-विभागचे सहायक अभियंता स्वरूप सरोदे तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

श्री संत सेवालाल महाराज, पोहरादेवी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत या प्रकल्पासाठी दि. २४ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार ७ कोटी रुपयांच्या निधीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून प्रकल्पासाठी मौजे गिरोली येथील गट क्रमांक ३१३ मधील २ हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, यवतमाळ यांच्या माध्यमातून सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी पूर्ण करण्यात आली असून प्रकल्प लवकरच कार्यान्वित होणार आहे. सध्या ओपन ?क्सेस मंजुरीसाठी महावितरणच्या मुख्य अभियंता (वाणिज्य) कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पातून दरवर्षी सुमारे १५ लाख किलोवॅट युनिट वीज निर्मिती होणे अपेक्षित आहे. त्यापैकी पोहरादेवी येथील नंगारा भवन व परिसरासाठी अंदाजे १२ लाख किलोवॅट युनिट वीज वापरली जाणार आहे. त्यामुळे परिसराचे वीज देयक मोठ्या प्रमाणात कमी होऊन जवळपास शून्यावर आणणे शक्य होणार आहे.

उर्वरित सुमारे ३ लाख किलोवॅट युनिट वीज महावितरणला विक्री करण्यात येणार असून त्यातून मिळणारे उत्पन्न प्रकल्पाची देखभाल, व्यवस्थापन तसेच भविष्यातील विकासकामांसाठी उपयोगात आणले जाणार आहे. सौर ऊर्जा ही पर्यावरणपूरक आणि अपारंपरिक ऊर्जा असल्याने कार्बन उत्सर्जन कमी करण्यास या प्रकल्पाची मोठी मदत होणार आहे. परिणामी पर्यावरण संवर्धनाबरोबरच हरित ऊर्जेच्या वापरालाही चालना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे पोहरादेवी हे केवळ धार्मिक तीर्थक्षेत्र न राहता 'इको-टुरिझम' आणि 'आदर्श शाश्वत तीर्थक्षेत्र' म्हणून राज्यात नवी ओळख निर्माण करेल, असा विश्वास जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी यावेळी व्यक्त केला.


# मानोरा तालुक्यात कागदावर रोपे लावून वाढवली जात आहेत वने

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शासनाच्या भरीव वनीकरण योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यामधील गिरोली वनवर्तुळा अंतर्गत येणाऱ्या सावरगांव कान्होबा वनबिट, कक्ष क्र. १३८, कुप क्र. २ मध्ये सन २०२२-२३ मध्ये ३० हेक्टर क्षेत्रावर राबविलेल्या मिश्र रोपवन योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी जगदीश धांदू जाधव यांनी केला आहे.

जाधव यांनी दि. ११ एप्रिल आणि २८ मे रोजी केलेल्या स्थळ पाहणीत या ७५ एकर म्हणजेच ३० हेक्टर वनक्षेत्रात लावलेले एकही रोप जिवंत नसल्याचे आढळले. कागदावर कोट्यावधी रुपये खर्च दाखवून रोपे लावल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात केवळ ओसाड माळरान आणि दगडगोटेच याठिकाणी आहेत. यावरून निधीचा अपहार करून शासनाचे व परिसरातील नागरिकांचे सध्याही दिशाभूल केले जात असल्याचे त्यांनी ठोस पुराव्यासह दावा केला आहे.

या गंभीर प्रकरणी जाधव यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. ज्यांच्या कार्यकाळात हि योजना राबविण्यात आली ते तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी श्री जन्मेजय जाधव यांच्यासह संबंधित वनपाल, वनरक्षक यांच्या वेतनातून शासनाने गुंतवलेला संपूर्ण निधी वसूल करावा आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, बिएनएस कलम ३१६(४), ३१८(४)आणि ६१(२)नुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. जीपीएस व ड्रोन सर्वेक्षणासह त्रयस्थ चौकशीची मागणीही करण्यात आली आहे. चौकशी न



### शासनाच्या वृक्षारोपण आणि वनसंवर्धनाच्या धोरणाला लागली भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेची कीड

झाल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा जाधव यांनी दिला आहे.

मिश्र रोपवन या कागदावर राबविलेल्या योजने संदर्भात माजी वनमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी वनांचा टक्का वाढवा यासाठी वन मंत्रालय योजना राबवित असते. वनसंवर्धनांच्या अशा योजनेत अपहार, अनियमितता प्रशासकीय यंत्रणे कडून केल्या गेल्यास त्याची आगामी अधिवेशनात सभागृहात नक्कीच दखल घेण्यात येईल अशी प्रतिक्रिया १७ एप्रिल रोजी दिली. अभिजीत वायकोस, उपवनसंरक्षक वाशिम यांच्या प्रतिक्रिया घेण्यासाठी कॉल केला गेला असता ते कार्यक्षेत्राच्या बाहेर असल्याचे संकेत मिळाल्याच्या प्रतिक्रिया तक्रारकर्त्याच्या वतीने प्रस्तुत प्रतिनिधी देण्यात आल्या.

# सावता परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी रवि भांदुर्गे यांची निवड



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील युवासेनेचे जिल्हाध्यक्ष रवि भांदुर्गे यांची सावता परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणकाका आखाडे यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष गणेश दळवी व प्रदेश कार्याध्यक्ष पांडूरंग कोठाळे यांनी ही निवड जाहीर केली. याबाबत सोमवार, २५ मे रोजी भांदुर्गे यांना निवडीचे पत्र प्राप्त झाले.

रवि भांदुर्गे यांच्या सामाजीक व राजकीय कार्याची दखल घेवून त्यांच्यावर प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माळी समाजहिताच्या व अस्मितेच्या प्रश्नासोबतच समाजाच्या सर्वोंगीण हितासाठी सावता परिषदेच्या ध्येय धोरणानुसार कार्यरत राहून परिषदेच्या कार्याचे जाळे महाराष्ट्रात सर्वत्र विणावे व संघटनेचा विस्तार वाढवावा असे निवडपत्रात नमूद करण्यात आले आहे. जिल्हयाच्या राजकीय क्षेत्रात गेल्या १४ वर्षापासून युवासेना जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत असतांना रवि भांदुर्गे यांनी सामाजीक संवेदनाही जपली आहे.

# वाशीम मध्ये राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक संतोषी माता नगर वाशीम येथील अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय येथे दि.३१ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

जयंती कार्यक्रमांचे अध्यक्षस्थानी से.नि.माध्य.शिक्षक आर.पी.कांबळे होते.तर आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन , डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, चंचला बाई गुंजकर, समाज भूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर,वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती.सुरवातीला उपस्थित



मान्यवरांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.नंतर कार्यक्रमांचे अध्यक्ष आर.पी कांबळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अहिल्याबाई होळकर यांनी त्या काळात पतीचे निधन झाल्यानंतर चोख कारभार करून जुन्या चालीरीतीला फाटा देऊन परिवर्तन घडविले.तर अरविंद पडघन यांनी सांगितले की,राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ह्या एक शिस्तबद्ध आणि न्याय देणार्या राजे होत्या.तर त्यांनी महीलांसाठी देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याचवेळी राजकुमार पडघान यांनी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विषयी बोलताना म्हटले की, अहिल्याबाई होळकरांचे पती खंडोबाराय व सासरे मल्हारराव होळकर यांचे निधन झाल्यानंतर त्यांनी सक्षमपणे कारभार केला.तर अंधश्रद्धा व जुन्या चालीरीतीला मुठ माती दिली.एवढेच काय तर चोरांना जमिनी देवून शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. आणि प्रविण पट्टेबहादूर यांनी सांगितले.

# डॉ. माईसाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**वाशीम :** येथून जवळच असलेल्या अडोळी येथे राजकुमार पडघान यांचे निवासस्थानी दि.२९ मे रोजी सायंकाळी ८:०० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय पत्नी डॉ.माई साहेब आंबेडकर यांना त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी सर्व प्रथम डॉ.माईसाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थितांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, यांनी डॉ.माईसाहेब आंबेडकर यांचे जीवनावर बोलताना सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी माता रमाई आंबेडकर यांचे २८ मे १९३५ रोजी वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी निधन झाले.

# रूपाली बाहेती यांच्या सुमधुर वाणीत भक्तिरसाची मेजवानी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

अधिक मासाच्या पावन पर्वानिमित्त कारंजा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील प्राचीन हनुमान मंदिर संस्थानच्या वतीने भव्य संगीतमय सुंदरकांड पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. हा भक्तिमय कार्यक्रम मंगळवार, दि. २ जून रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आला असून, यानिमित्त भाविकांना भक्तिरसात तल्लीन होण्याची संधी मिळणार आहे.

या संगीतमय सुंदरकांडाचे सादरीकरण रूपाली बाहेती यांच्या सुमधुर व प्रभावी वाणीतून होणार आहे. त्यांच्या सुरेल आवाजातून सादर होणारे सुंदरकांड वातावरण भक्तिमय व मंगलमय करणार असून, उपस्थित भाविकांना आध्यात्मिक



आनंदाची अनुभूती मिळणार आहे. अधिक मासाचे धार्मिक महत्त्व लक्षात घेता या कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला, युवक तसेच भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुण्यलाभ घ्यावा, असे आवाहन प्राचीन हनुमान मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. हनुमंताच्या चरणी भक्तीभाव अर्पण करताना संगीत आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम अनुभवण्याची ही सुवर्णसंधी असल्याने भाविकांमध्ये कार्यक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# जीवनात भगवंताची भक्ती जरुरी - पंडित नीरज शर्मा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक जुनी आयडीपी जवाहर कॉलनी येथील श्री जंगलेश्वर संस्थान येथे कथावाचक पंडित नीरज उर्फ लाला कमलकिशोर यांच्या अमृतवाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथेला १ जून रोजी भागवत कथेचे दुसरे पुष्प गुंतताना त्यांनी जीवनामध्ये भगवंताची भक्ती जरुरी आहे, अधिक मास मध्ये श्रीमद् भागवत कथा श्रवण केल्यास यजमान परिवार व भक्तांना दहा पट जास्त लाभ मिळत असतो. मोह माया , द्वेष अहंकार, ही मानवाला नरकात नेते. तर सत्संग चांगले कार्य व्यक्तीला जीवनामध्ये उभारी देते असे प्रतिपादन केले.स्थानिक जवाहर कॉलनी येथील श्री जंगलेश्वर संस्थान मंदिरामध्ये



आयोजित श्रीमद् भागवत कथेमध्ये द्वितीय दिनी त्यांनी वरील प्रतिपादन केले.. सर्वप्रथम कथेचे मुख्य यजमान श्रीमती सुरजकिरण रामगोपाल मालू, खामगाव निवासी डॉक्टर प्रकाश मालू, नंदकिशोर झंवर ,रितेश बाहेती, सो भारती बाहेती, डॉक्टर राहुल भुतडा, सौ.गीता भुतडा, भूषण मालानी, सौ. नीता मालानी, आयुष भुतडा, रुद्रम भुतडा यांनी पूजन करून कथावाचक निरज शर्मा यांचे पुष्पहार देऊन स्वागत सत्कार केला. यावेळी भागवत कथा वाचक नीरज शर्मा यांनी आपल्या कथेतून मानव जन्म भगवंताच्या भक्तीसाठी मिळालेला अमूल्य अवसर आहे. जीवनामध्ये सत्संग व चांगली संगत जरुरी आहे चांगल्या संगतीमध्ये व्यक्तीच्या जीवनाचे कल्याण होते ,त्यामुळे आपण सत्संग व चांगल्या लोकांच्या संपर्कात सदैव राहणे जरुरी आहे. आज लग्न समारंभामध्ये विचित्र प्रकार परंपरेच्या नावाखाली सुरू झाले आहे वास्तविक लग्न समारंभामध्ये कीर्तन, संकीर्तन ,कथा सारखे धार्मिक कार्यक्रमाला महत्व देणे जरुरी आहे. संगीत रजनी च्या नावाने विचित्र प्रकार सुरू आहे.

# पेरणीची घाई नको; घरचे बियाणे वापरा

**अकोला :** येत्या खरीप हंगामामध्ये अल-निनो च्या पार्श्वभूमीवर कमी व असमान पावसाचा अंदाज असून मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. १०० मी.मी पाऊस झाल्यानंतरच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. बाजारातील महागडे सोयाबीन बियाणे न वापरता स्वतःजवळील घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी घेऊन बीजप्रकिया करून बियाणे म्हणून वापर करावा. सोयाबीन पिकाची पेरणी रुंद वरंबा व सरी पद्धतीने (बीबीएफ) किंवा बेडवर टोकन पद्धतीने केल्यास बियाण्याची बचत होऊन अधिक उत्पादनाची हमी असते. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

# कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे 'खेती बचाव अभियान'चा शुभारंभ

## शाश्वत, हवामान-अनुकूल व नैसर्गिक शेतीसाठी जनजागृती अभियानास प्रारंभ

■ प्रतिनिधी | रिसोड ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR), नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने दि. १ जून रोजी करडा, ता. रिसोड, जि. वाशिम येथे 'खेती बचाव अभियान' या महत्त्वपूर्ण जनजागृती उपक्रमाचा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शेतीसमोरील हवामान बदल, जमिनीची घटती उत्पादकता, वाढता उत्पादन खर्च आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर शाश्वत, हवामान-अनुकूल आणि पर्यावरणपूरक कृषी पद्धतींचा प्रसार करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे



शास्त्रज्ञ, शेलगाव घुगे येथील प्रगतशील शेतकरी तसेच नैसर्गिक शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे करडा येथील शेतकरी गोविंद देशमुख यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी शेतीची दीर्घकालीन शाश्वतता, उत्पादनक्षमता आणि नफा टिकवून ठेवण्यासाठी बाह्य कृषी निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

यावेळी कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी हवामान बदलामुळे उद्भवणारे दुष्काळ, अवकाळी पाऊस, तापमानातील अस्थिरता, जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे घटते प्रमाण, वाढते कीड-रोग प्रादुर्भाव आणि जलस्त्रोतांवरील ताण यांसारख्या समस्यांवर सखोल मार्गदर्शन केले. नैसर्गिक शेती, पीक विविधीकरण, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, मृदा व जलसंवर्धन, जैविक निविष्ठांचा वापर तसेच हवामान-स्मार्ट कृषी तंत्रज्ञान यांसंबंधी वैज्ञानिक माहिती व शिफारशी यावेळी देण्यात आल्या.

कार्यक्रमादरम्यान 'खेती बचाव अभियान' अंतर्गत महिनाभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही देण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शेतकऱ्यांना वैज्ञानिक, शाश्वत आणि संसाधन-संवर्धनावर आधारित कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती अधिक उत्पादनक्षम, लाभदायक आणि पर्यावरणपूरक बनविण्याचे आवाहन करण्यात आले.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी!



■ प्रतिनिधी | रिसोड ■

स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे दिनांक ३१ मे रविवार रोजी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. हा सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख आणि उपप्राचार्य संजय नरवाडे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य संजय देशमुख यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या न्यायप्रियतेचे आणि प्रजाहिताच्या विविध निर्णयांचे दाखले देत त्यांच्या महान जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. राजमाता अहिल्यादेवी होळकर या केवळ एक कुशल शासक नव्हत्या, तर त्या न्यायप्रियतेचे आणि जनकल्याणाचे एक महान प्रतीक होत्या.

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध दारू अड्ड्यांवर कारवाई

- ६.३३ लाखांचा मुद्देमाल जप्त व नष्ट
- एकाच दिवशी दोन ठिकाणी छापे;
- अवैध दारू विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध दारू, जुगार, गुटखा व इतर बेकायदेशीर धंद्यांवर आळा घालण्याच्या उद्देशाने वाशीम पोलीस विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने दोन ठिकाणी धडक कारवाई करत तब्बल ६ लाख ३३ हजार रुपयांचा अवैध दारूचा मुद्देमाल जप्त करून नष्ट केला.

पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पोलीस स्टेशन अनसिंग हद्दीतील मोहगव्हाण येथील धरणाच्या काठावर गावठी हातभट्टीची दारू तयार केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार १ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक



घटनास्थळी रवाना करण्यात आले.

पथकाने मोहगव्हाण परिसरात छापा टाकला असता, पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. परिसराची पाहणी केली असता झाडाझुडपांमध्ये तसेच जमिनीत पुरून ठेवलेले २०० लिटर क्षमतेचे २७ ड्रम, १५ लिटरचे २१ पिपे आणि ३० लिटर गावठी हातभट्टीची दारू असा एकूण ५,७४,५०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. हा सर्व माल पंचनामा करून नष्ट करण्यात आला. याप्रकरणी आमिर मोहम्मद नौरंगाबादी (रा. मोहगव्हाण) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, मानोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कार्ली गावातही स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत अमर दादाराव राऊत (रा. कार्ली) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ३५० लिटर सडवा मोहामाच व ३० लिटर गावठी हातभट्टीची दारू, असा ५८,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच्याविरुद्धही महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध दारू विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जिल्ह्यातील गावठी हातभट्टी दारूचे अड्डे समूळ नष्ट करण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना अधिकाधिक छापेमारी करण्याचे आदेश दिले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, सपोनि जगदीश बांगर, पोउपनि शेखर मास्कर तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८५ ■ मंगळवार २ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# विधान परिषदेच्या आखाड्यात 'शेतकरी नेता' विरुद्ध 'उद्योगपती'

## अग्रवाल-लखाणींच्या लढतीने राजकीय वातावरण तापले; कोठारींची माघार ठरणार निर्णायक





**वर्धा जनमाध्यम :** चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी आता शिगेला पोहोचली आहे. महाविकास आघाडी, महायुती आणि अपक्ष उमेदवारांमुळे सुरुवातीला तिरंगी लढतीचे चित्र निर्माण झाले असले, तरी अपक्ष उमेदवार ?ड. सुधीरचंद कोठारी यांच्या संभाव्य माघारीच्या चर्चेमुळे निवडणूक अखेर महाविकास आघाडीचे उमेदवार शैलेश अग्रवाल आणि महायुतीचे उमेदवार अरुण लखाणी यांच्यात थेट होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

महाविकास आघाडीच्या वतीने काँग्रेसचे राष्ट्रीय समन्वयक तथा शेतकरी नेते शैलेश प्रेमकिशोर अग्रवाल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. शेतकरी, ग्रामीण विकास आणि स्थानिक प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडल्याने त्यांचे ग्रामीण भागात मजबूत नेटवर्क असल्याचे मानले जाते. दुसरीकडे महायुतीने उद्योगक्षेत्रातील प्रस्थापित नाव आणि भाजपचे वरिष्ठ नेते अरुण हनुमंत लखाणी यांना उमेदवारी दिली आहे. भाजपची संघटनात्मक ताकद, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रभाव आणि महायुतीचे संख्याबळ हे लखाणी यांच्या विजयाचे प्रमुख आधार मानले जात आहेत.

दरम्यान, अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते तथा हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. सुधीरचंद दौलतचंद कोठारी यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीत रंगत निर्माण केली. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी ते माघार घेण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने अनेक राजकीय गणिते बदलू शकतात. कोठारी मैदानात राहिल्यास काही मतांचे विभाजन होऊ शकते, अशी चर्चा सुरू आहे.

नामांकन प्रक्रियेत शैलेश अग्रवाल यांनी चार, अरुण लखाणी यांनी तीन तर अ‍ॅड. सुधीर कोठारी यांनी एक अर्ज दाखल केला. अशा प्रकारे एकूण आठ नामांकन अर्ज निवडणूक विभागाकडे जमा झाले आहेत.

१८ जून रोजी मतदान होणार असून चंद्रपूर, वर्धा आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांतील एकूण ९७७ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यामध्ये चंद्रपूर महानगरपालिकेचे ६६ सदस्य, चंद्रपूर जिल्ह्यातील १० नगर परिषद व ७ नगर पंचायतींचे ४०३ सदस्य मिळून ४६९ मतदार आहेत. वर्धा जिल्ह्यातील ६ नगर परिषदांचे १८९ आणि ४ नगर पंचायतींचे ७५ असे मिळून २६४ मतदार आहेत. तर गडचिरोली जिल्ह्यातील २४४ मतदार या निवडणुकीत सहभागी होणार आहेत.

निवडणुकीसाठी तीनही जिल्ह्यांमध्ये एकूण १७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून मतमोजणी चंद्रपूर येथे होणार आहे. १८ मेपासून या मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी सर्व उमेदवार, कार्यकर्ते आणि मतदारांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, ही निवडणूक केवळ विधान परिषदेची जागा जिंकण्यापुरती मर्यादित नसून आगामी जिल्हा परिषद, नगरपालिका आणि विधानसभा निवडणुकांची दिशा ठरविणारी ठरू शकते. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही बाजूंनी पडद्यामागे जोरदार मोर्चेबांधणी सुरू असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांवर प्रभाव टाकण्यासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. आता कोठारी यांची अंतिम भूमिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळाचे गणित यावरच या प्रतिष्ठेच्या लढतीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

# वादळाने हिरावले डोक्यावरचे छत

## साहूर येथील गरीब कुटुंब उघड्यावर; शासनाच्या मदतीची प्रतीक्षा



**साहूर जनमाध्यम :** साहूर येथे सोमवारी (१ जून) दुपारी आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने एका गरीब कुटुंबाच्या आयुष्याला मोठा धक्का दिला. मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे रुपेश मोहनराव पेठे यांच्या घरावरील संपूर्ण टीनपत्र्याचे छत उडून गेल्याने हे कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले.

दुपारी सुमारे दोन वाजताच्या सुमारास परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. यावेळी रुपेश पेठे व त्यांची पत्नी घरातच होते. काही क्षणांतच घरावरील संपूर्ण टीनपत्र्याचे छत उडून गेले. त्यामुळे घरातील धान्य, कपडे, भांडी तसेच इतर साहित्य पावसात भिजून अस्ताव्यस्त झाले. एका क्षणात कुटुंबाच्या डोक्यावरचे छत नाहीसे झाल्याने त्यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे.

रुपेश पेठे हे भूमिहीन असून केवळ मोलमजुरीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. घरात आजारी वृद्ध आई असून तिच्या उपचारासाठी आधीच मोठा खर्च झाला आहे.

अशा परिस्थितीत घराची दुरुस्ती करावी की आईच्या उपचारासाठी पैसे खर्च करावेत, असा गंभीर प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आहे.

घटनेची माहिती मिळताच तलाठी विष्णू खरात व कर्मचारी प्रफुल्ल नष्करी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. प्रशासनाने तातडीने नुकसानभरपाई देऊन या आपद्ग्रस्त कुटुंबाला मदतीचा हात द्यावा, अशी मागणी गावकऱ्यांसह पेठे कुटुंबाने केली आहे.

# गोरस संकटाने ६०० दुग्ध उत्पादक रस्त्यावर

## एफडीएच्या कारवाईनंतर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक ; १५ गावांतील शेतकऱ्यांचा एल्गार



**वर्धा जनमाध्यम:-** रामनगर येथील गो-संवर्धन गोरस भंडारावर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) केलेल्या कारवाईचे तीव्र पडसाद आता जिल्ह्यातील दुग्ध उत्पादकांमध्ये उमटू लागले आहेत. गोरस भंडारचे दूध संकलन बंद झाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या १५ गावांतील सुमारे ६०० दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत आपल्या मागण्यांसाठी जोरदार आंदोलन केले.

एफडीएने रविवारी गोरस भंडारातील प्रक्रिया विभागाची पाहणी करून स्वच्छतेबाबत आक्षेप नोंदवत २५.८६ लाख रुपयांचा दुग्धजन्य माल जप्त केला होता. तसेच विविध नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून पुढील आदेशापर्यंत उत्पादन बंद ठेवण्याचे निर्देश दिले. या निर्णयानंतर गोरस भंडार प्रशासनाने दूध संकलन थांबविल्याने हजारो लिटर दूध उत्पादकांच्या माथी मारले गेले आहे.

गोरस भंडारला दररोज सुमारे ११ हजार लिटर गायीच्या दुधाचा पुरवठा केला जातो. या व्यवसायावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. अचानक दूध संकलन बंद झाल्याने दूध कुठे विकायचे, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. त्यामुळे गोरस भंडारचे दूध संकलन व वितरण तातडीने सुरू करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारून सकारात्मक चर्चा केली. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सध्या मदर डेरीला दूध विक्री करण्याचा पर्याय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच गोरस भंडारच्या दूध संकलन व वितरणासंदर्भातील प्रश्नावर दोन दिवसांत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, 'तीन पिढ्यांपासून आम्ही गोरस भंडारला दूध पुरवठा करीत आहोत. इतर डेअरींच्या तुलनेत येथे अधिक दर मिळतो. मदर डेरीकडून कमी दर मिळत असल्याने आमचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे गोरस भंडारचे कामकाज तातडीने सुरू करण्यात यावे, अशी भावना दूध उत्पादक गोविंद डोळे यांनी व्यक्त केली.

प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे आता शेकडो दुग्ध उत्पादकांसह हजारो ग्राहकांचे लक्ष लागले आहे. गोरस भंडारवरील कारवाईचे पडसाद केवळ एका संस्थेपुरते मर्यादित न राहता संपूर्ण दुग्ध व्यवसायावर उमटताना दिसत आहेत.

# उन्हाच्या तडाख्याने केळीची बागायती होरपळल्या

## घड झाडाखाली गळून पडले; विरूळ परिसरातील शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान



**विरूळ आकाजी जनमाध्यम :** यंदाच्या विक्रमी उष्णतेने सर्वसामान्य नागरिकांसह जनावरे आणि शेती पिकांनाही जबर फटका बसला आहे. विरूळ परिसरात प्रथमच मोठ्या प्रमाणात केळीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची स्वप्ने अक्षरशः उन्हाच्या झळांनी होरपळून निघाली आहेत. हिरवीगार डोलणारी केळीची बाग मे महिन्यातील तीव्र उष्णतेसमोर टिकू शकली नाही. परिणामी, झाडांवरील केळीचे घड भाजून खाली गळून पडत असून शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

यावर्षी परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकांना फाटा देत नगदी पीक म्हणून केळीची निवड केली होती. लागवडीनंतर पिकांची वाढही चांगली झाली आणि घड लागण्यास सुरुवात झाली होती. मात्र, मे महिन्यात तापमानाने उच्चांक गाठल्याने केळीच्या पानांसह घडांवरही परिणाम झाला. अनेक ठिकाणी केळीचे घड काळे पडून झाडाखाली कोसळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

हातातोंडाशी आलेले पीक नष्ट झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्च, सिंचन आणि खतांवर मोठी गुंतवणूक केल्यानंतरही अपेक्षित उत्पन्न मिळण्याची आशा मावळली आहे. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी संबंधित कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून तातडीने पंचनामे करण्याची आणि नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे.

उन्हाच्या प्रचंड तडाख्यामुळे केळी उत्पादक शेतकरी हवालदिल झाले असून शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी परिसरातून जोर धरत आहे.

# पोलिसांच्या नावावर भररस्त्यात सोन्याच्या अंगठ्यांवर डल्ला

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरात दोन भामट्यांनी पोलिसांचे नाव वापरून एका प्रतिष्ठित नागरिकाची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (१ जून) दुपारी घडली. या प्रकारामुळे शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत पुन्हा चिंता व्यक्त केली जात आहे. माहितीनुसार, शहरातील एका नामांकित शैक्षणिक संस्थेचे संचालक कामानिमित्त बाहेर गेले असता दोन संशयितांनी त्यांचा पाठलाग केला. हॉटेल समाधान परिसरात दुचाकी आडवी लावून त्यांनी स्वतःला पोलिस अधीक्षक कार्यालयाचे कर्मचारी असल्याचे सांगितले. शहरात चेन स्नॅचिंगच्या घटना वाढल्याने सोन्याचे दागिने काढून ठेवण्याचा सल्ला देण्यात आला.

विश्वास बसल्याने संबंधित नागरिकाने हातातील दोन सोन्याच्या अंगठ्या काढून खिशात ठेवल्या. त्यानंतर फोटो काढण्याच्या बहाण्याने त्यांचे लक्ष विचलित करण्यात आले. घरी परतल्यानंतर खिशातील अंगठ्या तपासल्या असता त्या बनावट असल्याचे लक्षात आले. भामट्यांनी चलाखीने मूळ सोन्याच्या अंगठ्यांची अदलाबदल केली होती.संशयितांपैकी एकाने लाल तर दुसऱ्याने काळा शर्ट घातला होता. ते एमएच-०३ क्रमांकाच्या पल्सर दुचाकीवर आले होते, अशी माहिती तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# जिल्हा पोलिस दलात खांदेपालट; चार अधिकाऱ्यांच्या बदल्या

## संदीप कापडे देवळीचे नवे ठाणेदार

वर्धा जनमाध्यम : जिल्हा पोलिस दलात प्रशासकीय स्तरावर महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले असून पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी चार पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या बदल्यांमुळे देवळी, सावंगी (मेघे) आणि सेलू पोलिस ठाण्यांच्या कारभारात बदल झाला आहे.

जारी आदेशानुसार, नियंत्रण कक्ष डायल ११२ येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप कापडे यांची देवळी पोलिस ठाण्याच्या ठाणेदारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मागील आठवड्यापासून ते प्रभारी म्हणून देवळी पोलिस ठाण्याचा कार्यभार सांभाळत होते. आता त्यांच्याकडे अधिकृतपणे ठाणेदारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.देवळीचे तत्कालीन ठाणेदार अमोल मंडाळकर यांची बदली नियंत्रण कक्ष डायल ११२ येथे करण्यात आली आहे. तसेच ३१ मे रोजी काढण्यात आलेल्या



आदेशानुसार सावंगी (मेघे) पोलिस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज वाघोडे यांची नियुक्ती सेलू पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

दरम्यान, रिडर शाखेत प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक विनोद गिरी यांच्याकडे सावंगी (मेघे) पोलिस ठाण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी ठेवणे, गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना बळकट करणे आणि पोलिस प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने या बदल्या करण्यात आल्याचे मानले जात आहे.या खांदेपालटीमुळे संबंधित पोलिस ठाण्यांच्या कामकाजात नव्या नेतृत्वाची छाप उमटणार असून, नागरिकाभिमुख पोलिसिंगला अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार प्रियंका कैलास कालोकार यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा चांदणी, मौजा नं. ४७, ता. आर्वी जि. वर्धा येथील वार्ड कं. १२, झोन कं. ३, घर/मालमत्ता कं. ?०००१३५६४, शेत सर्वे कं. ९२/१,९३/१ मधील प्लॉट कं. २०/ ब (प्लॉट कं. ९२/९३/१/२०/ब सातबाराप्रमाणे) एकूण आराजी ११२.०० चौ. मी. म्हणजेच १२०५.१२ चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः ज्योती गोल्हर यांचा प्लॉट,
पश्चिमेसः सचिन व?ट्टे यांचे मकान,
उत्तरेसः खाली प्लॉट,
दक्षिणेसः रोड,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २७,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**अ‍ॅड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार अनिल विनायकराव कुकर्डे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा बोरगांव मेघे, ता. जि. वर्धा येथील शेत सर्वे कं. १६३/१/अ मधील प्लॉट कं. ११ चा उत्तरेकडील भाग ज्याची एकूण आराजी ९२.५० चौ. मी. म्हणजेच ९९५.०० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

**पुर्वेसः खुला प्लॉट,**
**पश्चिमेसः रोड,**
**उत्तरेसः चांदेकर यांचा प्लॉट कं. १२,**
**दक्षिणेसः प्लॉट कं. ११ चा उर्वरीत भाग,**

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २४,००,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**अ‍ॅड. सचिन एस. कुरझडकर**
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार सागर हिरामणराव झाडे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा आलोडी, मौजा नं. ७, प. ह. नं. २२, ता. जि. वर्धा ग्राम पंचायत साटोडा च्या हद्दितीलद घर/मालमत्ता कं. २०३२ शेत सर्वे कं. २०/२, ४३ जुना व ४३/२ नविन मधील प्लॉट कं. ३९ चा उत्तरेकडील भाग ज्याची एकूण आराजी ८४.०० चौ. मी. म्हणजेच ९०३.८४ चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

**पुर्वेसः लेआउट रोड,**
**पश्चिमेसः प्लॉट कं. ३७ जुगनाके यांचे घर,**
**उत्तरेसः प्लॉट कं. ३५ मिश्रा यांचे घर,**
**दक्षिणेसः दिलीप श्रीवास्तव यांचे घर,**

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २५,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**अ‍ॅड. सचिन एस. कुरझडकर**
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

## कार्यालय ग्रामपंचायत दहेगांव (मि.)
## पंचायत समिती, वर्धा
## - निविदा सुचना-

ग्रामपंचायत, दहेगांव (मि.) ता.जि.वर्धा कडून सर्व नोंदणीकृत कंत्राटदारांना सूचित करण्यात येते की, पाणी टंचाई योजना सन २०२५-२६ अंतर्गत खालील काम मंजूर असून निविदा दिनांक ०१/०६/२०२६ ते ०९/०६/२०२६ (सुट्टीचे दिवस वगळून) सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावी, निविदा उघडण्याची तारीख येणाऱ्या मासिक सभेत किंवा सोयी नुसार.

| अ.क्र. | फंडाचे नांव व कामाचे नांव | TS No. व प्राकलन किंमत | निविदा फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | पाणी टंचाई योजना २५.२६ अंतर्गत दहेगाव (मि.) अंतर्गत अंबोडा येथे विहीर खोलीकरण करणे. | ९८ दि.३०/०३/२०२६ प्रा.कि.१,९३,७००/- | ५००/- | १३९७/- |

सूचना :- १) कामाची निविदा व अनामत फी शासकीय कपाती सामान्य निधी खाते क्र.**33600100005895**, **IFSC** कोड **BARBOWARDHA** बॅंक ऑफ बडोदा, शाखा वर्धा या खात्यात जमा करावी.
२) कामाच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
३) काम पूर्ण करण्याचा कालावधी ३० जून २०२६ राहील.

**सही/-**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत दहेगाव (मि.)**
**ता.जि.वर्धा**

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत दहेगाव (मि.)**
**ता.जि.वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मूल्याधिष्ठित पत्रकारिता देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**मुंबई/प्रतिनिधी :** मातृभाषा आणि भारतीय भाषांमधून ज्ञान, संस्कृती व मूल्यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतो. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी मातृभाषेतील शिक्षण, भारतीय भाषांचे संवर्धन आणि मूल्याधिष्ठित पत्रकारिता यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबई हिंदी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित हिंदी पत्रकारितेच्या २०० व्या वर्षपूर्ती सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमित साटम, राजहंस सिंह, मुरजी पटेल, संजय उपाध्याय यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हिंदी पत्रकारितेचा इतिहास समृद्ध असून देशाच्या स्वातंर्त्यलढ्यात जनजागृती घडवून आणण्यामध्ये तिचे मोठे योगदान राहिले आहे. उदन्त मार्तण्ड या पहिल्या हिंदी वृत्तपत्रापासून सुरू झालेल्या प्रवासाने देशातील सामाजिक आणि राष्ट्रीय विचारप्रवाहाला दिशा दिली. स्वातंर्त्यलढ्यातील अनेक नेत्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून राष्ट्रभावना जागृत ठेवण्याचे कार्य केले.महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश यांच्यातील सांस्कृतिक व ऐतिहासिक संबंधांचा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीच्या माध्यमातून दोन्ही राज्यांमध्ये शतकानुशतके दृढ संबंध राहिले आहेत. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषा संस्कृत परंपरेतून विकसित झालेल्या असून देवनागरी लिपीमुळे त्यांच्यात नैसर्गिक जवळीक आहे. भारतीय भाषांचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, जगातील बहुतांश विकसित राष्ट्रांमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास ज्ञान अधिक प्रभावीपणे आत्मसात करता येते. त्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मातृभाषेला प्राधान्य देण्याचे धोरण देशाच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रत्येकाने आपल्या मातृभाषेबरोबरच इतर भारतीय भाषांचेही ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, प्रिंट, इलेक्ट्रानिक, डिजिटल आणि सामाजिक माध्यमांच्या विस्तारामुळे माहिती प्रसारणाचे स्वरूप बदलले आहे. तथापि, कोणती बातमी किती वेगाने प्रसारित झाली यापेक्षा तिची सत्यता आणि विश्वासार्हता अधिक महत्त्वाची आहे. लोकशाहीतील चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजजीवनातील मूल्यांचे जतन आणि लोकशाही संस्थांना बळकटी देण्याचे कार्य पत्रकारिता करत असते. बदलत्या काळातही पत्रकारितेने आपल्या मूलभूत मूल्यांचे जतन करीत समाजहिताची भूमिका कायम ठेवावी.उत्तरप्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी यावेळी हिंदी ही तिसरी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा असून भाषा सर्वांना जोडण्याचे काम करते, असे सांगितले.यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते हिंदी पत्रकारितेसाठी योगदान दिलेल्या वरिष्ठ पत्रकार गंगाधर ढोबळे, हेमंत तिवारी, कुमुद संघवी चावरे, विनीत कुमार सिंग, अवधेश व्यास यांचा सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रा.राममोहन पाठक तसेच गायक सुरेश शुक्ला यांचाही यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. मुंबई हिंदी पत्रकार संघाचे महासचिव विजयसिंह कौशिक यांनी प्रास्ताविकात हिंदी पत्रकारितेची २०० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मुंबई हिंदी पत्रकार संघाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगून पत्रकार संघाच्या कार्याची माहिती दिली.

## अन्न व औषध प्रशासनाचा प्रतिबंधित गुटखा, पानमसालावर कारवाई

### 12,16,965 रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात अन्न व औषध प्रशासनाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाल्याविरुद्ध मोहीम सुरू असून ३० व ३१ मे २०२६ या दोन दिवसात तब्बल ३२ आरोपींना अटक करण्यात आली असून, २६ आस्थापना सील व १२ लाख १६ हजार ९६५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई, कोंकण, पुणे, नाशिक व छत्रपती संभाजीनगर, अमरावती या विभागात कारवाई करण्यात आली. त्यात कोकण विभागात तब्बल १६ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून १६ लोकांना अटक करण्यात आली. बृहन्मुंबईत एका ठिकाणी कारवाई करण्यात आली व दोन जणांना अटक करण्यात आली. पुण्यात तीन ठिकाणी कारवाई करून दोन जणांना अटक, नाशिकमध्ये दोन कारवाई, दोन जणांना अटक छत्रपती संभाजीनगरमध्ये ११ कारवाई व सात जणांना अटक करण्यात आली. तसेच अमरावतीमध्ये तीन कारवाई व तीन जणांना अटक करण्यात आली.प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्रेते आणि नियमभंग करणा-या आस्थापनाविरुद्ध भारतीय न्याय संहिता चे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्याचे कलम २६, २७, ३०(२) (a) आणि कलम ५९ अंतर्गत एफआयआर दाखल करून अटक करण्यात आली. अन्नपदार्थाच्या दर्जाबाबत शंका येताच नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा. तक्रार करतेवेळी स्वत?चे नाव व पत्ता/संपर्क क्रमांक, भेसळ केल्या जाणा-या ठिकाणाचा या आस्थापनेचा अचूक पत्ता व कोणत्या अन्नपदार्थात भेसळ केली जाते याची माहिती तक्रारीत नमूद करावी, असे आवाहन आयुक्त मुंढे यांनी केले आहे.

## 78 हजार वृक्ष लागवड आणि इंधन बचतीची व्यापक मोहीम-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या जनमानसाशी अतूट नाळ जुळलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण एसटी परिवाराने स्वच्छ एसटी, हरित एसटी आणि बचत करणारी सक्षम एसटी घडविण्याचा निर्धार करावा, असे आवाहन परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले. एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशात मंत्री सरनाईक म्हणाले की, बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे ब्रीद अंगीकारून एसटीने गेली ७८ वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोप-यात अखंड सेवा पोहोचवली आहे. डोंगर-द-या, दुर्गम आदिवासी भाग, ग्रामीण क्षेत्रे, शहर आणि महानगरांना जोडणारी लालपरी ही केवळ वाहतुकीचे साधन नसून महाराष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची जीवनवाहिनी बनली आहे. एसटीच्या या गौरवशाली प्रवासामागे लाखो अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक, निवृत्त सेवक आणि प्रवाशांचे योगदान असल्याचे नमूद करत त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. अनेक संकटांच्या काळातही एसटी कर्मचा-यांनी निष्ठेने आणि समर्पणाने सेवा देत समाजाप्रती पर्यावरण रक्षण ही केवळ शासनाची नव्हे तर समाजाची सामूहिक जबाबदारी असून एक वृक्ष एक जीवन हा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम एसटी करणार आहे. यासोबतच स्वच्छ एसटी सुंदर एसटी ही संकल्पना

> ■ स्वच्छ, हरित आणि सक्षम एसटी घडवण्याचा संकल्प
>
> ■ एसटीचा ७८ वा वर्धापन दिन

आपले कर्तव्य पार पाडले असून अशा प्रत्येक कर्मचा-याला आज सलाम करण्याची भावना असल्याचे त्यांनी सांगितले.पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाउल टाकत एसटी परिवाराने यावर्षी ७८ हजार वृक्ष लागवडीचा संकल्प केल्याची माहिती देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यातील प्रत्येक आगार, बसस्थानक आणि कर्मचारी या मोहिमेत सहभागी होणार आहे. अधिक व्यापकपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील सर्व बसस्थानके, बसस्थानक परिसर, एसटी बसेस तसेच चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहांची नियमित स्वच्छता आणि टापटीपपणा राखण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुखकर प्रवासाचा अनुभव देणे ही एसटीची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. महामंडळाच्या आर्थिक शिस्तीसाठी इंधन बचतीचे महत्व अधोरेखित करत मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक आगाराने दररोज किमान पाच लिटर डिझेल बचत करण्याचा संकल्प केला आहे. छोट्या-छोट्या बचतीतून मोठी आर्थिक उभारणी शक्य होते. इंधन बचतीमुळे महामंडळाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याबरोबरच प्रदूषण नियंत्रणालाही मोठा हातभार लागणार आहे. त्यामुळे सर्व अधिकारी आणि कर्मचा-यांनी जबाबदारीने काम करून ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन त्यांनी केले. एसटी ही महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे नमूद करत त्यांनी आगामी काळात आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल सुविधा, आर्थिक शिस्त, हरित उपक्रम, स्वच्छता आणि प्रवासी-केंद्रित सेवा यांच्या माध्यमातून एसटीला नव्या उंचीवर नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याची गरज व्यक्तकेली.७८ व्या वर्धापन दिनानिमित्त संपूर्ण एसटी परिवाराने स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि उत्कृष्ट प्रवासी सेवा यांचा संकल्प करून महाराष्ट्राच्या विकासात अधिक प्रभावी योगदान द्यावे, असे आवाहन करत मंत्री प्रताप सरनाईक यांनी अधिकारी, कर्मचारी, चालक-वाहक, निवृत्त सेवक तसेच राज्यातील सर्व प्रवाशांना एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.चला, स्वच्छ एसटी, हरित एसटी आणि सक्षम एसटी घडविण्याचा निर्धार करू या, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
*** Name of the Election : Maharashtra Legislative Council from Amravati Local Authorities Constituency**
**Name of State/UT : Maharashtra**
**(1) Name of the Constituency : Amravati Local Authorities Constituency**
**Name of the candidate : PRAVIN RAMCHANDRA POTE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| 1 | Criminal antecedents | | |
| | a. | Nature of the offences | Nil |
| | b. | Case no. | Nil |
| | c. | Name of the Court | Nil |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | Nil |
| 2 | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **PRAVIN RAMCHANDRA POTE** is very Senior Party Worker & also Ex. State Minister GOM. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : Amravati Local Authorities Constituency**
**Name of the candidate : PRAVIN RAMCHANDRA POTE** ........................................................and so on

* In the case of election to Council of States or States or election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Date : 31/05/2026**
**Place : Mumbai**

## 84 टन भेसळ अन्न पदार्थाचा साठा जप्त

**मुंबई :** अन्न व औषध प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिका-यांनी मोहिमेअंतर्गत २९ ते ३१ मे २०२६ या कालावधीत राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकून आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, गुळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईसक्रिम/कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाल्याचे पदार्थ, शेंगदाणा चिक्की इ. अन्न पदार्थ तसेच भेसळ म्हणून वापरण्यात येणारे अन्न पदार्थाच्या सुमारे ९७ लाख १९ हजार ९६३ रुपये किंमतीचा ८४ हजार ३३५ किलो इतका साठा जप्त केला. अन्न सुरक्षा व मानके कायद्याअंतर्गत मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड व नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती सांभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम या जिल्ह्यांमध्ये कारवाई करण्यात आली. संशयित कमी दर्जा /असुरक्षित अन्नपदार्थ तसेच अस्वच्छ उत्पादन प्रक्रिया आणि दिशाभूल करणारे पॅकिंग यावर कठोर कारवाई करण्यात आली असून सदर अन्नपदार्थाच्या प्रकरणी ४७ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तसेच अन्न नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात तीन ठिकाणी गुळामध्ये साखरेची भेसळ होत असल्याचे निदर्शनास आले असून सदर तिन्ही ठिकाणी मिळून सुमारे १०,६६,२४२ रुपये किमतीचा गुळात भेसळ पदार्थ म्हणून वापरण्यात येणा-या साखरेचा १५,०९६ किलो इतका साठा जप्त करण्यात आला.



## वादळी वा-यासह जोरदार पाउस, केळीसह संत्रा पिकाचे मोठे नुकसान, तीन तालुक्यांचा वीजपुरवठा खंडीत

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील संग्रामपूर, शेगाव, खामगाव तालुक्यात वादळी वा-यामुळे केळी व संत्रा पिकाच मोठं नुकसान झालं आहे. यामुळं तीन तालुक्यात वीज पुरवठा पूर्णतः खंडित झाला आहे. सध्या राज्यातील वातावरणात मोठा बदल झाला आहे. काही भागात उन्हाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे, तर काही भागात अवकाळी पाउस पडत आहे. दरम्यान, बुलढाणा जिल्ह्यात देखील वादळी वा-यासह जोरदार पाउस झाला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर, शेगाव, खामगाव तालुक्यात वादळी वा-यामुळे केळी व संत्रा पिकाच मोठं नुकसान झालं आहे. यामुळं तीन तालुक्यात वीज पुरवठा पूर्णतः खंडित झाला असून, अनेक मार्गांवर झाडे कोसळल्याने मार्गही ठप्प झाला आहे.


**अनेक शेतक-यांच्या केळी आणि संत्रा पीक जमीनदोस्त**

आज सायंकाळी आलेल्या वादळामुळे बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर, शेगाव व खामगाव तालुक्यात फळबाग पिकांच मोठ झाल आहे. संग्रामपूर तालुक्यातील केळी व संत्रा उत्पादक शेतक-यांच या वादळामुळे नुकसान झालं आहे. अनेक शेतक-यांच्या केळी पीक जमीनदोस्त झाल्याने व संत्र्याची झाडे कोसळल्याने नुकसानीचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. तर शेगाव- संग्रामपूर मार्गावर झाड कोसळल्याने शेगाव संग्रामपूर मार्ग बंद आहे. संग्रामपूर - जळगाव जामोद मार्गही अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याने ठप्प झाला आहे. बारामती तालुक्यात देखील अवकाळी पावसासह गारपीट झाली आहे. याचा मोठा फटका शेती पिकांना बसला आहे. फळबागांसह भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याच नुकसानग्रस्त भागाची पाहणी शरद पवार गटाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी केली. सरकार शेतक-याकडे लक्ष देत नसल्याचं वक्तव्य त्यांनी केलं. त्यामुळं लवकरच आम्ही आंदोलन करणार असल्याचे युगेंद्र पवार यांनी सांगितलं.

**भाजीपाला पिकांसह फळबागा जमिनीवर आडव्या**

बारामती तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात रविवारी झालेल्या अवकाळी पाउस आणि गारपिटीने मोठा तडाखा दिला आहे. होळ, सदोबाचीवाडी, वडगाव निंबाळकर, निंबूतसह परिसरातील गावांमध्ये गारपीट झाल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. भाजीपाला पिकांसह फळबागा जमिनीवर आडव्या झाल्यात. यानंतर शरद पवार गटाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनी होळ, सदोबाचीवाडी, वडगाव बुद्रुक यासह इतर परिसरात शेतक-यांच्या बांधावर जाउन या नुकसानीची पाहणी केली आहे. शेतक-यांशी संवाद साधत युगेंद्र पवार यांनी एकूणच परिस्थितीचा आढावा घेतला. सरकार शेतक-याकडे लक्ष देत नाही म्हणून लवकरच आम्ही आंदोलन करणार असल्याचे देखील युगेंद्र पवारांनी सांगितलं.

## सर्वोच्च न्यायालयात पाच नवीन न्यायाधीशांची नियुक्ती



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात पाच नवीन न्यायाधीशांची नियुक्ती केली आहे. केंद्रीय कायदा मंत्रालयाकडून सोमवारी सकाळी यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली. या अधिसूचनेनुसार, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्तझालेल्यांमध्ये ज्येष्ठ वकील व्ही. मोहना, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती शील नागू यांचा समावेश आहे. याशिवाय मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि जम्मू-कश्मीर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पल्ली यांचीही सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा मंत्रालयाने जारी केलेल्या या नव्या नियुक्यांमुळे सर्वोच्च न्यायालयाला पाच नवे न्यायाधीश मिळाले आहेत.

## भारतीय लष्कराकडून पाकिस्तानी तरुणाला अटक

**उरी :** प्रेमासाठी लोक काय करतील याचा नेम नाही. मात्र पाकव्याप्त काश्मीरमधील एका २२ वर्षीय तरुणाने थेट नियंत्रण रेषा ओलांडून उत्तर काश्मीरमधील उरी सेक्टरमध्ये प्रवेश केल्याची घटना समोर आली आहे. भारतीय लष्कराने त्याला ताब्यात घेतले असून पुढील चौकशीसाठी जम्मू-काश्मीर पोलिसांकडे सोपवले आहे. झीशान अहमद मीर असे या तरुणाचे नाव असून तो पाकव्याप्त काश्मीरमधील मुजफ्फराबाद जिल्ह्यातील पैंकाडी गावचा रहिवासी आहे. शनिवारी रात्री तो उरीमधील सिलिकोट परिसरातून भारतीय हद्दीत प्रवेश करत असताना जवानांच्या निदर्शनास आला. त्यानंतर जवानांनी त्याला अडवून ताब्यात घेतले. झीशान ज्या तरुणीला भेटण्यासाठी आला होता, त्या इरम बानो हिलाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. इरम ही नियंत्रण रेषेजवळील तिलावरी गावातील रहिवासी असल्याची माहिती आहे. या घटनेनंतर सोशल मीडियावर एक व्हीडीओ व्हायरल झाला. या व्हीडीओमध्ये झीशान आणि इरम स्वतःची ओळख सांगताना दिसत असल्याचा दावा केला जात आहे. दोघेही एका सुरक्षा अधिका-याच्या प्रश्नांना उत्तरे देत असल्याचे व्हीडीओत दिसते. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, झीशान आणि इरम यांच्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली होती. कालांतराने या ओळखीचे प्रेमात रूपांतर झाले. विशेष म्हणजे दोघेली नातेवाईक असल्याचे सांगितले जात आहे. झीशानचे कुटुंब मूळचे उरी परिसरातील असले तरी अनेक वर्षांपूर्वी ते पाकव्याप्त काश्मीरमध्ये स्थायिक झाले होते. लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, जवानांनी संयम राखत कारवाई केली आणि कोणताही अनुचित प्रकार न घडू देता तरुणाला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी जम्मू-काश्मीर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

## गुजरात टायटन्स संघाच्या बसला भीषण आग;खेळाडू थोडक्यात बचावले

**अहमदाबाद/वृत्तसंस्था-** आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यानंतर गुजरात टायटन्सच्या टीम बसला आग लागली. संघ नरेंद्र मोदी स्टेडियमवरून हाटेलकडे जात असताना ही घटना घडली. आग लागली तेव्हा सर्व खेळाडू बसमध्येच होते. रविवारी अहमदाबाद येथे झालेल्या अंतिम सामन्यात रायल चॅलेंजर्स बंगळूरने गुजरातला ५ गडी राखून पराभूत करून आपली दुसरी ट्राफी जिंकली. मिळालेल्या माहितीनुसार, शार्ट सर्किटमुळे आग लागली होती, जी वेळीच लक्षात आली. सर्व खेळाडूंना तात्काळ बसमधून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. आयपीएल फायनलनंतर, गुजरात टायटन्सचे खेळाडू नरेंद्र मोदी स्टेडियमवरून त्यांच्या हाटेलकडे टीम बसने प्रवास करत असताना त्यांच्या बसमध्ये शार्ट सर्किट होउन आग लागली. मिळालेल्या माहितीनुसार, खेळाडूंना तात्काळ बाहेर काढण्यात आले. दिलासादायक बाब म्हणजे, कोणताही खेळाडू जखमी झाला नाही.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## आर्थिक राजधानीला धोका

पाकिस्तानची गुप्तहेर संस्था इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) आणि कुख्यात दहशतवादी दाऊद इब्राहिम याच्या टोळीशी संबंधित नऊ हस्तकांना दिल्ली पोलिसांनी पकडले आणि दिल्ली व मुंबईवर मोठा दहशतवादी हल्ला करण्याचा कट उधळला गेला. दिल्ली पोलिसांची दक्षता व सुरक्षा दलाच्या गुप्तचर यंत्रणेची सतर्कता यामुळे देशावर होऊ घातलेल्या दहशतवादी हल्ल्याचे संकट टळले. केवळ मुंबई, दिल्लीतच नव्हे, देशातील अन्य शहरांतील महत्त्वाच्या ठिकाणांवरही दहशतवादी हल्ले करण्याची योजना होती.अणू प्रकल्प, ऊर्जा प्रकल्प, विमानतळ, रेल्वेस्थानके आदींवर दहशतवादी हल्ले झाले असते, तर देशात मोठा हाहाकार उडाला असता. अशा हल्ल्यात किती लोकांचे बळी गेले असते, याची कल्पनाही करणे कठीण आहे. देशावरील दहशतवादी हल्ले रोखण्यात पोलिस व सुरक्षा दलाला यश मिळाले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. देशात मुंबई व दिल्ली ही दोन्ही महानगरे अत्यंत महत्त्वाची आहेत. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहेच शिवाय देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईची लोकसंख्या दीड कोटीच्या घरात, तर दिल्लीची त्याहीपेक्षा जास्त आहे. दिल्ली ही देशाची राजधानी आहे. या दोन्ही महानगरांत वित्तीय संस्था, राष्ट्रीय बँका, उद्योग समूहांची कार्यालये आहेत. दिल्लीत संसद भवन, दूतावास व राजकीय पक्षांची मुख्यालये आहेत. या दोन महानगरांत यापूर्वी अनेकदा दहशवादी हल्ले झाले आहेत. शेकडो निरापराध लोकांचे अशा हल्ल्यात बळी पडले आहेत.संसदेवर झालेला दहशतवादी हल्ला व मुंबईवर कसाब व त्याच्या टोळीने समुद्रमार्गे येऊन केलेला दहशतवादी हल्ला या घटनांनी जगाला हादरा बसला होता. या दोन्ही हल्ल्यांत सर्व दहशतवादी हल्लेखोर ठार झाले. एकाला फाशी झाली; पण मुंबई व दिल्ली ही महानगरे आजही आयएसआयच्या रडारवर आहेत, हे या निमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. दिल्ली व मुंबईवर दहशतवाद्यांचे आत्मघाती हल्ले होणार असल्याची माहिती दिल्ली पोलिसांना मिळाली. बॉम्बस्फोट घडवून व गोळीबार करून अशांतता व घबराट माजविण्याचा मोठा कट आखला गेला होता. राजकीय व अर्थव्यवस्थेचा मोठा आधार असलेल्या व देशाला अर्थशक्ती देणाऱ्या या दोन महानगरांत दहशतादी हल्ले केल्यानंतर देशाच्या स्थैर्याला धोका पोहोचू शकतो, अशा पद्धतीने या हल्ल्यांची आखणी करण्यात आली होती. पंधरा दिवसांपूर्वीच पुणे आणि झारखंडमधील साहिबगंज येथून दोन गुन्हेगार तरुणांना पोलिसांनी अटक केली होती. शार्प शूटर म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या संपर्कात आयएसआयने आखलेल्या कटातील काही दहशतवादी होते, असे चौकशीत आढळून आले.देशात विविध ठिकाणी दहशतवादी हल्ले करण्यासाठी तरुणांची भरती करण्याचे कामही चालू होते. हल्ले घडविल्यानंतर लाखो रुपयांची मोठी रक्कम देण्याचे आमिष त्यांना दाखवले जात होते. दहशतवादी टोळीतील नऊ जणांना अटक केल्यानंतर त्यांच्या मोबाईलमध्ये मुंबई-दिल्लीतील अनेक महत्त्वाच्या व संवेदनशील जागांचे फोटो दिल्ली पोलिसांना आढळून आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची चौफेर प्रगती चालू आहे. जगातील टॉप फाईव्ह अर्थव्यवस्थांमध्ये देश येत असून आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने देशाची वाटचाल चालू आहे. अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धामुळे जगात अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. इंधनाचे दर वाढत आहेत; पण तुलनेने भारतात जनजीवन सुरळीत आहे. नेमके हेच पाकिस्तानला खूपत असावे.भारतात अशांतता व अस्थिरता निर्माण व्हावी, यासाठी आयएसआय गेली अनेक वर्षे कारवाया करीत आहे. दहशतवाद्यांना प्रशिक्षण देऊन भारतात घुसवून हल्ले, रक्तपात घडविण्याचे कारस्थान चालू आहे. दिल्ली पोलिसांच्या जागरूकतेमुळे हा कट उघडकीस आला व मुंबई व दिल्लीवर हल्ले होण्यापूर्वीच नऊ दहशतवादी जेरबंद केले गेले. पुलवामा व पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानातील दहशतवादी केंद्रावर एअर स्ट्राईक करून तेथील असंख्य अड्डे उद्ध्वस्त केले. 'ऑपरेशन सिंदूर'मधून पाकिस्तानला धडकी भरेल अशी भारतीय सेनेने कारवाई केली; पण त्यानंतरही भारतात घुसून, दहशतवादी हल्ले करून अस्थिरता व अशांतता घडविण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न चालूच आहे.मुंबई, दिल्ली अशा महानगरांत पाकिस्तानी व बांगला देशी घुसखोर वर्षानुवर्षे राहत आहेत. देशात नेमके किती घुसखोर आहे, याची निश्चित आकडेवारी कोणी सांगू शकत नाही; मात्र मुंबई, दिल्ली, कोलकाता या महानगरांत तसेच पश्चिम बंगाल, आसाम व इशान्येकडील राज्यांत घुसखोरांची संख्या मोठी आहे. आसाम व पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार आल्यापासून तेथील घुसखोरांमध्ये घबराट पसरली आहे. आता आपल्याला भारतात संरक्षण मिळणार नाही, याची त्यांना खात्री पटली आहे. केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार आल्यापासून बेकायदा बांधकामे, सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे, अनधिकृत झोपडपट्ट्या हटविण्याचे काम देशभर चालू आहे. उत्तर प्रदेश व पश्चिम बंगालमध्ये तर बुलडोझर चालवून बेकायदा बांधकामे पाडली जात आहेत.मुंबईत रेल्वे रुळालगत असलेल्या झोपडपट्ट्यांमध्येही हे गुन्हेगार वर्षानुवर्षे आश्रय घेत आहेत. मुंबईच्या पश्चिम उपनगरातील वांद्रे रेल्वेस्थानकात रेल्वे रुळाला लागून मोठी झोपडपट्टी होती. गरीबनगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाप्रचंड बेकायदा झोपडपट्टीला काँग्रेसच्या काळात कोणाची हात लावण्याची हिम्मत झाली नव्हती. आता केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आहे. बेकायदा बांधकामे व घुसखोरांच्या विरोधात कठोर कारवाई ही भाजपची भूमिका आहे. गरीबनगर हे गुन्हेगारांचे मोठे केंद्र बनले होते. गरीबनगर साफ झाले म्हणून त्याचा बदला घेण्यासाठी मुंबईत दहशतवादी हल्ला करण्याचा कट रचला जात होता, अशी माहिती मुंबई पोलिसांना तपासात मिळाली आहे. देशाच्या सुरक्षेसाठी दहशतवादाविरोधातील लढा सातत्याने आणि अधिक प्रभावीपणे सुरू ठेवणे गरजेचे आहे. त्याचवेळी सुरक्षा यंत्रणांची सतर्कता, नागरिकांचे सहकार्य आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी यांच्याद्वारेच मुंबई, दिल्लीसारख्या महत्त्वाच्या शहरांचे सुरक्षित आणि स्थिर भविष्य सुनिश्चित करता येईल.



## राज्यसभेचे चित्र लवकरच पालटणार

**दिवसेंदिवस विधानसभा निवडणुकांचे महत्त्व वाढत आहे. राज्यसभेतील ताकद वाढवायची असेल तर केवळ लोकसभा निवडणुका जिंकून चालत नाही. राज्यांमध्ये मजबूत संघटन, प्रभावी नेतृत्व आणि सत्तेवर पकड असणे आवश्यक असते.**

लोकसभेत स्पष्ट बहुमत असलेल्या सरकारला राज्यसभेतील संख्याबळाच्या मर्यादांमुळे अनेकदा धोरणात्मक अडचणींचा सामना करावा लागतो. म्हणूनच राज्यसभा निवडणुका सत्तासंतुलनाचा निर्देशांक मानल्या जातात. जूनमध्ये दहा राज्यांमधील २४ राज्यसभा जागांसाठी होणाऱ्या निवडणुकांनंतर राज्यसभेचे राजकीय चित्र बदलणार असून सत्ताधारी, 'इंडिया आघाडी' आणि प्रादेशिक पक्षांच्या भूमिकेवर परिणाम दिसून येणार आहे. चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीनंतर पुढच्या महिन्यात राज्यसभेच्या २४ जागांसाठी तसेच एका जागेवरील पोटनिवडणुकीसाठी मतदान होत आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या रिक्त जागेवर निवडणूक होत आहे. ही जागा राष्ट्रवादीच्या कोट्यातील आहे. त्यामुळे पवार जो उमेदवार देतील, तो निवडून येईल. महायुतीकडे २३० हून अधिक आमदार असल्याने कदाचित निवडणूक बिनविरोध होईल. वास्तविक, २४ जागांची निवडणूक फार मोठी वाटत नाही.

राज्यसभेची एकूण सदस्यसंख्या २४५ असून त्यापैकी बहुसंख्य जागांवर आधीच सदस्य कार्यरत आहेत, तरीदेखील या निवडणुकांचे महत्त्व कमी होत नाही. कारण राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह असले, तरी त्याची राजकीय रचना दर दोन वर्षांनी हळूहळू बदलत असते. प्रत्येक निवडणूक भविष्यातील सत्तासंतुलनाला आकार देत असते. या वेळीही तसेच घडण्याची शक्यता आहे. उपलब्ध विधानसभा गणिताचा विचार केला तर आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश, मणिपूर आणि काही ईशान्येकडील राज्यांमध्ये सत्ताधारी एनडीए कवा त्यांचे मित्रपक्ष स्पष्टपणे मजबूत स्थितीत आहेत. दुसरीकडे, कर्नाटक, झारखंड आणि काही प्रमाणात राजस्थानमध्ये विरोधी पक्षांना काही जागा मिळण्याची संधी आहे; मात्र एकूण परिणामांचा विचार करता या निवडणुकांमधून 'एनडीए'चे संख्याबळ वाढण्याची शक्यता अधिक आहे. विशेषतः आंध्र प्रदेशमधील बदल अत्यंत महत्त्वाचा ठरू शकतो.

गेल्या विधानसभा निवडणुकीत आंध्र प्रदेशमध्ये तेलुगू देसम पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि जनसेना पक्षाच्या आघाडीने प्रचंड विजय मिळवला. त्याचा थेट परिणाम राज्यसभा निवडणुकीत दिसणार आहे. चारही जागा 'एनडीए'च्या खात्यात जाण्याची शक्यता आहे. यातील काही जागा पूर्वी वायएसआर काँग्रेसकडे होत्या. त्यामुळे राज्यसभेत 'वायएसआर' काँग्रेसचा प्रभाव कमी होणार असून 'एनडीए'ची ताकद वाढणार आहे. दक्षिण भारतातील राजकीय समीकरणांच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा आहे. गुजरातमध्येही भाजपचे वर्चस्व कायम आहे. त्या राज्यातही चारही जागा भाजपच्या झोळीत जाण्याची शक्यता असल्याने विरोधकांचे अस्तित्व आणखी कमी होईल. एके काळी काँग्रेसचा मजबूत प्रभाव असलेल्या या राज्यात आज राज्यसभा प्रतिनिधित्वातही भाजपची जवळपास एकाधिकारशाही दिसू लागली आहे. यामुळे राष्ट्रीय स्तरावर भाजपचे विधिमंडळातील स्थान अधिक मजबूत होणार आहे. मध्य प्रदेशमध्ये परिस्थिति याहून वेगळी नाही. विधानसभा निवडणुकीतील दणदणीत विजयामुळे भाजपकडे राज्यसभेच्या तीनही जागा जकण्यासाठी आवश्यक संख्याबळ आहे. परिणामी, काँग्रेसची एक जागा कमी होण्याची शक्यता आहे. दिग्विजय सह यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याची मुदत संपल्यानंतर काँग्रेसला ती जागा टिकवून ठेवता आली नाही, तर ते पक्षासाठी राजकीय आणि मानसिक दोन्ही स्तरांवर नुकसानकारक ठरेल. कर्नाटक हे या निवडणुकीतील सर्वाधिक लक्षवेधी राज्य ठरू शकते. येथे काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत असल्यामुळे तीन जागा 'इंडिया' आघाडीच्या खात्यात आणि एक जागा 'एनडीए'कडे जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे विरोधकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल;

असे असले तरी, राज्यसभेतील एकूण चित्र बदलण्यासाठी हे पुरेसे ठरणार नाही. कारण इतर अनेक राज्यांमधील नुकसान त्यावर मात करू शकणार नाही. झारखंडमध्ये इंडिया आघाडीला दोन्ही जागा मिळण्याची शक्यता आहे. यामुळे विरोधकांची उपस्थिती कायम राहील; परंतु राष्ट्रीय स्तरावर त्याचा प्रभाव मर्यादित असेल. राजस्थानमध्ये दोन जागा भाजपकडे तर एक जागा काँग्रेसकडे जाण्याची शक्यता असल्याने विद्यमान संतुलनात फारसा फरक पडणार नाही. या निवडणुकांनंतर राज्यसभेतील संख्यात्मक स्थितीकडे पाहिले, तर 'एनडीए'ची ताकद काही जागांनी वाढण्याची चिन्हे आहेत. या वाढीमुळे त्यांना तात्काळ स्पष्ट बहुमत मिळणार नसले, तरी विधेयके मंजूर करताना आणि संसदीय रणनीती आखताना त्यांना अधिक सोयीची परिस्थिती निर्माण होईल. विशेषतः भाजपला मित्रपक्षांच्या मदतीने सभागृहात अधिक आत्मविश्वासाने काम करता येईल. लोकसभा निवडणुकीत २०२४ मध्ये भाजपला एकहाती बहुमत मिळाले नाही आणि एनडीए सरकारला मित्रपक्षांच्या आधारावर सत्तेत यावे लागले. त्यामुळे अनेक विश्लेषकांनी केंद्र सरकारच्या निर्णयक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित केले होते; मात्र राज्यसभेतील वाढते संख्याबळ या आघाडी सरकारसाठी महत्त्वाचे सुरक्षा कवच ठरू शकते. अनेक महत्त्वाच्या विधेयकांना राज्यसभेची मंजुरी आवश्यक असते. अशा वेळी सभागृहात मजबूत उपस्थिती असणे हे कोणत्याही सरकारसाठी मोठे राजकीय बळ असते. दुसरीकडे विरोधी 'इंडिया' आघाडीसमोर नवीन आव्हान उभे राहणार आहे. लोकसभा निवडणुकीत तुलनेने चांगली कामगिरी करूनही राज्यसभेतील संख्या वाढवण्यात त्यांना फारसे यश मिळताना दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे अनेक राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमधील त्यांची कमकुवत स्थिती. राज्यसभा सदस्यांची निवड ही विधानसभेतील संख्याबळावर आधारित असल्यामुळे सत्ता नसलेल्या कवा पुरेसे आमदार नसलेल्या राज्यांमध्ये जागा मिळवणे जवळपास अशक्य असते. या निवडणुकांमधून आणखी एक महत्त्वाचा संदेश मिळतो.

**अशोक धगे**

## सार्वजनिक क्षेत्रे:डॉ मनमोहनसिंगांच्या राजवटीत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या राजवटीत



पंतप्रधान मोदींच्या राजवटीला नुकतीच १२ वर्षे झाली. गेल्या १२ वर्षातील या राजवटीचा लेखाजोखा मांडला जात आहे. त्यात अर्थातच मोदी राजवटीची आर्थिक नीती आणि त्याचे देशाच्या अर्थव्यस्वस्थेवर झालेले परिणाम हि एक प्रमुख थीम असते. मोदी राजवटीच्या प्रवक्त्यांकडून हे आवर्जून सांगितले जाते की मोदी , डॉ मनमोहनसिंग यांनी जी आर्थिक धोरणे राबवली तीच पुढे घेऊन जात आहेत.

(डॉ मनमोहनसिंग १९९१ ते १९९६ मध्ये अर्थमंत्री म्हणून आणि नंतर २००४ ते २०१४ पर्यंत पंतप्रधान म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेच्या ड्रायव्हिंग सीटवर होते हे आपल्याला आठवत असेलच)

पण खरेच तसे ते आहे का ? आर्थिक धोरणांची रेंज बरीच रुंद असते. या पोस्टमध्ये आपण त्यातील फक्त एका, म्हणजे सार्वजनिक उपक्रमांबाबत या दोन राजवटीतील धोरणांची तुलना करणार आहोत. या दोन्ही राजवटींनी सार्वजनिक उपक्रमांबाबत अमलात आणलेल्या धोरणात गुणात्मक फरक आहे.

१. मनमोहन सिंग यांनी अनेक औद्योगिक क्षेत्रात खाजगी क्षेत्राला अवकाश प्राप्त करून दिला. पण त्यासाठी अस्तित्वात असणाऱ्या सार्वजनिक उपक्रमांना वाऱ्यावर सोडले नाही. त्यांच्या कार्यकाळात सार्वजनिक उपक्रमांना बरेच अर्थसाहाय्य दिले गेले.

२.'जाखाऊ' आर्थिक धोरणे भारतासाठी अंगिकारल्यानंतर देखील भारतासारख्या देशात सार्वजनिक उपक्रमांचा मोठा रोल असेल हे मनमोहनसिंग यांनी जाणले होते. तर शासनासाठी there is no business to be in the business हा दृष्टिकोन मोदींच्या राज्यात अमलात येताना दिसतो

३. मनमोहन सिंगांनी सार्वजनिक उपक्रमांच्या खाजगीकरणावर भर न देता सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी संपुष्टात आणली (त्याला अ-monopolization असे म्हणतात). या दोन भिन्न गोष्टी आहेत.

४. स्वातंत्र्यानंतर अमलात आणल्या गेलेल्या विविध औद्योगिक धोरणांप्रमाणे १९९१ पूर्वी १७ उद्योग असे होते ज्यात खाजगी भांडवली गुंवणूकीला मज्जाव होता ; त्यापैकी १२ उद्योग क्षेत्रात त्याकाळात सार्वजनिक उपक्रमांच्या जोडीला खाजगी क्षेत्रातील कंपन्यांना देखील मुभा देण्यात आली.

५.सार्वजनिक उपक्रम विकायला काढतांना नफ्यातील उद्योग नाही तर प्रामुख्याने आजारी उद्योगांना प्राधान्य दिले गेले ;

६.बाजाराधिष्टित अर्थव्यवस्थेला अवकाश प्राप्त करून देतांना नियोजन आयोग सुरूच होता तो अगदी २०१७ पर्यंत. हे महत्वाचे आहे.

७. १९९१ मध्ये केंद्र सरकारच्या अखत्यारीत २४४ सार्वजनिक उपक्रम होते , त्यांची संख्या नंतर २०१४ पर्यंत वाढत जाऊन ३३७ पर्यंत पोचली होती.

डॉ मनमोहन सिंग यांच्या आर्थिक सुधारणा देशात निःसंदिग्धपणे भांडवलशाही प्रणाली बळकट करणाऱ्याच होत्या. तर मोदी राजवटीत मक्तेदार आणि वित्त भांडवलशाही ( मोनोपोली फायनान्स कॅपिटल) बळकट केली जात आहे. जी स्पर्धेवर आधारित क्लासिकल औद्योगिक भांडवलशाही अधिक/ आणि वेल्फेअर स्टेट या मॉडेलपेक्षा भिन्न आहे. या भिन्न प्रणालीचे देशावर (सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि राजकीय) होणारे परिणाम अधिक गंभीर असतात. ज्याचा अनुभव देश घेत आहे.

गेल्या बारा वर्षात देशातील किती क्षेत्रात मूठभर मोठ्या कंपन्यांकडे त्या क्षेत्रातील महाकाय मार्केट शेयर एकवटला आहे आणि वित्त भांडवलाचे देशाच्या अर्थव्यवस्थेत कसे pen-etration सुरू आहे याची माहिती कोणालाही नेट वर मिळू शकेल. ती बघतली की वरील वाक्याचो अर्थ लागतील.

**संजीव चांदोरकर**

## भावगीतांची सम्राज्ञी हरपली

आपल्या मधुर आणि सुश्राव्य आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय संगीत क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला असून संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. मराठी भावगीत, भक्तीगीत आणि हिंदी चित्रपट संगीतात त्यांनी दिलेले योगदान कधीही न विसरता येणार आहे. कला क्षेत्रातील त्यांच्या अफाट कामगिरीची दखल घेऊन भारत सरकारने २०२३ साली त्यांना 'पद्मभूषण' या नागरी पुरस्काराने सन्मानित केले होते.सुमनजींनी केवळ मराठी आणि हिंदीच नाही, तर बंगाली, उडिया, पंजाबी, राजस्थानी, कानडी आणि भोजपुरी अशा अनेक प्रादेशिक भाषांमध्ये हजारो गाणी गायली. गझल, ठुमरी आणि भक्तीगीते गाण्यात त्यांना विशेष गोडी होती.निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई हे सिनेगीत तर केशवा माधवा हे भक्तिगीत खूप गाजले आहे.सुमन कल्याणपूर यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एक अथांग आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. त्यांच्या जाण्याने संगीत विश्वासह चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

**राजू जाधव**

## चित्रपट संगीतातील सुवर्ण युगाचा अंत

आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या गायकीने तब्बल सहा दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या जाण्याने भारतीय सुगम आणि चित्रपट संगीतातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला आहे. एकीकडे गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा अलौकिक दैवी स्वर आणि दुसरीकडे आशाताईंचा एक अष्टपैलू आणि विलक्षण जादुई स्वर अशा परिस्थितीत मंगेशकर भगिनींच्या त्या सुवर्णकाळात सुमन कल्याणपूर यांनी संगीताच्या दुनियेत स्वतःचे असे अढळ स्थान निर्माण केले. सुमन कल्याणपूर यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, ओडिया यांसह अनेक प्रादेशिक भाषांमध्ये हजारो गाणी गायली. त्यांच्या आवाजातील मखमलीपणा हीच त्यांची खरी ताकद होती. 'केतकीच्या बनी तिथे नाचला ग मोर', 'रिमझिम झरती श्रावणधारा', 'नाविका रे वारा वाहे रे', 'अरे संसार संसार','निंबोणीच्या झाडामागे','नकळत सारे घडले' आणि 'केशवा माधवा' यांसारखी अनेक अजरामर गाणी आजही प्रत्येक मराठी रसिकांच्या कानी रुंजी घालत आहेत. मोहम्मद रफी यांच्यासोबत त्यांनी गायलेली 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे','ना ना करते प्यार तुम्ही से कर बैठे', तुमने पुकारा और हम चले आये' अशी अनेक द्वंद्वगीते आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. संगीत क्षेत्रातील त्यांच्या या अद्वितीय कामगिरीची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना २०२३ मध्ये 'पद्मभूषण' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविले. तसेच इतर अनेक सांगीतिक पुरस्कारांसह त्यांना महाराष्ट्र शासनाच्या 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' सन्मानित करण्यात आले. भारताच्या या थोर गानकोकिळेला भावपूर्ण सुमनांजली!

**- प्रदीप मोरे**

## विषारी दारूचे बळी

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात विषारी दारू प्यायल्याने गेल्या तीन दिवसात २३ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने राज्यभर खळबळ माजली आहे. विषारी दारूच्या या मृत्यकांडाने सर्वसामान्य नागरिकांनाच नाही तर सरकारलाही धक्का बसला आहे. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले असून या दारूकांडला जबाबदार असणाऱ्या काही अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई देखील केली आहे. अर्थात सरकारने केलेली ही कारवाई योग्यच आहे असे म्हणावे लागेल कारण संबंधित अधिकाऱ्यांनी जर आपले कर्तव्य चोख बजावले असते तर हे २३ जीव वाचले असते. आता या दारुकांडाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई होईल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. या विषारी दारूकांडाने सपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली असली तरी विषारी दारू पिऊन मृत्यूकांड घडल्याची ही देशातील पहिली घटना नाही याआधी अशा अनेक घटना घडल्या आहे. त्यात अनेकांचा जीव गेला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये बिहारमध्येच ४० जणांचा विषारी दारूने बळी घेतला होता. विशेष म्हणजे बिहारमध्ये संपूर्ण दारू बंदी आहे असे असतानाही तिथे खुलेआम दारूविक्री होते. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पंजाबमध्येही अशा घटना घडल्या आहेत. पंजाबमध्ये तर विषारी दारूने एकाच वेळी ९० जणांचा बळी घेतला होता. काही वर्षापूर्वी मुंबईतही अशी दुर्दैवी घटना घडली होती. मुख्यमंत्र्यांनी या घटनेच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाईचे संकेतही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत ही स्वागतार्ह बाब असली तरी त्यातून काही सध्या होईल असे वाटत नाही.

एखादी मोठी दुर्दैवी घटना घडली किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा दौरा असला तरच कारवाईचे नाटक केले जाते आणि काही दिवसांनी पुनश्च हरीओम होतो. दारू माफिया व पोलिस आणि प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी यांच्या अभद्र युतीमुळेच अशा दुर्दैवी घटना घडतात. जोवर ही भ्रष्ट युती तुटत नाही आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही तोवर अशा घटना थांबतील असे वाटत नाही. या घटनेची देशभर चर्चा झाल्याने पुणे पोलिसांवरील दबाव वाढला त्यामुळे त्यांनी काही लोकांना अटक केली. मात्र ही कारवाई एवढ्यावरच न थांबवता पोलिसांनी यामागील पाळेमुळे शोधून काढली पाहिजे.

**श्याम ठाणेदार**

मंगळवार, दि. २ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# यवतमाळ विधान परिषद रणसंग्राम रंगला..!

## महायुतीतच तिरंगी सामना, अंतिम दिवशी महाविकास व अपक्ष यांचे अर्ज दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे

**यवतमाळ, दि. १ :** यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी नामांकन अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी राजकीय घडामोडींना मोठा वेग आला. महाविकास आघाडी आणि महायुतीतील प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने ही निवडणूक आता अत्यंत प्रतिष्ठेची ठरणार असून, विशेषतः महायुतीतील घटक पक्षांमध्येच थेट सामना रंगण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत.

निवडणूक विभागातून एकूण ५५ नामांकन फॉर्मची उचल करण्यात आली होती. अंतिम दिवशी पाच उमेदवारांनी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी विकास मीना यांच्याकडे आपले नामनिर्देशन अर्ज सादर केले.







महाविकास आघाडीकडून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तर महायुतीत मात्र एकाच उमेदवारावर एकमत न झाल्याचे चित्र दिसून आले. शिवसेना (शिंदे गट) कडून विद्यमान आमदार दुष्यंत चतुर्वेदी, भारतीय जनता पक्षाकडून नितीन भुतडा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून साजिद बेग मिर्झा यांनी स्वतंत्रपणे अर्ज दाखल केल्याने महायुतीतच तिरंगी संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. महायुतीतील या राजकीय घडामोडींमुळे मैत्रीपूर्ण लढत होणार की शेवटच्या क्षणी एकमताचा फॉर्म्युला निघणार, याकडे जिल्ह्यासह राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सय्यद फारुख सय्यद करीम यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उडी घेतल्याने समीकरणे आणखी गुंतागुंतीची होण्याची शक्यता आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार २ जून रोजी अर्जांची छाननी, ४ जूनपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत, १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान, तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. ही जागा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींमार्फत निवडली जाणार असल्याने जिल्ह्यातील नगरपरिषदा, नगरपालिका तसेच इतर स्थानिक संस्थांतील सदस्यांचे मतदान निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत राजकीय भेटीगाठी, पक्षांतर्गत चर्चा आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याची चुरस वाढण्याची शक्यता आहे.निवडणूक निर्णय अधिकारी विकास मीना आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनिरुद्ध बक्षी यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून, संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील ही निवडणूक आता केवळ एका जागेची लढत न राहता महाविकास आघाडी आणि महायुतीतील अंतर्गत राजकीय शक्तीपरीक्षेचे केंद्रबिंदू बनली आहे.

### महायुतीचा अधिकृत उमेदवार दुष्यंत चतुर्वेदीच – पालकमंत्री संजय राठोड



**यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत दुष्यंत चतुर्वेदी हेच महायुतीचे अधिकृत उमेदवार असून त्यांना विजयी करण्यासाठी महायुतीचे सर्व घटक पक्ष आणि मतदार एकजुटीने प्रयत्न करतील, असा विश्वास पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला.**

**राठोड म्हणाले की, राज्यातील स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या १७ जागांसाठी महायुतीने एकत्रित रणनीती आखली असून त्यामध्ये ११ जागा भाजप, ४ जागा शिवसेना आणि २ जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) लढवत आहे. याच सूत्रानुसार यवतमाळची जागा शिवसेनेकडे देण्यात आली असून पक्षश्रेष्ठींनी दुष्यंत चतुर्वेदी यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले आहे. ते पुढे म्हणाले की, यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात शिवसेना अनेक वर्षांपासून उमेदवार देत आली असून या जागेवर पक्षाची मजबूत पकड आहे. त्यामुळेच पक्ष नेतृत्वाने पुन्हा एकदा शिवसेनेलाच उमेदवारी दिली आहे. काही मित्रपक्षांकडून स्थानिक उमेदवाराची मागणी करण्यात आली होती, मात्र अंतिम निर्णय हा पक्षश्रेष्ठींच्या स्तरावर घेतला जातो. "महायुतीमध्ये कोणताही मतभेद नाही. पक्षश्रेष्ठींनी दिलेला निर्णय सर्वांनी मान्य करायचा असतो. दुष्यंत चतुर्वेदी हेच महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत आणि त्यांच्याच विजयासाठी सर्वजण एकदिलाने काम करतील असेही त्यांनी स्पष्ट केले.**

# युवा संघर्ष संस्थेचा महिला सक्षमीकरणासाठी प्रभावी उपक्रम



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १ :** कान्हा, ता. महागांव, जि. यवतमाळ येथे युवा संघर्ष फाउंडेशनच्या वतीने आयोजित महिला टेलरिंग प्रशिक्षण बॅच उत्साहात यशस्वीरित्या पूर्ण झाली. या उपक्रमात ३५ महिलांनी सहभाग घेत आधुनिक शिवणकलेचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणादरम्यान महिलांना लघुउद्योग मार्गदर्शन, व्यवसाय नियोजन आणि स्वावलंबनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. प्रशिक्षणानंतर सर्व सहभागी महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. युवा संघर्ष संस्था महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीसाठी सातत्याने कार्यरत असून आजपर्यंत हजारो युवक-युवतींना प्रशिक्षण देत स्वावलंबनाकडे वाटचाल घडवून आणली आहे.

संस्थेचे संस्थापक सागर गोविंदवाड यांच्या नेतृत्वाखाली विदर्भातील सर्व जिल्ह्यात विविध ग्रामीण भागात मार्गदर्शन शिबिरे आयोजित करून ग्रामीण नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे.

**"गावागावात विकास... प्रत्येक हाताला रोजगार..." "महिला सक्षम तर समाज सक्षम"**

# विमा,ऊसबिल आणि खत लुटीवर शेतकऱ्यांचा संताप..!

## उमरखेडमध्ये उपविभागीय कार्यालयावर धडक मोर्चा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १ :** गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीचा विमा अद्याप न मिळाल्याने, उस उत्पादकांची थकीत बिले आणि खत-बियाण्यांच्या वाढत्या दरांविरोधात सोमवारी कृषीजीवी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देण्यात आले.

आंदोलकांनी सांगितले की, सन २०२५ मधील अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले होते. प्रशासनाने पंचनामे करूनही अनेक शेतकऱ्यांचे विमा दावे कंपन्यांनी नामंजूर केले. परिणामी नुकसान सहन करूनही शेतकरी विमा लाभापासून वंचित राहिले आहेत. दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर झाल्यानंतरही विमा कंपन्या टाळाटाळ करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. उस उत्पादक शेतकऱ्यांची तीन महिन्यांपासून बिले थकीत असल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. खरीप हंगाम तोंडावर असताना पेरणीसाठी आवश्यक भांडवल नसल्याने शेतकऱ्यांना कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. दुसरीकडे खत, बियाणे आणि कीटकनाशकांच्या वाढीव दरांमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.



मोर्चादरम्यान पंडागळे साहेब, बळवंत चव्हाण, आदित्य काळे, डॉ. घोडेकर, सुरेश कदम, सरोज देशमुख, निवृत्ती पाटील वानखेडे, दिनेश रावते, दत्तराव शिंदे, राजूभैय्या जयस्वाल आदींनी मनोगत व्यक्त करून शासनाच्या धोरणांवर टीका केली. शेतकरी प्रतिनिधींनी प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम देत विमा प्रकरणे निकाली काढावीत, उसाची थकीत बिले अदा करावीत व खत-बियाण्यांच्या दरांवर नियंत्रण आणावे, अशी मागणी केली. अन्यथा मंत्री, आमदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यालयांसमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

# थोडक्यात

## पांढरकवड्यात वादळी पावसाचा तडाखा; पिकांसह पक्ष्यांचेही मोठे नुकसान

**पांढरकवडा :** दुपारी सुमारे ३:३० वाजताच्या सुमारास पांढरकवडा शहर व परिसरात वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या या वादळी पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



प्राथमिक पाहणीनुसार अनेक शेतांमध्ये झाडे उन्मळून पडल्याचे आढळून आले. जोरदार वाऱ्यामुळे फळझाडे तसेच उभी पिके प्रभावित झाली आहेत. अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. वादळाचा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता पक्ष्यांनाही बसला आहे. उंच झाडांवरील घरटी आणि पक्ष्यांची आश्रयस्थाने उद्ध्वस्त झाल्याने पोपट, बगळे व इतर पक्षी जखमी अवस्थेत जमिनीवर पडल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले.

दरम्यान, अजय सोळंके यांच्या शेतात एका झाडावरून पडलेले चार पक्षी जखमी अवस्थेत आढळले. त्यांनी या पक्ष्यांना तात्पुरत्या स्वरूपात पिंजऱ्यात ठेवून प्राथमिक उपचार केले असून त्यांची प्रकृती सुधारल्यानंतर उद्या त्यांना पुन्हा नैसर्गिक अधिवासात सोडण्यात येणार असल्याची माहिती दिली. या वादळी पावसामुळे अजय सोळंके यांच्या शेतातील पेरू व आंब्याच्या झाडांसह इतर पिकांचेही नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी प्रशासनाने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## मुकुटबनमध्ये मटका-झेंडीमुंडीचा सुळसुळाट..!

**पोलिसांची कारवाई कुठे? बीट जमादाराविरोधात ग्रामस्थांचा संताप**

**झरी :** मुकुटबन परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून मटका, झेंडीमुंडी आणि अन्य अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत असून, यामुळे स्थानिक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अवैध जुगारामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गावातील काही ठिकाणी मटका व झेंडीमुंडीचे अड्डे नियमितपणे सुरू असून, त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. या प्रकारामुळे अनेक युवक आणि अल्पवयीन मुलांमध्ये जुगाराचे आकर्षण वाढत असल्याची चिंता पालक व्यक्त करीत आहेत. काही शेतकरी व कुटुंबांनी आर्थिक नुकसान झाल्याच्या चर्चाही गावात रंगत आहेत.ग्रामस्थांचा आरोप आहे की, अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित धंद्यांवर प्रभावी कारवाई झालेली दिसून येत नाही. त्यामुळे अवैध व्यवसायांना कोणाचे संरक्षण मिळत आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, मुकुटबन आणि घोंसा परिसरात अवैध धंद्यांचे प्रमाण वाढल्याची चर्चा असून, पोलिस प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे. बसस्थानक परिसरापासून काही भागांत जुगार खेळणाऱ्यांची गर्दी दिसून येत असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. त्यामुळे महिला, विद्यार्थिनी आणि सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचेही सांगितले जात आहे. गावकऱ्यांच्या मते, अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनी अधिक सक्रिय होण्याची गरज आहे. जर अवैध व्यवसाय सुरूच असतील, तर संबंधितांवर कारवाई का होत नाही, असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.दरम्यान, मुकुटबन परिसरातील कथित मटका व झेंडीमुंडी अड्ड्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही तपासणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# मविआचा उमेदवारी अर्ज दाखल..!

## महायुतीविरोधात एकजुटीचा एल्गार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १ :** यवतमाळ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने आज जोरदार शक्तिप्रदर्शन करत निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात केली.



महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी नामांकन अर्ज दाखल केल्यानंतर यवतमाळ येथील हिरा पॅलेस सभागृहात नगरसेवक व पदाधिकाऱ्यांची भव्य बैठक पार पडली. या बैठकीत काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) तसेच मित्रपक्ष व अपक्ष नगरसेवकांनी एकजुटीचे दर्शन घडवत कांबळे यांच्या विजयाचा निर्धार व्यक्त केला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बोलताना साहेबराव कांबळे यांनी ही निवडणूक केवळ राजकीय नसून संविधान, लोकशाही आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारांच्या रक्षणाची लढाई असल्याचे सांगितले. जिल्ह्याच्या विकासासाठी आणि लोकप्रतिनिधींच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री शिवाजीराव मोघे होते. त्यांनी महायुती सरकारच्या धोरणांवर जोरदार टीका करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारांवर गदा आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप केला. या निवडणुकीत महाविकास आघाडीला भक्कम पाठिंबा देऊन सत्ताधाऱ्यांना राजकीय संदेश देण्याचे आवाहन त्यांनी केले. ज्येष्ठ काँग्रेस नेते माणिकराव ठाकरे यांनीही संविधानिक मूल्यांचे संरक्षण आणि लोकशाही बळकटीसाठी महाविकास आघाडी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. बैठकीला खासदार, आमदार, माजी मंत्री, जिल्हा पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नगरसेवक उपस्थित होते. हिरा पॅलेस येथे झालेल्या या शक्तिप्रदर्शनामुळे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणूक अधिक रंगतदार बनली असून महाविकास आघाडीने विजयासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केल्याचे स्पष्ट संकेत या बैठकीतून मिळाले.

# तंबाखूमुक्तीचा निधी कुठे गेला?

## जागतिक दिनी शपथही नाही, १९.२१ लाखांच्या चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १ :** जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्हाभर जनजागृती, शपथविधी आणि विशेष उपक्रमांचे आयोजन होणे अपेक्षित असताना जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकडून कोणतीही ठोस हालचाल दिसून आली नसल्याचा आरोप गुरुदेव युवा संघाने केला आहे.

तंबाखू नियंत्रण व जनजागृती अभियानासाठी खर्च करण्यात आलेल्या सुमारे १९ लाख २१ हजार रुपयांच्या निधीच्या वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी संघटनेचे अध्यक्ष मनोज गेडाम यांनी केली आहे. जागतिक तंबाखू विरोधी दिनासारख्या महत्त्वाच्या दिवशी साधा शपथविधी कार्यक्रमही आयोजित करण्यात आला नसल्याने प्रशासनाच्या उदासीनतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या सेवनामुळे कर्करोगासह गंभीर आजारांचे प्रमाण वाढत असताना जनजागृती मोहिमा प्रभावीपणे राबविण्याऐवजी केवळ कागदोपत्री अहवालांवर भर दिला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. गुरुदेव युवा संघाने यापूर्वीही आरोग्यमंत्र्यांकडे निवेदन सादर करून तंबाखूमुक्ती अभियानासाठी झालेल्या खर्चाची चौकशी करण्याची मागणी केली होती. जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे आणि ग्रामीण भागात सातत्यपूर्ण जनजागृती कार्यक्रम अपेक्षित असताना प्रत्यक्षात त्याचा प्रभाव दिसून येत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तंबाखू नियंत्रणासाठी उपलब्ध झालेला निधी नेमका कोणत्या उपक्रमांवर खर्च करण्यात आला, याची माहिती सार्वजनिक करावी तसेच स्वतंत्र लेखापरीक्षण करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी मनोज गेडाम यांनी केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास गुरुदेव युवा संघाच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.





# अपघाताची वाट पाहत आहे का प्रशासन?

## फुलसावंगी-महागाव मार्गावरील पुलाचे कठडे गायब

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. १ :** फुलसावंगी-महागाव या अत्यंत वर्दळीच्या मुख्य मार्गावरील पुलाची दुरवस्था गंभीर बनली असून पुलाचे संरक्षण कठडे पूर्णपणे गायब झाल्याने मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे वाहनधारक व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

फुलसावंगी ते महागाव मार्गावर दिवस-रात्र लहान-मोठ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र जेएसपीएम शाळेजवळील पुलावरील संरक्षण कठडे तुटून नष्ट झाले असून पुलाच्या कडेला असलेला डांबरी रस्तादेखील खचत चालला आहे. त्यामुळे रस्त्यालगत मोठा खड्डा निर्माण झाला असून वाहनधारकांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. पुलाच्या बाजूला वाढलेली झुडपे, साचलेला कचरा आणि पाण्यामुळे तयार झालेले शेवाळ यामुळे रस्त्याची वास्तविक स्थिती लक्षात येत नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधार आणि समोरून येणाऱ्या वाहनांच्या प्रखर प्रकाशामुळे चालकांचा अंदाज चुकल्यास वाहन थेट पुलाखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी व वाहनचालकांनी अनेकदा संबंधित विभागाचे लक्ष वेधूनही अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे 'एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का?' असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहेत. कोणताही मोठा अनर्थ घडण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने पुलाची पाहणी करून नवीन मजबूत संरक्षण कठडे उभारावेत, तसेच खचलेल्या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.



> **"फुलसावंगी-महागाव मार्गावरील संबंधित पुलाच्या संरक्षण कठड्यांच्या बांधकामासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. प्रशासकीय प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच नवीन कठडे उभारण्याचे काम हाती घेतले जाईल."**
>
> **- शुभम काळे,**
> **अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महागाव**

# सोलर बसवूनही वाढीव वीजबिलाचा शॉक!

## महावितरणच्या हलगर्जीपणाचा ग्राहकाला आर्थिक फटका

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १ :** महागाव येथील महावितरण कार्यालयाच्या बेजबाबदार कारभारामुळे एका महिला ग्राहकाला मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा प्रकार समोर आला आहे. घरावर सोलर ऊर्जा प्रणाली बसवून तसेच स्मार्ट मीटर बसविण्यात आल्यानंतरही नेट मीटरिंगची जोडणी वेळेत न केल्याने संबंधित ग्राहकाला वाढीव वीजबिलाचा फटका बसला आहे.

माहितीनुसार, महागाव येथील रहिवासी सौ. सुनिता सुभाष रामकर (ग्राहक क्र. ३८६५९०००७९५७) यांनी १ मार्च २०२६ रोजी आपल्या निवासस्थानी सोलर प्रणाली बसवून घेतली. त्यानंतर महावितरणकडून स्मार्ट मीटरही बसविण्यात आले. मात्र सोलर प्रणाली आणि स्मार्ट मीटर यांच्यातील महत्त्वाची नेट मीटरिंग जोडणी अद्याप करण्यात आली नसल्याचा आरोप ग्राहकाने केला आहे. नेट मीटरिंगची प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने सोलरद्वारे निर्माण होणाऱ्या वीजेचा लाभ ग्राहकाला मिळू शकला नाही. परिणामी अपेक्षेपेक्षा जास्त वीजबिल आकारण्यात आल्याचे समोर आले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून सौ. रामकर या समस्येच्या निराकरणासाठी महावितरण कार्यालयात वारंवार पाठपुरावा करत आहेत. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही होत नसल्याची तक्रार त्यांनी केली आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार, "वीजबिल कमी करून देतो," असे सांगून अधिकाऱ्यांकडून वेळकाढूपणा केला जात आहे. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणात स्मार्ट मीटरही डिस्कनेक्ट करण्यात आल्याने ग्राहकांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. महावितरणच्या हलगर्जीपणामुळे आर्थिक नुकसान सोसावे लागत असल्याने संबंधित ग्राहकाने उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता, महावितरण कार्यालय महागाव यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनाद्वारे वाढीव वीजबिलाची दुरुस्ती करून दिलासा द्यावा, बंद करण्यात आलेले स्मार्ट मीटर तातडीने सुरू करावे तसेच नेट मीटरिंगची प्रक्रिया पूर्ण करून न्याय द्यावा, अशी मागणी सुनिता रामकर यांनी केली आहे.महावितरणच्या कारभारामुळे ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याने या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.



### विद्यापीठ भरतीतील कथित आर्थिक वसुली प्रकरणी

# युवक काँग्रेस-एनएसयूआयचे घेराव आंदोलन

## एनएसयुआय प्रदेशाध्यक्ष धडकले विद्यापीठात



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नोकरभरती प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कन्सल्टन्सीकडून उमेदवारांकडून कथितपणे १०,००० रक्कम मागितल्याच्या प्रकरणावरून अमरावती शहर युवक काँग्रेस व एनएसयूआयच्या वतीने सोमवारी विद्यापीठ प्रशासनाचा घेराव घालण्यात आला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी कुलगुरू व विद्यापीठ प्रशासनाकडे संबंधित कन्सल्टन्सीची चौकशी करून तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या नावावर आर्थिक वसुली करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

युवक काँग्रेस व एनएसयूआयच्या पदाधिकाऱ्यांनी बेरोजगार युवकांची फसवणूक सहन केली जाणार नसल्याचा इशारा देत, दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला. आंदोलनादरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थी व युवक उपस्थित होते.'विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी लढा सुरूच राहील, भरती प्रक्रियेत भ्रष्टाचार खपवून घेतला जाणार नाही,' अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी एनएसयुआय प्रदेश अध्यक्ष सागर साळुंखे, एनएसयुआय शहर अध्यक्ष संकेत साहू, अमरावती जिल्हा आद्योगिक सेल अध्यक्ष समीर जवंजाळ, अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख, बडनेरा विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष आशिष यादव,,एनएसयुआय प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट, एनएसयुआय जिल्हाअध्यक्ष सर्वेश खांडे,शुभम बांबल, प्रियल मोहोड, धनंजय बोबडे, कृणाल गावंडे, श्रेयस धर्माळे, शुभम हिवसे, ओम कुबडे, मोहित भेंडे, वेदांत केने , आदित्य देशमुख, अभिषेक भोसले, साहिल वानरे, निशांत पवार, आदित्य देशमुख, विशाल तायडे यांच्यासह युवक काँग्रेस व एनएसयुआयचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# ३ हजार ३६७परीक्षार्थींनी दिली राज्यसेवा पूर्व परीक्षा

### १ हजार ३३७परीक्षार्थी होते गैरहजर

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणारी महाराष्ट्र राजपत्रित संयुक्त नागरी सेवा पूर्व परीक्षा रविवारी शहरातील १६ उपकेंद्रांवर सुरळीत पार पडली. परीक्षेसाठी ४,७८४ उमेदवार पात्र होते. प्रत्यक्षात पहिल्या पेपरला ३,४१५, तर दुसऱ्या पेपरला ३,३६७परीक्षार्थी हजर राहिल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

राज्यसेवा परीक्षेतील (राजपत्रित अधिकारी) हे महत्त्वाचे पद समजले जाते. ही परीक्षा पूर्व, मुख्य आणि मुलाखत अशा तीन टप्प्यांमध्ये घेतली जाते. अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगणारे लाखो विद्यार्थी दरवर्षी ही परीक्षा देत असतात. यातील पूर्व परीक्षा ही रविवार, दि. ३१ मे रोजी पार पडली. यात पहिला पेपर सामान्य अध्ययन २०० गुण, तर दुसरा पेपर बुद्धिमत्ता चाचणी, तर्कशक्ती २०० गुण अशी एकूण ४०० गुणांची ही परीक्षा होती. पहिला पेपर हा सकाळी १०:०० ते १२:०० या वेळेत पार पडला. यावेळी पहिल्या पेपरला ३ हजार ४१५ परीक्षार्थी हजर होते. तर १ हजार २८९ परीक्षार्थी हे गैरहजर तर दुसरा पेपर ३ ते ५ या कालावधीत पार पडला. या पेपरला ३ हजार ३६७ परीक्षार्थी हजर, तर १ हजार ३३७ परीक्षार्थी हे गैरहजर राहिले.

# महागाईविरोधात भाकपचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने




**अमरावती/का.प्र.**

गॅस, पेट्रोल, डिझेल तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींविरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्ष, अमरावती जिल्हा कौन्सिलच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी बोलताना पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की, केंद्र व राज्य शासनाच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे महागाई सातत्याने वाढत असून सर्वसामान्य जनता, शेतकरी, शेतमजूर, कामगार, कर्मचारी, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक यांचे जीवन संकटात सापडले आहे.यावेळी निवेदनाद्वारे घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती तात्काळ कमी करण्यात याव्यात. पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून इंधनाचे दर कमी करावेत. वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष कृती आराखडा जाहीर करावा. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना आवश्यक वस्तूंवर अधिक अनुदान उपलब्ध करून द्यावे. सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक सक्षम करून सर्व पात्र कुटुंबांना अन्नधान्यासोबत खाद्यतेल, डाळी व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यात याव्या कामगार, शेतकरी, मजुर व असंघटीत क्षेत्रातील कष्टकरी जनतेसाठी विशेष दिलासा योजना लागू कराव्यात. शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात व पुरेसे डिझेल उपलब्ध करून द्यावे. इत्यादी मागण्या करण्यात आल्या.आंदोलनात भाकपचे तुकाराम भस्मे,अशोक सोनारकर, सुनिल मेटकर,डॉ. ओमप्रकाश गुडमाटे, चंद्रकांत बानूबाकोडे,सुनील घटाळे, निळकंठ ढोके,जे. एम. कोठारी, उमेश बनसोड, जयेंद्र भोगे, चंद्रकात वडस्कर,जितेंद्र कोरडे,संजय लांजेवार, दिनेश धुर्वे,प्रज्ञा बनसोड,मनोहर वाढोणकर,संतोष सुरजुसे,हरिदास बुरे,बाबाराव इंगळे, लता हिवरकर, भोपतराव सोनवने, पंचफुला शिंदे, अंबादासजी शेंडे,लता सोनारकर,संतोष राऊत,संजय मंडवधरे,दिगांबर नगेकर,सुशिल ढोले,राजेश मेश्राम,ईस्राईल शहा,सुनिता चहांदे,विनोद तेहेकर उपस्थीत होते.

# प्लास्टिक कचरा आता रस्ते बांधकामासाठी उपयोगात आणणार

## एनजीओंनी पुढाकार घेतल्यास प्रकल्पाला वेग

**अमरावती/का.प्र.**

पर्यावरणासाठी घातक ठरणारा प्लास्टिक कचरा आता रस्ते बांधकामासाठी उपयोगात आणण्याची तयारी सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरू केली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत तब्बल ३ हजार ५९८ किलोमीटरचे विविध मार्ग असून, भविष्यात डांबरी मार्गांच्या निर्मितीत प्लास्टिक कणांचा वापर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आकार घेत आहे. डांबरामध्ये सुमारे ८ टक्के प्लास्टिकचे बारीक कण मिसळून अधिक मजबूत आणि टिकाऊ मार्ग तयार केले जाणार आहेत. विशेष म्हणजे, या संदर्भात शासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचनाही प्राप्त झाल्या आहेत.

जिल्ह्यातील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्गांमध्ये काही रस्ते डांबरीकरणाचे तर बहुतांश रस्ते सिमेंट काँक्रिटीकरणाचे आहेत. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानानुसार आता डांबरी मार्ग अधिक टिकाऊ करण्यासाठी प्लास्टिक मिश्रित डांबराचा पर्याय पुढे येत आहे. विदेशातील अनेक देशांमध्ये तसेच पुणे, मुंबईसारख्या महानगरांमध्ये या तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर सुरू असून, त्याच धर्तीवर अमरावतीतही भविष्यात अशा मार्गांची उभारणी होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, या संदर्भात शासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचनाही प्राप्त झाल्या आहेत. मात्र, अमरावती जिल्ह्यात प्लास्टिक कचऱ्यापासून रेतीसारखे कण तयार करणारी यंत्रणा किंवा उद्योग अद्याप कार्यरत नसल्याने या उपक्रमाला गती मिळालेली नाही. प्लास्टिकचे बारीक कण तयार करण्यासाठी विशेष मशिनरीची आवश्यकता असून, स्वयंसेवी संस्था किंवा उद्योजकांनी यासाठी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट आणि मजबूत मजबूत रस्ते निर्मिती या तिहेरी फायद्यामुळे हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. भविष्यात अमरावतीतही प्लास्टिक रोडची संकल्पना प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**प्लास्टिकमिश्रीत रस्त्यांमुळे अनेक फायदे**

प्लास्टिक मिश्रीत रस्ते तयार झाल्यास, प्लास्टिक कचऱ्याची प्रभावी विल्हेवाट लागेल. डांबरी रस्त्यांचे आयुष्य वाढणार आहे. पावसामुळे रस्ते खराब होण्याचे प्रमाण कमी होईल. पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाला चालना मिळले. स्थानिक स्तरावर नव्या उद्योगांना संधी मिळेल.

**एनजीओंनी पुढाकार घेतल्यास प्लास्टिक रस्त्यांचा मार्ग मोकळा**

शासन स्तरावरून प्लास्टिक मिश्रित डांबरी रस्त्यांबाबत सकारात्मक सूचना प्राप्त झाल्या आहेत. डांबरामध्ये ८ टक्के प्लास्टिक कणांचा वापर केल्यास रस्ते अधिक टिकाऊ होण्यास मदत होते. मात्र, त्यासाठी प्लास्टिकपासून कण तयार करणारी यंत्रणा आवश्यक आहे. अमरावतीत स्वयंसेवी संस्था किंवा उद्योजकांनी या क्षेत्रात पुढाकार घेतल्यास भविष्यात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्लास्टिकयुक्त डांबरी रस्त्यांची निर्मिती करता येईल, असे सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभीयंता डॉ. आर. वाय. पाटील यांनी सांगितले.

# जिल्ह्यात अकरावीच्या ४३ हजार ११० जागा

**अमरावती/का.प्र.**

केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने सुरू असलेल्या अकरावी प्रवेशाची पहिली सर्वसाधारण यादी जाहीर झाली असून महाविद्यालये अलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना येत्या ३ जूनपर्यंत प्रवेश निश्चित करावयाचे आहेत. यापूर्वी शून्य फेरी अंतर्गत अल्पसंख्यांक इनहाऊस कोटा, कोटा, व्यवस्थापनाच्या कक्षेतील प्रवेशाची संधी देण्यात आली होती. त्यामुळे त्या-त्या कोट्याशी संबंधित विद्यार्थ्यांनी आपापले प्रवेश निश्चित करून घेतले आहेत. त्यानुसार इनहाऊस कोटामधून विद्यार्थ्यांनी तर अल्पसंख्यांक कोट्यातून ९८४ जणांनी प्रवेश झाले आहे. तसेच व्यवस्थापनाचो २१३ विद्यार्थ्यांनी निश्चित केले आहे.

जिल्ह्यात विज्ञान शाखेच्या सर्वाधिक १८ हजार ५७० जागा आहेत. त्या खालोखाल कला शाखेच्या १८ हजार ३०० जागा आहेत. वाणिज्य शाखेच्या ६ हजार २४० जागा आहेत. अशाप्रकारे जिल्ह्यात एकूण ४३ हजार ११० विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश दिला जाऊ शकतो. त्यांच्या पसंतीक्रमानुसार जो महाविद्यालय मिळू शकते, त्यानुसारची यादी जाहीर करण्यात आली आहे. अल्पसंख्यकांचा कोटा ५ हजार ८०० जागांचा असून इनहाऊस कोट्यासाठी ३ हजार ७८९ जागा आहेत. रविवार हा सुटीचा दिवस असला तरी प्रवेश प्रक्रियेचे कामकाज सुरूच होते. जिल्ह्यातील सर्वच महाविद्यालयांना तशा सूचना देण्यात आल्या होत्या. विद्यार्थी-पालकांची गैरसोय टाळण्यासाठी हा प्रवेशाचा विभाग सुरू ठेवण्यात आला होता.

**जिल्हा शाखा निहाय**

| शाखा | जागा |
|---|---|
| विज्ञान | १८५७० |
| कला | १८३०० |
| व्यावसायिक | ६२४० |
| एकूण | ४३११० |

# नवीन बोअरवेलमुळे सात तालुक्यांमध्ये जलस्तर चिंताजनक

**१५० विहिरींच्या निरीक्षणातून वास्तव समोर**

भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत जिल्ह्यातील ६३ पाणलोट क्षेत्रांमधील (वॉटरशेड) विहिरींची पाणी पातळी वर्षातून चार वेळा (ऑक्टोबर, जानेवारी, मार्थ आणि में) तपासली जाते. ताज्या अहवालानुसार, ७ तालुक्यांमधील जलस्तर अतिशय चिंतनीय स्थितीत पोहोचला असून, काही मोजक्याच ठिकाणी किंचित वाढ दिसून आली आहे.

**अमरावती/का.प्र.**

गेल्यावर्षी १ जून ते ८ या कालावधीत अमरावती जिल्यात ७५७.१ मिमी इतका समाधानकारक पावसाची नोद झाली होती. मात्र, निसर्गाची ही भूजल पातळीत सरासरी १ मीटरपेक्षा जास्त घट झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. यावर्षीच्या तीव्र उन्हाळ्यामुळे जिल्हयात मोठ्या प्रमाणावर अनियंत्रितपणे खोदण्यात आलेल्या नवीन बोअरवेल (कृपनलिका) या घसरणीला कारणीभूत उरल्या आहेत. अनेक तालुक्यांमध्ये तर ही घट २ मीटरपेक्षाही अधिक असून, आताच ठोस पावले न उचलल्यास आगामी काळात अमरावती जिल्हयाला



तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची भीती व्यक्त होत आहे.

भुजल सर्वेक्षण यंत्रणेच्या जिल्ह्याची सरासरी भूजल पातळी ७.२० मीटर होती. मात्र, जानेवारी २०२६ मध्ये ती ७.७० मीटरपर्यंत खाली आली, म्हणजेच भूजल पातळीत ०.४९ मीटरची बेट घट नोंदवली गेली. मे महिन्यातील १४ जिल्ह्यातील एकूण तालुक्यांपैकी ७ तालुक्यांमधील जलस्तर मागील पाच वर्षांच्या तुलनेत झपाट्याने घटला असून, उर्वरित तालुक्यांमध्ये तो जेमतेम टिकून आहे. खंडेश्वर (२.२१ मोटर, सर्वाधिक तालुक्यांमध्ये प्रामुख्याने नांदगाव घट), चिखलदरा (१.८७ मीटर), धारणी (१.८५ मीटर) आणि वरुड (१.१२ मीटर), या भागांचा समावेश आहे. या घसरणीमागील मुख्य कारणे आहेत. जिल्ह्यातील वरुड. अचलपूर आणि अंजनगाव सुर्जी या भागांमधील भूजल उपसा आता आणि मर्यादित भूजल पुनर्भरण ही तातडीने नियंत्रित करणे गरजेचे आहे.

**उपाययोजना काय हव्यात ?**

भविष्यातील हे भीषण संकट टाळण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणेवर विसंबून न राहता 'लोकसहभाग' अत्यंत महत्त्वाचा असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यासाठी 'जलयुक्त शिवार' सारख्या योजनांच्या माध्यमातून पाणी पातळी खोल गेलेल्या भागात युद्धपातळीवर कामे करणे. स्थानिक धरणांमधील गाळ काढणे आणि नवीन बंधारे बांधून पाणी अडवणे. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून विविध शोषखड्डयांच्या (सोक पिट्स) माध्यमातून ते पुन्हा जमिनीत जिरवणे, अशी कामे करणे आवश्यक आहे. ज्यामुळे परिसरातील विहिरींच्या जलस्तरात वाढ होईल.

# बेघर निराधार लोकांसाठी मनपाची शोध मोहीम

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका अमरावती आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा बडनेरा आयुक्त वर्षा लड्डा यांच्या आदेशानुसार चला करूया,स्वच्छ अमरावती सुंदर अमरावती बेघर भिक्षेकरी मुक्त अमरावती अंर्तगत शोध मोहीम उपायुक्त योगेश पीठे यांच्या दिशा निर्देशाने व धनंजय शिंदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

राजापेठ, नवाथे,सातुर्णा, बडनेरा,जुनी वस्ती रेल्वे स्टेशन बस स्टॅन्ड चपराशी पुरा, शेगाव नाका, नवसारी, ईरविन चौक, रेल्वे स्टेशन, नवसारी, पंचवटी, बस स्टेशन, येथून बेघर लोकांचा शोध घेण्यात आला लोकांशी संवाद साधला. यावेळी मानसिक आजारी व्यक्तीला आधार केंद्रात दाखल करण्यात आले.



यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजीव बसवनाथे,आरोग्य विभाग नितीन नांदुरकर यांनी कार्यवाही केली. अमरावती बडनेरा शहरातील अशा प्रकारचे गरजू लोक आढळल्यास भूषण बाळे,ज्योती राठोड व्यवस्थापक आधार शहरी बेघर लोकांसाठी निवारा बडनेरा मो.९९७५७३७४४७, ९४२२९५६९१६ यावर संपर्क साधावा.

# जीवनावश्यक वस्तूंच्या किमती गगनाला भिडल्या

## तांदूळ, तूर आणि हरभरा मागोमाग साखरही महाग

**अमरावती/का.प्र.**

इराण आणि अमेरिका-इस्रायल युद्धांमुळे कच्च्या तेलाच्या तुटवड्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा परिस्थितीत, पौष्टिक आहार आता सर्वसामान्यांसाठी एक गरज बनत आहे.

डाळी आणि तांदूळ यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही गगनाला भिडल्या आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीमुळे धान्याच्या किमतीही उच्चांकी पातळीवर पोहोचल्या आहेत. इतक्या वर्षांत धान्याच्या किमतीत झालेली ही पहिलीच अशी घसरण आहे. ही वाढ कुठेही दिसून आलेली नाही. रोजच्या जीवनात ताटात डाळ, भात, भाज्या आणि पोळी यांचा समावेश असतो. उन्हाळ्यात भाज्यांची आधीच कमतरता असते आणि ताटात अनेकदा मोजक्याच भाज्या दिसतात. परिणामी, या हंगामात प्रत्येक घरात डाळींचा वापर वाढतो.

ते आपल्या ताटातून नाहीसे होण्याच्या मार्गावर आहे. गेल्या काही वर्षांपासून डाळींचे भाव सातत्याने वाढत आहेत. तूर डाळीने १०० रुपयांचा टप्पा ओलांडला आहे, तर इतर डाळींचे भावही आता १०० रुपये प्रति किलोच्या जवळ पोहोचत आहेत. डाळी आणि इतर धान्यांच्या गगनाला भिडलेल्या किमतींनंतर, आंबे आता...जनतेला सर्वात मोठा फटका स्वयंपाकघराच्या बजेटला बसला आहे. शाकाहारी जेवणातील प्रथिनांचा मुख्य स्रोत असलेल्या डाळींच्या दरात अचानक झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य नागरिक चिंतेत आहेत. घाऊक बाजारात तूर डाळीचा भाव ११६ रुपये प्रति किलोपर्यंत वाढला आहे.

डाळींचा भाव पूर्वी ११० प्रति किलो होता. याचा अर्थ, भावात प्रति क्विंटल ६०० ने वाढ झाली आहे. हरभऱ्याच्या दरात प्रति क्विंटल ४०० ची लक्षणीय वाढ झाली आहे. पूर्वी ५८ प्रति किलो असलेला हरभरा आता ७२ प्रति किलो दराने विकला जात आहे.याचा अर्थ असा की हरभरा डाळीचा भाव प्रति किलो १२ रुपयांनी वाढला आहे. तांदूळसुद्धा प्रति क्विंटल २५० ते ५०० रुपयांनी महाग झाला आहे.

डाळींच्या किमती आधीच उच्चांकी पातळीवर पोहोचल्या आहेत. मात्र, युद्ध सुरू राहिल्यास भविष्यात तांदळाच्या किमती आणखी वाढू शकतात. सध्या तरी, धान्याच्या किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता कमी आहे.तूर डाळीचा भाव ६०० रुपयांनी वाढून ११,६०० रुपये प्रति क्विंटल झाला आहे. चणा




डाळीचा भाव ५,८०० रुपयांवरून ७,२०० रुपयांपर्यंत वाढला आहे. या दरवाढीमुळे तांदळाच्या दरातही २५० रुपयांनी वाढ होऊन तो ५०० रुपयांवर पोहोचला आहे. लोकप्रिय ब्लॅक मुस्टाश राईसचा भाव आता ७,२०० ते ७,४५० रुपये प्रति क्विंटल झाला आहे, तर वाफेवर शिजवलेल्या कोलम तांदळाचा भाव ५,३०० ते ५,८०० रुपये प्रति क्विंटल झाला आहे. साबुदाण्याचा भाव ५,५०० रुपयांवरून ५,९०० रुपये प्रति क्विंटल झाला आहे.अन्नाला गोडवा आणणारी साखर. सध्या बाजारात एम-३० चा भाव ४३.२ रुपयांवरून ४३.८० रुपये प्रति किलो झाला आहे. प्रति किलो ६० पैशांच्या या एकवेळच्या दरवाढीमुळे आणि बाजारातील तेजीमुळे येत्या काही दिवसांत डाळी आणि तांदळाच्या किमतीही वाढतील. यामुळे सर्वसामान्य माणसावरील अतिरिक्त भार थेट वाढेल आणि कुटुंबाची परिस्थिती निश्चितच बिघडेल.

# सुमन कल्याणपूर : न फुललेले लोकप्रियतेचे 'सुमन'!



ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी मुंबईतल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. सुमन कल्याणपूर यांच्या जाण्याने भारतीय संगीत क्षेत्रातील आणि भावगीत विश्वातील ध्रुवतारा निखळला आहे. संगीत विश्वावर शोककळा पसरली आहे. मराठी भावगीत, भक्तीगीत आणि हिंदी चित्रपट संगीत विश्वात त्यांनी दिलेले योगदान हे मोलाचे ठरले. २०२३ मध्ये सुमन कल्याणपूर यांना पद्मभूषण या नागरी सन्मानाने सन्मानित करण्यात आले होते.

सुमन कल्याणपूर यांना त्यांच्या हिंदीत आवाजाची जातकुळी ओळखून त्याप्रमाणे संगीत रचणारे संगीतकार त्यांना लाभले नाहीत. तशी त्यांना फारशी गाणी मिळाली नाहीत. जी गाणी मिळाली, ती लता मंगेशकर यांना पर्याय म्हणून मिळाली. काही काळ लता रफीसोबत गात नव्हत्या, त्या काळात सूमन यांना गाणी मिळाली.

मराठी भावगीतांची आवड असणाऱ्या रसिकांच्या हे लगेच लक्षात येईल. एक गोड साधेपणा हीच सुमन यांची ताकद. अवघड ताना, पलटे, हरकती, टिपेचा आवाज, आवाजातील मादकता हे सगळे टाळून संथ झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यासारखे त्यांचे गाणे. ज्या संगीतकारांनी हे हेरले त्यांनी हा आवाज त्याप्रमाणे वापरला आणि संस्मरणीय अशी मराठी भावगीते रसिकांच्या पदरात पडली. पण असे हिंदीत फारसे घडले नाही.

हिंदीत १९५४ ते १९८८ इतकी मोठी कारकीर्द सूमन यांच्या वाट्याला आली. यात त्यांच्या आवाजाचा योग्य वापर केलेले ठळक उदाहरण म्हणजे खय्याम यांचे दोन चित्रपट- 'शगुन' (१९६४) आणि 'मुहोब्बत इसको कहते है' (१९६५).

खय्याम यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी हिंदी चित्रपटातील सर्वच ठळक आवाज वापरले, पण कुणालाही कुणाची छाया म्हणून वा बदली कलाकार म्हणून वापरले नाही. 'शगुन'मधील सर्वांत गाजलेले गाणे हे त्यांची गायिका पत्नी जगजीत कौर यांच्या आवाजात आहे (तुम अपने रंजो गम, अपनी परेशानी मुझे दे दो). सुमन यांच्या वाट्याला यात तीन गाणी आली आहेत.

**जिंदगी जुल्म सही जब्र सही गम ही सही**
**दिल की फरियाद सही, रूह का मौसम सही**

असे एका गाण्याचे साहिरचे शब्द आहेत. 'हमने हर हाल मे जिने की कसम खायी है' असे म्हणत ज्या शांततेत सुमन यांचा आवाज पुढे जात होता, त्यात कुठलाही उरबडवा आक्रोश नाही. कुठलीही तक्रार नाही. शब्दांना साजेसे असे संगीत आणि त्यावर तितकाच शोभणारा मध्य सप्तकातील सुमन यांचा आवाज. हे गाणे आशा किंवा लतासाठी बांधलेले असून त्या मिळाल्या नाहीत, म्हणून सुमन यांचा वापर केला असे आढळत नाही. जे पुढे शंकर जयकिशन यांच्या बाबतीत सतत घडत गेले.

दुसरे अगदी उलट उदाहरण ओ.पी.नय्यर यांचे आहे. 'आरपार'मध्ये 'मुहोब्बत कर लो जी भरलो, अरे किसने रोका है' या गाण्यात सुमन यांच्या आवाजात दोन ओळी आहेत. पण त्यांचे नाव 'कोरस'मध्ये टाकले गेले. नंतर नय्यर यांनी त्यांचा आवाज कधीच वापरला नाही. याबाबतच्या दंतकथा बाजूला ठेवल्या तरी लक्षात येतं की, मुळात नय्यर यांच्या संगीतात लतासाठी जागाच नव्हती. परिणामी लताची छाया भासणाऱ्या सुमन यांच्यासाठी तरी कुठून असणार! शिवाय त्यांना सुमन यांचा भावगीताला शोभणारा आवाज वापरावा अशी गरज वाटली नसावी.

**'शगुन'मधले त्यांचे दुसरे गाणे रफी सोबतचे आहे -**

**पर्बतों के पेडों पर, शाम का बसेरा है**
सुरमई उजाला है चंपई अंधेरा है

आता यातील 'सुरमई उजाला' आणि 'चंपई अंधेरा' हे शब्द कानावर पडले की, गुलज़ार यांच्या चाहत्यांना काहीतरी ओळखीचे वाटेल. कारण गुलज़ार अशी शब्दरचना नेहमी करतात. पण ही ताकद साहिरची आहे. कदाचित गुलज़ार यांनी साहिर यांच्यापासून प्रेरणा घेतली असावी. वहिदा आणि कमलजीत यांनी अतिशय संयतपणे हे गाणं पडद्यावर साकार केलं आहे. 'भीगे भीगे झोकों में, खुशबुओं का डेरा है' असे शब्द परिणामकारक ठरायला एक शांत लयच पाहिजे.

तिसरे गाणे आहे -

**बुझा दिये है खुद अपने हाथों, मुहोब्बतों के दिये जला के**



एक संयत असं दुःख यातून साहिर यांनी मांडले आहे. खय्याम यांनी सुमन यांच्या आवाजाची जातकुळी नेमकी हेरून ही गाणी रचली आहेत. पडद्यावर गीता, आशा, लता यांच्या शब्दांना न्याय देणारा अभिनय वहिदाने केला आहे.पण इथे सुमन यांच्या शांत आवाजासाठीही तसाच संयत अभिनय पडद्यावर दिसतो, तेव्हा गाण्याची परिणामकारकता जास्त जाणवते.

**कभी मिलेगे जो रास्ते मे तो मुफिरा कर पलट पडेंगे**
**कही सुनेंगे जो नाम तेरा, तो चुप रहेंगे नजर झुका के**

इतक्या साध्या ओळी साहिरने लिहिल्या आहेत. पण त्यांचा साधेपणाच इतका परिणामकारक वाटतो की, तार सप्तकात जाणारा आवाज जो परिणाम साधणार नाही, तो परिणाम या साधेपणातून साधला. साधेपणा हीच मोठी ताकद सुमन यांच्या आवाजाची होती (त्यांनी आता गाणं सोडलं आहे म्हणून 'होती' हा शब्द वापरला.)

'मुहोब्बत इसको कहते है' (१९६५) हा शशी कपूर-नंदा यांचा चित्रपट. यात मजरूहची गाणी आहेत. यातील पहिले गाणे आहे -

**आजा की मोहब्बत की मिटने को है तस्विरे**
**पहरे है निगाहों पे, और पावों मे जंजीरे,**
**बस मे ही नही वरना, हम उडके चले आये**

या शब्दांमध्ये दुःखाचा कुठेच आक्रोश नाही. आशा आणि गीताच्या आवाजातील लाडिकपणा सुमन यांच्या आवाजात आढळत नाही. पण स्वाभाविक गोडवा आणि त्यातली मर्यादित मस्ती खय्याम यांनी पुढच्या गाण्यात वापरली आहे.

**ठहरीये होश मे आ जू तो चले जाईगे गा**
**आपको दिल मे बिठा लू तो चले जाईये गा**

या रफीच्या बोलानंतर 'उं हू' असा लाडिक झटका सुमनच्या आवाजात येतो.या गाण्यात रफीही अतिशय साधेपणाने गायले आहेत. रफीचे वैशिष्ट्य म्हणजे लता, आशा आणि गीतासोबतचा जो आवाज आहे, तो ते इथे काढत नाहीत. इथे मस्तीही अगदी मर्यादितच करायची अशी शिस्त त्यांनी आपल्याच आवाजाला घातलेली जाणवते.

याच चित्रपटातील तिसरे गाणे हे मुजरा आहे. हेलन आणि जयश्री गडकरवर हे गाणे चित्रित केले गेले आहे.

**जो हमपे गुजरती है, तन्हा किसे समझाये,**
**तूमभी तो नही मिलते, जाये तो किधर जाये**

असे सोप्या भाषेत दुःख मांडणारे आहे. मजरूह व शैलेंद्र हे दोन गीतकार अतिशय साध्या सोप्या शब्दांतून प्रभावी गीतरचना करून दाखवतात.

ठुमरीच्या मुजऱ्याच्या शैलीत मुबारक गायल्या आहेत, तर सुमन यांनी बैठकीच्या लावणीच्या थाटात मर्यादित मादकता दाखवत आपला आवाज लावला. हा सूक्ष्म फरक खय्याम यांनी चांगलाच दाखवला. हेच गाणे आशाबाईंनी गायले असते तर ते जास्त मादकतेकडे झुकले असते.

सुमन यांची तीन गाणी बिनाका टॉपच्या गाण्यात पोचली. त्यातले पहिले गाणे आहे १९६२ च्या 'बात एक रात की'मधील. हेमंत कुमार यांच्या सोबतच्या या गाण्याला बीनाकात स्थान मिळाले.

**ना तूम हमे जाने,**
**ना हम तूम्हे जाने,**
**मगर लगता है कुछ ऐसा**
**मेरा हमदम मिल गया**

इथेही मोठे श्रेय संगीतकार एस.डी.बर्मन यांना द्यावे लागेल. त्यांनी ही रचना खास सुमन यांच्यासाठीच बांधली. हेमंत कुमारच्या धीरगंभीर आवाजासोबत उठून दिसणारा सुमन यांचा गोडसर साधा आवाज नेमका परिणाम साधतो.

दुसरे गाणे आहे शंकर जयकिशन यांच्या 'दिल एक मंदिर है' (१९६३) मधील. गाण्याचे शब्दही हेच आहेत, पण गाणे ऐकताना सतत जाणवत राहते की, कुठेतरी लताच गात आहे. कारण शंकर जयकिशनला लतासाठीच चाली बांधायची सवय होती. परिणामी ते इतर स्त्री गायिकांसाठी तेवढ्या चांगल्या चाली बांधू शकले नाहीत. सोबत रफीचा आवाज आहे.

तिसरे गाणे सोनिक ओमीच्या 'दिल ने फिर याद किया' (१९६६) मधील आहे. हेही परत चित्रपटाचं शीर्षक गीत आहे. मुकेश-रफीसोबतचे.

**क्या बताये तूम्हे हम शम्मा की किस्मत क्या है,**
**गम मे जलने के सिवा और मुहोब्बत क्या है,**
**ये वो गुलशन है के जिसमे न बहार आयी है**

**असे शब्द सुमन गातात.**

**सुमन यांना एकदाही फिल्मफेअर अवार्ड लाभले नाही. त्यांचे एकही गाणे कधी** लोकप्रियतेच्या शिखरावर होते असे नाही. एखाद्या गाण्यानं किंवा मोजक्याच गाण्याने मोठी लोकप्रियता मिळवून गायब होणारे क्षणिक का होईना त्या सुखाचा आनंद घेतात. पण सुमन यांच्यासारख्यांची नियती वेगळीच राहिली. त्यांना ना कधी प्रचंड लोकप्रियता लाभली, ना कधी या क्षेत्रातून कायमचे हद्दपार व्हावे लागले. ज्या गाण्यांना लोकप्रियता लाभली, त्यातही परत 'लताची छाया' ही टोचणी होती.

खय्याम यांच्यासारख्या संगीतकारांनी त्यांच्याकडून अजून काही गाणी गाऊन घेतली असती, तर कदाचित रसिकांच्या पदरात चांगले माप पडले असते!

(या लेखासाठी हिंदी गाण्याच्या सुवर्ण पर्वातील म्हणजेच १९४९ ते १९६६ पुरताच विचार केला आहे.)

(साभार-अक्षरनामा)

# लैंगिक कामगार : अधिकार आणि सामाजिक न्यायाचा शोध

**आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिवस आठवण करून देतो की मानवी हक्क सार्वत्रिक असतात आणि ते कोणत्याही व्यवसाय, जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक स्थितीवर अवलंबून नसतात.**


दरवर्षी २ जून हा दिवस जगभरात 'आंतर राष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून पाळला जातो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर ठेवलेल्या, उपेक्षा, तिरस्कार, गैरसमज आणि भेदभावाचा सामना करणाऱ्या लाखो लैंगिक कामगारांच्या जीवनातील वास्तव, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मानवी हक्कांची गरज आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. लैंगिक कामगारांविषयी समाजात अनेक प्रकारच्या पूर्वग्रहदूषित कल्पना प्रचलित आहेत. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकडे सहसा केवळ नैतिकता, परंपरा किंवा सामाजिक मूल्यांच्या चष्म्यातून पाहिले जाते. मात्र या दृष्टिकोनापलीकडे जाऊन त्यांच्याकडे एक नागरिक, एक मानव आणि मूलभूत अधिकारांचा हक्कदार म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन हा केवळ एका व्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचा दिवस नाही, तर मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, आरोग्य, सुरक्षा, लिंगन्याय आणि मानवाधिकार यांच्याशी निगडित व्यापक प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी आहे.

लैंगिक काम हा विषय सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि अनेक स्तरांवर गुंतागुंतीचा आहे. विविध देश, संस्कृती, धर्म आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. काही समाजांमध्ये लैंगिक कामाला नैतिक अधःपतनाचे प्रतीक मानले जाते, तर काही ठिकाणी ते एक प्रकारचे श्रम किंवा व्यवसाय म्हणून स्वीकारले जाते. या मतभेदांमुळे लैंगिक कामगारांच्या जीवना विषयी वस्तुनिष्ठ चर्चा अनेकदा मागे पडते. प्रत्यक्षात लैंगिक कामगारांच्या जीवनातील प्रश्न हे त्यांच्या व्यवसायापेक्षा अधिक व्यापक आहेत. त्यामध्ये दारिद्र्य, सामाजिक विषमता, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, हिंसा, कायदेशीर संरक्षणाचा अभाव आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या अनेक मुद्द्यांचा समावेश होतो.

भारतासह जगातील अनेक देशांमध्ये लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे. या क्षेत्रात केवळ महिलाच नव्हे तर पुरुष, तृतीयपंथीय, ट्रान्सजेंडर आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तीही कार्यरत आहेत. त्यामुळे लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ महिलांच्या प्रश्नांपुरता मर्यादित राहत नाही. तो लिंगवैविध्य, सामाजिक समावेशकता आणि मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषतः तृतीयपंथीय समुदायाला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार यांचा अभाव असल्याने अनेकांना लैंगिक काम हेच उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारावे लागते. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेणे म्हणजे सामाजिक परिस्थितीचे अपूर्ण आकलन होय.

लैंगिक कामगार या क्षेत्रात कसे येतात याची कारणेही विविध स्वरूपाची असतात. काही व्यक्ती आर्थिक गरजांमुळे हा व्यवसाय स्वीकारतात. काहींना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी किंवा कर्ज फेडण्यासाठी हा मार्ग निवडावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांना फसवणूक, मानवी तस्करी, जबरदस्ती किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात ढकलले जाते. काही व्यक्ती मात्र स्वतःच्या निर्णयाने हा व्यवसाय स्वीकारतात. त्यामुळे सर्व लैंगिक कामगारांच्या परिस्थितीला एकाच चौकटीत बसविणे योग्य नाही. त्यांच्या जीवनातील विविधता आणि अनुभवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

लैंगिक कामगारांच्या जीवनातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे हिंसा. ग्राहक, दलाल, गुन्हेगारी टोळ्या, स्थानिक गुंड, काही वेळा पोलिस यांच्याकडूनही त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैंगिक स्वरूपाच्या हिंसेच्या घटना अनेकदा घडत असतात. परंतु सामाजिक कलंक आणि न्याय मिळण्याबाबतची अनिश्चितता यांमुळे अनेक पीडित व्यक्ती तक्रार करण्यास धजावत नाहीत. परिणामी, हिंसाचाराचे चक्र सुरूच राहते. कोणत्याही नागरिकाप्रमाणे लैंगिक कामगारांनाही सुरक्षिततेचा आणि न्याय मिळविण्याचा अधिकार आहे, ही बाब समाजाने मान्य करणे आवश्यक आहे.आरोग्य हा लैंगिक कामगारांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेला महत्त्वाचा मुद्दा आहे. लैंगिक संसर्गजन्य रोग, एचआयव्ही/ एड्स, प्रजनन आरोग्याच्या समस्या, मानसिक ताण, नैराश्य आणि व्यसनाधीनता यांसारख्या अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः एचआयव्ही प्रतिबंधाच्या क्षेत्रात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य विभागांनी



महत्त्वाचे कार्य केले आहे. कंडोम वापराबाबत जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि उपचार सुविधा यांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. तथापि, अजूनही अनेक ठिकाणी आरोग्यसेवा मिळविताना लैंगिक कामगारांना भेदभावाचा सामना करावा लागतो. डॉक्टर किंवा आरोग्य कर्मचारी त्यांच्याशी पूर्वग्रहदूषित वागणूक करतात. त्यामुळे आरोग्य सेवा सर्वांसाठी समान आणि सन्मानपूर्वक उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.


लैंगिक कामगारांच्या मानसिक मानवी तस्करी आणि लैंगिक काम या दोन भिन्न बाबी आहेत, हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाते. मानवी तस्करी म्हणजे व्यक्तींना फसवून, धमकावून किंवा जबरदस्तीने शोषणासाठी वापरण्याची गुन्हेगारी प्रक्रिया होय. दुसरीकडे, काही व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लैंगिक काम करतात. त्यामुळे मानवी तस्करीविरोधी उपाययोजना करताना स्वेच्छेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करीविरोधी लढा आणि लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.जगभरातील विविध देशांमध्ये लैंगिक कामाबाबत वेगवेगळे कायदे आहेत. काही देशांमध्ये हा व्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे आणि त्यावर विशिष्ट नियम लागू आहेत. काही देशांमध्ये अंशतः मान्यता आहे, तर काही ठिकाणी तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रत्येक व्यवस्थेचे फायदे आणि मर्यादा आहेत. कायदेशीर मान्यता असलेल्या देशांमध्ये आरोग्य, सुरक्षा आणि कामगार हक्कांच्या दृष्टीने काही संरक्षण उपलब्ध असते. तथापि, केवळ कायदेशीर मान्यता दिल्याने सर्व समस्या सुटतात असे नाही. सामाजिक कलंक आणि भेदभाव यांवरही तितक्याच गांभीर्याने काम करणे आवश्यक असते.

भारतातील परिस्थिती तुलनेने गुंतागुंतीची आहे. येथे लैंगिक काम स्वतःमध्ये थेट गुन्हा नाही, परंतु त्याच्याशी संबंधित अनेक कृतींवर कायदेशीर निर्बंध आहेत. त्यामुळे लैंगिक कामगार अनेकदा कायदेशीर अनिश्चिततेत जगतात. अलीकडच्या वर्षांत न्यायालयांनी लैंगिक कामगारांच्या मानवी प्रतिष्ठेचा आणि घटनात्मक अधिकारांचा पुनरुच्चार केला आहे. न्यायव्यवस्थेने स्पष्ट केले आहे की प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. हा दृष्टिकोन मानवाधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेब मालिका आणि वृत्तांकनामध्ये लैंगिक कामगारांचे चित्रण अनेकदा रूढ कल्पनांवर आधारित असते. काही वेळा त्यांना गुन्हेगारी, नैतिक अधःपतन किंवा सनसनाटीपणाशी जोडले जाते. अशा चित्रणामुळे समाजातील पूर्वग्रह अधिक बळकट होतात. माध्यमांनी त्यांच्या जीवनातील वास्तव, संघर्ष, मानवी भावना आणि सामाजिक प्रश्न यांचे संतुलित व संवेदनशील चित्रण करणे आवश्यक आहे. जबाबदार पत्रकारिता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# लव्ह यू करमचंद!



एक ढब होती विशिष्ट, त्यात बोलण्यात शाळेतली काही वर्ष गेलीत. 'किटी हेय किटी' असे दुडक्या स्पीड मध्ये म्हणत, गाजर खाण्याची ॲक्टिंग करत. करमचंदने त्यावेळच्या भारतीय मालिकांमध्ये एक वेगळाच डौल आणला होता. दोन पंकज कारण होते या मागे. एक म्हणजे मालिकेचा दिग्दर्शक पंकज पराशर (चालबाज, जलवा फेम) आणि दुसरा पंकज कपूर.

रूढ फिल्मी कपूरांची कुठलीही लक्षणे नसलेला. बुटका, सावळा, चेहऱ्यावर डाग असलेला. पण त्याच्यात काहीतरी जादू होती. आबाल वृद्धांना तो आवडायचा. तेव्हा टेलिव्हिजन आणि दोन वाहिन्या या खेरीज मनोरंजन ही नव्हते. पण म्हणून काही धीरज कुमार लोकांचा फेवरेट झाला नाही. पंकज कपूर, शाहरुख खान हे दिल्लीचे नट चांगलेच चमकून गेले. पंकज बऱ्याच मालिकांत दिसत राहिला. आणि आम्ही अर्रे करमचंद म्हणत ओरडत त्याला बघत राहायचो. त्या आधी त्याने केलेल्या फिल्म्स, जाने भी दो यारो वगैरे नंतर बघितल्या पण बराच काळ प्रेक्षकांसाठी तो करमचंदच राहिला.

एका मुलाखतीमध्ये त्याने हा वैताग व्यक्त सुद्धा केला पण अफसोस, करमचंद को मारने के लिये पंकज कपूर को काफी वक्त लगा.पराशर- नसीरच्या जलवा मध्ये तो होता आणि छोट्या भूमिकेतही त्याने धमाल उडवलेली.चमेली की शादी, एक रुका हूआ फैसला, ये वो मंजिल तो नहीं, कमला की मौत, खामोष (दोन्ही फार उशिरा पाहिले.),आमिरचा राख फक्त पंकजमूळे सह्य झाला होता. मणीरत्नम सरांच्या रोजा मध्ये त्याला पहाणे सुखद धक्का होता. त्याआधी एक डॉक्टर की मौत (त्या वेळी डॉक्टरचा कथा नायक दिपांकर रॉय प्रमाणेच पंकज कपूरचा हा performance सुद्धा बक्षिसं वगळता थोडा दुर्लक्षित झाला होता.)

आपल्या हिंदी चित्रपटात जर नायक नसाल तर मग कॅरॅक्टर आर्टिस्ट असा अतर्क्य शिक्का तुमच्यावर पडतो आणि अवतार गील, आलोकनाथ ते पंकज कपूर एका स्लॉट मध्ये ढकलले जातात. तुमच्या साठी पात्र लिहिली जात नाहीत, किंवा अमुक पात्राला तुम्हीच न्याय द्याल असा फारसा विचार नसतो.त्या काळी नसीर सर नंतर बाजपेयी, इरफान, नवाझ यांनी ही उडी घेतली.आपला केके अजूनही ही उडी घेऊ शकलेला नाही. पण पंकज कपूर इतका नैंगत अभिनेता आहे की, तो ऑफिस ऑफिस मधून (यातले सगळेच) गाजला.

पंकज कपूर ची कॉमेडी ओम पुरी, परेश रावल सारखी fluid किंवा थेट नसते. Rather खूप दबी आणि वरकरणी निर्विकार चेहरा आणि स्वर ठेवून तो वावरतो. Punches काढण्या पेक्षा त्याचे सुरुवातीपासून शेवट पर्यंतच पात्राचे bearing हेच जाम मजेशीर असते. (चमेली की शादी, जाने भी दो यारो, फिलिप्स टॉप टेन).

पंकजला परत दमदार भूमिका देण्याचे श्रेय विशाल भारद्वाजचे. इरफानने भारून टाकलेल्या मकबूलचा पाया आहे अब्बाजी. त्याचे ते सुरमा घातलेले डोळे,खरबरीत आवाज, ते वावरण... एका प्रसंगात त्याची शय्या सोबत करणाऱ्या तब्बुला त्याचे वेड वाकडे सुटलेले शरीर पाहून घृणा वाटते. मकबूल अब्बाजीला संपवतो पण तो ना त्याच्या डोक्यातून जात ना प्रेक्षकांच्या. मजबूत लिहिलेले पात्र जेव्हा पंकज कपूर सारखा तगडा अभिनेता साकार करतो तेव्हा पडद्यावर त्या व्यक्तिरेखेच्या उपस्थितीची लांबी मायने नही रखती. जो ठसा उमटवायचा आहे तो उमटतोच. ब्लू अंब्रेला, मट्रू की बीजली का मंडोला वगैरे मधून पंकजला विशाल भारद्वाज ने सुंदर कामे दिली आहेत. कमीने मधल्या अमोल गुप्तेंच्या व्यक्तिरेखेला पंकज कपूर हवा होता असे वाटत रहाते. अर्शद च्या सहर मध्ये अर्शदला शांत, संयत साथ देणारा प्रोफेसर तिवारी ही उत्तम. फाइंडिंग फेनी मधला अर्क डॉन पेद्रो ... शानदार सुद्धा त्याच्या साठी तेवढ्या वेळ पहावा...

Basically पंकज जिकडे जेवढा वेळ असेल ते ते सिनेमा, सिरीयल सोडू नयेत. त्याचा धर्म नावाचा सिनेमा बघून अवाक व्हायला होते. एक डॉक्टर की मौतच्या वेळी कदाचित शबाना आझमी म्हणाल्या होत्या, पंकजचा खरा अभिनय अजून लोकांनी पाहिलाय कुठे. त्याला स्टेज वर बघा.एनएसडीच्या पंकज कपूर ने तब्बल ७० च्या वर नाटके दिग्दर्शित केलीत. दोपहरी म्हणून लेख संग्रह ही प्रकाशित केला. या पुढे काय सांगावे.

(शाहिद कपूर याचा मुलगा हे शाहिद साठी एखाद्या पुरस्कारापेक्षा कमी नाही.)

**लव्ह यू करमचंद!**
**गुरुदत्त वसंत सोनसूरकर**

# मान्सूनच्या उंबरठ्यावर २०० कुटुंबे उघड्यावर

## पुनर्वसनाविना रेल्वेची कारवाई, प्रशासनावर प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शहरातील तारफैल परिसरात गेल्या तीन पिढ्यांपासून वास्तव्यास असलेल्या सुमारे १६५ कुटुंबांवर तर गडंकी येथील ३५ कुटुंबावर सोमवारी पहाटे रेल्वे प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याची कारवाई केल्यानंतर ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शेकडो नागरिक बेघर झाल्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या कारवाईविरोधात आमदार साजिद खान पठाण यांनी तीव्र आक्षेप नोंदवत, 'पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असताना करण्यात आलेली ही कारवाई केवळ अन्यायकारकच नव्हे तर अमानवी आहे,' असा आरोप केला.*

### पुनर्वसनाचा प्रश्न अनुत्तरित

या कारवाईमुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांचे भवितव्य काय, हा मूलभूत प्रश्न अद्याप अनुत्तरित असल्याचे आ. पठाण यांनी सांगितले. 'तीन पिढ्यांपासून वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना एका दिवसात बेघर करून प्रशासन कोणता विकास साधत आहे? शासनाने या कुटुंबांना राहण्यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी,' अशी मागणी त्यांनी केली. कारवाईच्या दिवशी स्वतःसह स्थानिक लोकप्रतिनिधींना घटनास्थळी जाण्यापासून रोखण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. संबंधित मोहिमेदरम्यान कायदेशीर नोटीस बजावत प्रवेशास मज्जाव करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कारवाई थांबविण्यासाठी पालकमंत्री, खासदार यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्याचा दावा करत, त्या वेळी कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

### विकासाच्या नावाखाली मानवी प्रश्न दुर्लक्षित?

तारफैल व गंडकी प्रकरणाने पुन्हा एकदा विकासकामे, शासकीय मालमत्तेवरील अतिक्रमणे आणि पुनर्वसन या त्रिसूत्रीतील विसंगती अधोरेखित केली आहे. न्यायालयीन आदेश अथवा प्रशासकीय अधिकारांच्या आधारे अतिक्रमण हटविणे शक्य असले, तरी त्या कारवाईचा थेट परिणाम नागरिकांच्या निवाऱ्यावर होत असेल तर पुनर्वसनाची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न यानिमित्ताने पुढे आला आहे. शहरी भागांतील अतिक्रमण हटविण्याच्या अनेक कारवायांमध्ये प्रशासनाला कायदेशीर अधिकार असले तरी प्रभावित नागरिकांच्या सामाजिक आणि मानवी हक्कांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे आ. पठाण म्हणाले.

पत्रकार परिषदेत बोलताना आ. पठाण यांनी सांगितले की, तारफैल परिसरातील जागेच्या मालकी व अतिक्रमणाबाबत गेल्या काही महिन्यांपासून प्रशासकीय प्रक्रिया सुरू होती. भूमी अभिलेख विभागाने केलेल्या मोजणी आणि सीमांकनात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या कुटुंबांची घरे बाधित क्षेत्रात आली होती. त्यानंतर प्रभावित नागरिकांच्या वतीने त्यांनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी, भूमी अभिलेख विभाग आणि रेल्वे प्रशासनाशी अनेक स्तरांवर चर्चा केली होती.

त्यांच्या म्हणण्यानुसार, अतिक्रमण हटविण्यापूर्वी पर्यायी जागा उपलब्ध करून देणे आणि पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करणे ही किमान प्रशासनाची जबाबदारी होती. या संदर्भात पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचा तसेच जिल्हाधिकाऱ्यांनीही पुनर्वसनाचा विषय गांभीर्याने विचारात घेण्याचे आश्वासन दिल्याचा दावा त्यांनी केला. मात्र प्रत्यक्षात पुनर्वसनाचा प्रश्न निकाली निघण्यापूर्वीच पहाटेच्या सुमारास पोलिस बंदोबस्तात कारवाई सुरू करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

### आ. साजिद खान पठाण यांचा आरोप; 'आधी पुनर्वसन, मग अतिक्रमण हटवा' मागणी धुडकावल्याचा दावा



#### 'धनदांडग्यांसाठी तत्परता, गरिबांसाठी उदासीनता'

पत्रकार परिषदेत आ. पठाण यांनी राज्य आणि केंद्र सरकारवरही राजकीय टीका केली. 'सरकार उद्योगपती आणि प्रभावशाली घटकांच्या प्रश्नांवर तत्परतेने निर्णय घेते; मात्र गरीब आणि वंचित कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करते,' असा आरोप त्यांनी केला. या कारवाईमुळे शासनाच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्न उपस्थित होत असल्याचेही ते म्हणाले.

#### मनपा आवारात आंदोलनाचा इशारा

प्रभावित कुटुंबांच्या पुनर्वसनाबाबत तातडीने निर्णय न झाल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा देत, 'या कुटुंबांना पर्यायी निवारा मिळाला नाही तर त्यांना थेट महापालिका आवारात, मनपाच्या बंद शाळेत, खासदारांच्या घरी, पालकमंत्री यांच्या घरी राहण्याची व्यवस्था करावी लागेल. त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासनच जबाबदार राहील,' असे आ. पठाण यांनी स्पष्ट केले.

# फौजी फिजिकल अकॅडमीच्या दोन विद्यार्थिनींची पोलीस दलात निवड



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

येथील फौजी फिजिकल अकॅडमीच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या दोन विद्यार्थिनींची महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनुष्का कुर्मी (रा. सिरसो, ता. मूर्तिजापूर) आणि अपेक्षा मोहन इंगळे (रा. शिवाजी नगर, मूर्तिजापूर) अशी निवड झालेल्या विद्यार्थिनींची नावे आहेत.

माजी सैनिक मंगेश घुगे यांनी देशसेवेतील १७ वर्षांचा अनुभव पूर्ण करून सेवानिवृत्तीनंतर मूर्तिजापूर येथे निशुल्क फौजी फिजिकल अकॅडमीची स्थापना केली. या अकॅडमीमध्ये पोलीस, लष्कर व इतर शासकीय सेवांसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा तसेच मुलाखतीचे विशेष प्रशिक्षण दिले जाते. अनुष्का आणि अपेक्षा यांनी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि अकॅडमीच्या योग्य मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले. निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थिनींनी आपल्या यशाचे श्रेय पालक, शिक्षक आणि अकॅडमीतील प्रशिक्षकांना दिले आहे. ग्रामीण भागातील मुलींनी स्पर्धा परीक्षा आणि शासकीय सेवांकडे आत्मविश्वासाने वाटचाल करावी, असा संदेशही त्यांनी यावेळी दिला. दरम्यान, अकॅडमीच्या माध्यमातून भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शासकीय सेवेत संधी मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. निवडीबद्दल विविध स्तरांतून दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

**श्रीमती. बदामीबाई ज. रामकिसनजी पूजारी ट्रस्ट, कपडा बाजार, अकोला**
**रजि. नं. ए-१३०६ / अकोला**

अर्जकं.०३५/ कलम ३६ (१)(अ)/२०२५

वरील अर्जदाराने वरील नमुद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला येथे केलेली आहे.

मौजे न्यू कमेटी, अकोला यांच्या हददीतील ताजनापेठ, कपडा बाजार, अकोला नझुल प्लॉट नं.५४ शिट नं.२७ क्षे. १५८.०२५ चौ.मी. (१७०१ चौ.फुट) प्लॉट.

त्या अर्थी या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदरहू मालमत्तेवरील विक्रिबाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आंत मा. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलांमार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्यानीशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्यांनिशी ही नोटीस दिली.

शिक्का

(वि.सु.चव्हाण)
अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती


## कुष्ठरूग्ण शोध मोहिमेला जिल्ह्यात प्रारंभ

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यात सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरुग्ण प्रसाराचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य यंत्रणेतर्फे जिल्ह्यात कुष्ठरूग्ण शोध मोहिमेचा प्रारंभ झाला. जिल्ह्यातील मागील पाच वर्षांमध्ये एकही कुष्ठरुग्ण आढळून न आलेल्या ५११ गावांमध्ये घरोघर सर्वेक्षणास सुरुवात करण्यात आली.


**Change In Name**

I have change
my name From
**MOHAMMED JUNAID**
**MOHAMMED MUTALIB**
**-To-**
**MOHAMMAD JUNED**
**MOHAMMAD MUTLIB**
Address Chota
Mominpura Balapur,
Akola, Maharashtra -
444302 Passport No :-
N4321418



## अकोला महानगरपालिका, अकोला
## सार्वजनिक बांधकाम विभाग,
## मनपा अकोला

**निविदा सुचना क्र. ०६, (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०५ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/१६८/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ०१/०६/२०२६


# प्रेमजाळं, सत्तेची सावली आणि पैशांचा खेळ; अखेर कोण झाला 'नील'?

## उच्चशिक्षित महिलेपासून सुरू झालेली कहाणी पोहोचली राजकीय दालनापर्यंत

■ ॲड. समीर ठाकूर ■

*अकोला : अकोल्याच्या राजकीय वर्तुळात सध्या एका कथित प्रकरणाची जोरदार चर्चा रंगली आहे. प्रेम, सत्ता, पैशांची ताकद, नोकरीचे आमिष आणि अखेरीस झालेला वाद यामुळे हे प्रकरण जिल्हाभरात चर्चेचा विषय ठरले आहे. अधिकृत पातळीवर कोणतीही पुष्टी नसली तरी राजकीय दालनांपासून चहाच्या टपऱ्यांपर्यंत या कथित घडामोडींची कुजबुज सुरू आहे. या कथित प्रकरणातील प्रमुख पात्र म्हणजे एक देखणी उच्चशिक्षित महिला. **'उघडे केस, डोळ्यांवर स्टायलिश गॉगल, आत्मविश्वासाने भरलेली देहबोली आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व'** अशी तिची चर्चा केली जाते. तर दुसऱ्या बाजूला एका प्रभावशाली लोकप्रतिनिधीचा स्वीय सहाय्यक आणि त्याचा निकटवर्तीय मानला जाणारा एक शासकीय कंत्राटदार ही या कथानकातील अन्य दोन प्रमुख पात्रे असल्याची चर्चा आहे.*

चर्चेनुसार, संबंधित महिला एका खाजगी कामानिमित्त लोकप्रतिनिधीच्या कार्यालयात दाखल झाली. याच ठिकाणी तिची भेट स्वीय सहाय्यकाशी झाली. कार्यालयातील अधिकार, लोकप्रतिनिधीवरील आपला प्रभाव आणि आर्थिक व्यवहारांमध्ये आपली महत्त्वाची भूमिका असल्याच्या बढाया मारत त्याने स्वतःची प्रतिमा प्रभावशाली व्यक्ती म्हणून उभी केल्याचे बोलले जाते.

पुढे महिलेच्या उच्चशिक्षणाचा मुद्दा पुढे करत, **'तुम्हाला आतापर्यंत शासकीय नोकरी मिळायला हवी होती,'** अशी सहानुभूती व्यक्त करण्यात आली. त्यानंतर लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत तिच्याशी जवळीक वाढविण्यात आल्याची चर्चा आहे.

दरम्यान, या कथानकात एका शासकीय कंत्राटदाराची एंट्री झाली. उंचीने लहान असला तरी रुबाबदार व्यक्तिमत्त्व, आलिशान कारमधून फिरणे, मोठमोठ्या गप्पा आणि प्रभावशाली जीवनशैलीचे प्रदर्शन ही त्याची ओळख असल्याचे सांगितले जाते. राजकीय वर्तुळातील चर्चेनुसार, या कंत्राटदारानेही आपल्या बोलण्याच्या शैलीने आणि आर्थिक ताकदीच्या प्रदर्शनातून त्या महिलेला प्रभावित केले. त्यानंतर या तिघांमधील संबंध अधिक घट्ट होत गेल्याची चर्चा रंगू लागली.

राजकीय वर्तुळातील कुजबुजीनुसार, अकोला, मुंबई तसेच निसर्गरम्य परिसरातील फार्महाऊसपर्यंत या कथित संबंधांचा विस्तार झाला. काही काळानंतर गावोगावी आणि राजकीय वर्तुळात या घडामोडींच्या चर्चांनी वेग घेतला. याच काळात संबंधित महिला गर्भवती राहिल्याची चर्चा असून, राजकीय प्रभावाचा वापर करून हा विषय गुप्तपणे हाताळण्यात आल्याचेही बोलले जात आहे. मात्र या दाव्यांची कोणतीही अधिकृत पुष्टी उपलब्ध नाही.

काळ पुढे सरकत असताना या दोन्ही व्यक्तींकडून महिलेवर प्रभाव आणि नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे. मात्र बाहेरील संपर्क वाढल्यानंतर हे नियंत्रण तिला अस्वस्थ करू लागले. याच टप्प्यावर तिने अचानक भूमिका बदलल्याचे सांगितले जाते.

महिलेच्या या कथित **'यू-टर्न'**ने दोघांच्याही पायाखालची वाळू सरकल्याची चर्चा आहे. कंत्राटदाराने स्वतःला बाजूला केल्याचे सांगितले जाते, मात्र स्वीय सहाय्यक मात्र या वादाच्या भोवऱ्यात अडकला.

राजकीय वर्तुळात चर्चेनुसार, अकोल्यातील एका व्यक्तीच्या माध्यमातून तब्बल २५ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. या मागणीमुळे स्वीय सहाय्यकाची झोप उडाल्याची चर्चा आहे. प्रकरण अधिक चिघळू लागल्यानंतर ही बाब संबंधित लोकप्रतिनिधीच्या कानावर गेली. आधीच विविध वादांच्या **'प्रकाश'**झोतात असलेल्या त्या लोकप्रतिनिधीने परिस्थिती हाताळण्यासाठी पडद्यामागून पुढाकार घेतल्याचे बोलले जाते. सूत्रांच्या चर्चेनुसार, काही प्रभावशाली व्यक्तींना मध्यस्थीमध्ये आणण्यात आले. अनेक बैठका आणि चर्चेनंतर हा वाद मोठ्या रकमेवरून कमी होत अखेर पाच लाख रुपयांत मिटविण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

या संपूर्ण कथित प्रकरणात सर्वाधिक फटका स्वीय सहाय्यकाला बसल्याचे बोलले जाते. पद, प्रतिष्ठा आणि पैसा या तिन्ही गोष्टी गमावून तो अक्षरशः **'नील'** झाल्याची चर्चा आहे. तर त्याचा व्यवसायीक भागीदार मानला जाणारा कंत्राटदारही या वादानंतर पूर्णपणे **'गारद'** झाल्याचे राजकीय गल्लीबोळांत बोलले जात आहे.

या संपूर्ण कथित प्रकरणाबाबत कोणतीही अधिकृत तक्रार, पोलिस नोंद अथवा शासकीय पुष्टी समोर आलेली नाही. मात्र राजकीय वर्तुळात, सामाजिक मेळाव्यांमध्ये आणि शहरातील चर्चांच्या केंद्रस्थानी ही कहाणी कायम असल्याचे दिसून येत आहे.

# हरवलेल्या मूकबधीर बालकाच्या कुटुंबाचा शोध जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बालक कुटुंबाकडे सुपुर्द

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या प्रयत्नांमुळे आधार नोंदणीच्या माध्यमातून एका मुकबधीर बालकाचे कुटुंब शोधण्यात यश मिळाले. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत या १४ वर्षीय बालकाला आज त्यांच्या कुटुंबाच्या सुपुर्द करण्यात आले. त्यामुळे हा बालक आता आपल्या खांडवा गावी परतू शकणार आहे.

याबाबतची हकीकत अशी की, लोहमार्ग चाइल्ड हेल्पलाईनच्या कर्मचा-या दि. ८ एप्रिल रोजी अकोला रेल्वेस्थानकावर एक बालक एकटेच भटकत असताना आढळले. कर्मचा-यांनी त्याची विचारपूस करून त्याला बाल कल्याण समितीच्या आदेशाने शासकीय बालगृहात येथे दाखल केले. बालक मूकबधीर असल्याने पत्ता शोधण्याचे आव्हान होते. बालकल्याण समितीचे सुनील लाडुलकर यांना सुचना केल्यानुसार शासकीय मुकबधीर विद्यालयाच्या शिक्षिकेला विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी पाचारण करण्यात आले. त्यानुसार संवाद साधण्याचा प्रयत्न झाला. तथापि, त्याद्वारे बालकाचा पत्ता कळू शकला नाही. त्यानंतर आधार क्रमांकाच्या साह्याने पत्त्याचा शोध सुरू झाला. श्री. लाडुलकर यांनी त्या बालकाची आधार नोंदणी केली. त्यांनी २० दिवसांनंतर १९४७ या आधार ग्राहक टोल फ्री क्रमांकावर पुन्हा संपर्क साधला. त्यावेळी सदर बालकाची आधीच आधारनोंदणी असल्याने नवी नोंदणी रद्द झाल्याचे ग्राहक सेवा प्रतिनिधीने सांगितले. त्यावेळी श्री. लाडुलकर यांनी प्रतिनिधीला प्रकरणाची माहिती देत मूळ कार्डवरील पत्ता मिळवून देण्याची विनंती केली. नियमांमुळे तसे करता येत नसल्याचे प्रतिनिधीने सांगितले. तथापि, जुना आधार क्रमांक मिळण्यासाठी तक्रार नोंदवून घेतली.

जुने कार्ड मिळविण्यासाठी लागणारा ओटीपी व इतर तांत्रिक सहकार्य महाआयटी जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रमोद ठाकूर यांनी केले. मुंबईच्या आधार कार्यालयाशी संपर्क साधण्यात आला. या प्रयत्नांमुळे जुना आधार क्रमांक प्राप्त झाला. त्याआधारे अकोल्यातील तहसील कार्यालयात ऑपरेटर सतीश पडगण यांच्या सहकार्याने पुढील प्रक्रिया पार पाडण्यात आली. आधार प्रणालीत स्कॅनिंग, बालकाच्या डोळ्यांचे छायाचित्र घेऊन पूर्ण माहिती मिळविण्यात आली.


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# दिशा समितीची बैठक : कामे वेळेत पूर्ण करा- खा. अनुप धोत्रे

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्र शासनाच्या विविध योजनांतून जिल्ह्यात रस्ते, स्वच्छता व पाणीपुरवठ्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जातो. अशी कामे रखडता कामा नयेत. ती वेळेत पूर्ण व्हावीत. आवश्यक कामांचे वेळेत प्रस्ताव द्यावेत, तसेच केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांना करून द्यावा, असे निर्देश खासदार अनुप धोत्रे यांनी आज येथे दिले.



जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) समितीची बैठक खासदार श्री. धोत्रे यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार नितीन देशमुख, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, महापौर शारदा खेडकर, जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक दिगंबर लोखंडे, महापालिकेचे आयुक्त सुनील लहाने यांच्यासह सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत २०२१-२२ दरम्यान मंजूर असलेले १०५.३१ किमी लांबीचे ९ रस्ते बांधकामाचे काम पूर्ण झाले. २०२२-२३ मधील १०.७० किमी लांबीचे काम पूर्ण झाले. अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण नसल्याच्या तक्रारी येतात. अशा कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश खासदार श्री. धोत्रे यांनी दिले. हिवरखेड येथील नदीत मर्यादेबाहेर उत्खनन झाल्याची तक्रार आहे. ही बाब गंभीर असून, त्याची तपासणी करावी व अनधिकृत खनन झाले असल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, असेही निर्देश देण्यात आले.

मुर्तिजापूर रेल्वे स्थानकावरील वाहन पार्किंग, लिफ्ट आदी सुविधा त्वरित सुरू कराव्यात. ग्रामीण भागातील टपाल कार्यालयांच्या इमारतींची पाहणी व्हावी. आवश्यक सुधारणा कराव्यात. टपाल खात्याच्या महत्वपूर्ण सुविधा खातेदारांसाठी उपलब्ध करून द्याव्यात. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने महामार्गाची कामे होत असताना नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. 'बीएसएनएल'कडून ग्रामीण भागात आवश्यक ठिकाणी मोबाईल टॉवर उभारून संपर्कयंत्रणा सुरळीत करावी, असे निर्देश खा. धोत्रे यांनी दिले. ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत. कामे अपूर्ण किंवा प्रलंबित राहिली की नव्याने सुरू करताना दुरूस्तीसाठी पुन्हा खर्च होतो. स्वच्छ भारत अभियानात जिल्ह्यात सार्वजनिक स्वच्छता गृहांची गरज तपासा. त्यानुसार प्रस्ताव देण्याचे निर्देश त्यांनी दिले. स्वच्छ भारत मिशन शहरी योजनेत २१ कोटी १७ लक्ष रु निधीतून बायोमायनिंग प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. उगवा परिसरात रात्रीच्या वेळी दुर्गंधी पसरत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्याबाबत आवश्यक उपाययोजना व्हाव्यात. रेल्वे लाईनअंतर्गत कामांत पारस येथील अंडरपासमध्ये पावसाळ्यात पाणी साचते. तिथे ड्रेनेजची व्यवस्था व्हावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

#### खा. अनुप धोत्रे यांच्या अध्यक्षतेत विविध योजना व विकासकामांचा आढावा

# गोरस भंडारची प्रतिमा मलिन करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्याची ओळख बनलेल्या आणि देशभरात आपल्या दर्जेदार उत्पादनांमुळे विश्वास संपादन केलेल्या गोरस भंडारवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) केलेली कारवाई आकसापोटी व संस्थेची प्रतिमा मलिन करणारी असल्याचा आरोप करत संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे केली आहे.

शेतकऱ्यांच्या निवेदनानुसार, ३१ मे रोजी एफडीए अधिकाऱ्यांनी गोरस भंडार येथे धाड टाकून दूध व दुग्धजन्य पदार्थांचे नमुने घेतले. मात्र नमुन्यांचा अहवाल येण्यापूर्वीच उत्पादन व विक्रीवर बंदी घालून माल सील करण्यात आला. कोणताही अंतिम निष्कर्ष समोर नसताना अशी कठोर कारवाई करणे अन्यायकारक असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.महात्मा गांधी यांच्या विचारधारेतून उभारलेल्या गोरस भंडारने गेल्या नऊ दशकांपासून ग्राहकांचा विश्वास जपला आहे. गोरसपाकसह विविध उत्पादनांनी देश-विदेशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. आजवर संस्थेच्या उत्पादनांबाबत कोणतीही गंभीर तक्रार नसताना अचानक झालेल्या या कारवाईमुळे ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून दुग्ध व्यवसायावर मोठे संकट कोसळल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



शेतकऱ्यांचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना निवेदन

गोरस भंडारला दूध पुरवणाऱ्या शेतकऱ्यांचा दूध खरेदीचा मार्ग बंद झाल्याने हजारो लिटर दूध कुठे विकायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.नैसर्गिक आपत्ती, वाढते चारा-दाण्याचे दर आणि महागाईमुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर ही कारवाई म्हणजे मीठ चोळण्याचा प्रकार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.सूडबुद्धीने व आकसापोटी कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी गजानन लोखंडे, सुहास पाटील, सचिन टाके, दिलीप कोकाटे, बाबाराव गायकवाड यांच्यासह अनेक दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# खा. अमर काळे यांच्या मागणीला पेट्रोल पंप चालकांचा पाठिंबा

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात निर्माण झालेल्या डिझेल-पेट्रोल टंचाईच्या पार्श्व भूमीवर शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्या साठी खा. अमर काळे यांनी केलेल्या मागणीला वर्धा व अमरावती जिल्ह्यातील पेट्रोल पंप चालक संघटनांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

ट्रॅक्टरधारक शेतकऱ्यांना कॅनमध्ये दररोज ४० लिटर डिझेल उपलब्ध करून देण्यास संघटनांनी सहमती दर्शविली असून त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

खा. अमर काळे यांनी वर्धा व अमरावती जिल्हा प्रशासनाला पत्र देऊन पेट्रोलियम नियम २००२ अंतर्गत शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल देण्याची परवानगी देण्याची मागणी केली होती.

शेतीची कामे सुरू असताना ट्रॅक्टर घेऊन पेट्रोल पंपांवर जाण्यास वेळ व



## शेतकऱ्यांना कॅनमध्ये ४० लिटर डिझेल देण्यास तयार

अतिरिक्त इंधन खर्च होत असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले होते.अमरावती जिल्हा पेट्रोल पंप चालक संघटनेने या मागणीची दखल घेत शासन आणि जिल्हाधिकाऱ्यांना पाठिंबा दर्शविणारे पत्र पाठविले आहे. तसेच वर्धा जिल्हा पेट्रोल पंप चालक संघटनेचे अध्यक्ष आकाश शेंडे यांनीही शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून देण्यास संघटनेची तयारी असल्याचे सांगितले.मात्र, खासदारांनी पत्र दिल्यानंतरही प्रशासनाकडून अद्याप कोणताही स्पष्ट निर्णय घेण्यात आलेला नसल्याने शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, पेट्रोल पंप चालक संघटनांनी सामाजिक बांधिलकी जपत घेतलेल्या भूमिकेचे शेतकरी संघटनांकडून स्वागत करण्यात येत असून प्रशासनानेही तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी पुढे येत आहे. शेतकरी हितासाठी घेतलेल्या पुढाकारा बद्दल अनेक शेतकऱ्यांनी खा. अमर काळे यांचे आभार मानले आहेत.

# कार्यकारी अभियंता टिकले अडचणीत?

**वर्धा/ जनमाध्यम**

सार्वजनिक बांधकाम विभागातील १४ कोटी रुपयांच्या कथित आर्थिक अनियमिततेप्रकरणी वर्धा येथील कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले यांच्याविरोधात कारवाईची शक्यता निर्माण झाली असून त्यांच्यावर निलंबनाची टांगती तलवार असल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे. मानवाधिकार संघटनेचे राज्याध्यक्ष मंगेश चोरे (पाटील) यांनी या प्रकरणी मुख्य अभियंत्यांकडे तक्रार दाखल केल्यानंतर शासन स्तरावर हालचालींना वेग आल्याची माहिती समोर आली आहे.तक्रारीनुसार, नागपूरस्थित डी. पी. जैन कंपनीला संबंधित रस्त्याचे काम पूर्ण न करताच तब्बल १४ कोटी रुपयांचे देयक अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आरोपांची गंभीर दखल घेत विभागीय चौकशीची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र चौकशीदरम्यान आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देणे आणि चौकशीला अपेक्षित सहकार्य करणे याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नसल्याचे सूत्रांनी सांगितले.दरम्यान, शासनाकडून कार्यकारी अभियंता टिकले यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती आहे. या नोटिशीत 'आपल्याला निलंबित का करण्यात येऊ नये तसेच चौकशी प्रक्रियेत सहकार्य न केल्यामुळे संबंधित प्रकरणात आपला सहभाग असल्याचे का समजू नये असे प्रश्न उपस्थित करण्यात आल्याचे कळते.विशेष म्हणजे, ज्या डी. पी. जैन कंपनीला देयक अदा करण्यात आल्याचा आरोप आहे, त्या कंपनीकडून आता संबंधित रस्त्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे काम पूर्ण होण्यापूर्वीच देयके मंजूर करण्यात आली होती का, असा प्रश्न उपस्थित होत असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.या प्रकरणाबाबत कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले यांची भूमिका जाणून घेण्यासाठी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे या आरोपांबाबत त्यांची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही.मानवाधिकार संघटनेने या प्रकरणातील सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच कार्यकारी अभियंता टिकले यांचे निलंबन आणि संबंधित कंपनीविरुद्धही योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# पुलगाव नगरपरिषदेने १५ दिवसांत पुणे केले घरगनणेचे काम

**वर्धा/ जनमाध्यम**

जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम राज्यात सुरू आहे. वर्धा जिल्ह्यातील पुलगाव नगर परिषदेने नगरपरिषद क्षेत्रातील घरगणनेचे काम शंभर टक्के पुर्ण केले. केवळ १५ दिवसातच घरगनणेचे काम पूर्ण करणारी पुलगाव राज्यातील पहिली नगरपरिषद ठरली आहे.

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या नेतृत्वात व निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली पुलगाव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रभारी अधिकारी विजयकुमार लालूराम आश्रमा यांनी मागील तीन महिन्यापासून जनगणनेचे उत्कृष्ट नियोजन केले होते. त्यामध्ये शहराचे विभाजन करून ब्लॉक प्‌ॅमध्ये तयार करणे, आवश्यक असलेले मनुष्यबळ निवडणे, त्यांना प्रशिक्षण देणे, जनगणनेबाबत जनजागृती करणे, वरिष्ठ कार्यालयासोबत वेळोवेळी संपर्क साधून समस्यांचे निराकरण करणे, असे विविध प्रकारचे नियोजन व तयारी करण्यात आली होती.पुलगाव शहरातील जनगणनेकरिता शहराचे एकूण ४१ ब्लॉक प्‌ॅमध्ये



## सर्वप्रथम काम पुर्ण करणारी राज्यातील पहिली नगरपरिषद

विभाजन करण्यात आले होते. त्याकरिता ४१ प्रगणक व ४ राखीव प्रगणक असे एकूण ४५ प्रगणक तसेच त्यांच्यावर पर्यवेक्षणाकरिता ८ पर्यवेक्षक व २ मास्टर ट्रेनर असे एकूण ५५ कर्मचारी नेमण्यात आले होते. यादरम्यान शहरातील जवळपास ९ हजार ५०० घरांचा सर्वे पूर्ण करण्यात आला. याकरिता जनगणना विभागाचे मुकेश गोंडाने यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच नगर परिषदेचे चैतन्य कन्नाके, सचिन करवाडे, संचित डाखोरे यांनी सुद्धा सहकार्य केले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनामध्ये जनगणनेचे सूक्ष्म नियोजन केल्याने व वेळोवेळी आढावा घेणे व नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट काम केल्याने घरगणनेचे काम नियोजित वेळेच्या १५ दिवस अगोदरच पूर्ण करणे शक्य झाले, असे मुख्याधिकारी तथा चार्ज अधिकारी विजयकुमार लालूराम आश्रमा यांनी सांगितले.

**पुलगाव नपचे काम कौतुकास्पद - जिल्हाधिकारी**

पुलगाव नगरपरिषदेने घरगनणेचे काम अतिशय उत्तमपणे पूर्ण केले आहे. अगदी कमी कालावधीत १५ दिवस अगोदरच घरगनणा पुर्ण केली. जिल्ह्यातील इतर नगरपरिषद तसेच ग्रामीण भागात देखील गणणेचे काम उत्तमपणे सुरु आहे. जनगणणेच्या कामात नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांच्या सहयोगाने जिल्ह्यात उत्तम काम होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी व्यक्त केला आहे.

# रंगांतून उमटला व्यसनमुक्तीचा संदेश



## एनसीसी छात्र सैनिकांची तंबाखूविरोधी जनजागृती

**देवळी/ जनमाध्यम**

जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त २१ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, वर्धा अंतर्गत स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील एनसीसी भवन येथे 'तंबाखूच्या सेवनाने आरोग्यावर होणारे दुष्परिणाम' या विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तंबाखूमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला छात्र सैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

तंबाखूच्या व्यसनामुळे होणारे कर्करोग, हृदयरोग, श्वसनविकार आणि इतर गंभीर आजार विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पक चित्रांतून प्रभावीपणे साकारले. रंग, रेषा आणि संदेश यांच्या माध्यमातून त्यांनी तंबाखूमुक्त जीवनाचे महत्त्व अधोरेखित करत समाजाला व्यसनमुक्तीचा संदेश दिला.स्पर्धेत कॅडेट वैष्णवी चौधरी हिने प्रथम, कार्पोरल आरती मरघडे हिने द्वितीय तर कॅडेट रश्मी मडावी हिने तृतीय क्रमांक पटकावला. चांद पोहणे व वंशिका इकोणकर यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आले. सर्व विजेत्यांचा एनसीसीच्या स्मृतीचिन्हांनी गौरव करण्यात आला. परीक्षक म्हणून सार्जंट वैष्णवी कन्नाके हिने जबाबदारी पार पाडली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी जागरूक राहून समाजात व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. सोनारे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी आणि उत्तरदायित्वाची भावना अधिक बळकट होत असल्याचे सांगितले.यावेळी तामिळनाडू राज्यातील उटी येथे आयोजित 'ऑल इंडिया निलगिरी ट्रेक' यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या सार्जंट स्नेहा मडकाम हिचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे संचालन अंडर ऑफिसर कल्याणी लिखार हिने केले, तर कॅडेट साक्षी पारिसे हिने आभार मानले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी एनसीसी छात्र सैनिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

# खड्ड्यांत हरवला विकास; हिंगणा-हिंगणघाट मार्गावर वाहनधारक त्रस्त

**सेलू/ जनमाध्यम**

हिंगणा-हिंगणघाट मार्गाला नुकताच महामार्गाचा दर्जा मिळाला असला तरी प्रत्यक्षात हा रस्ता वाहनधारकांसाठी 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. किन्ही येथील नायरा पेट्रोल पंपापासून घोराड गावापर्यंतचा नव्याने बांधलेला रस्ता अनेक ठिकाणी खचला असून जागोजागी मोठमोठे खड्डे आणि नाले निर्माण झाले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत

## महामार्ग बनला अपघातांचा अड्डा

धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर झाली आहे की, दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना अचानक समोर येणाऱ्या खड्ड्यांमुळे अपघातांचा सामना करावा लागत आहे. अनेक वाहनांचे नुकसान होत असून प्रवाशांना पाठीचे, मानेचे आणि मणक्याचे विकार जडत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. महामार्गाचा दर्जा मिळालेल्या रस्त्याची ही अवस्था पाहून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणीसुद्धा केली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

त्यामुळे प्रशासन नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याची भावना परिसरात निर्माण झाली



आहे.नव्याने बांधलेल्या रस्त्याची अल्पावधीतच झालेली दुरवस्था पाहता कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. कंत्राटदार आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, रस्त्याची तात्काळ दुरुस्ती न झाल्यास हिंगणी व घोराड परिसरातील नागरिक तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे.

प्रशासनाला जाग आणण्यासाठी आणखी किती अपघात आणि किती जीवांचा बळी जावा लागणार असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महामार्गाच्या नावाखाली जनतेला खड्ड्यांचा वारसा देणाऱ्या यंत्रणांनी तरी आता जागे होण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# वारकऱ्यांना लागले आषाढी वारीचे वेध


**सेलू/ जनमाध्यम**

आषाढी एकादशी जवळ येताच वारकरी संप्रदायात भक्ती, उत्साह आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी निघणाऱ्या संत केजाजी महाराज पायदळ दिंडीच्या प्रस्थानाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, २६ जून रोजी दिंडी घोराड येथून पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. त्यामुळे परिसरातील वारकऱ्यांना आतापासूनच आषाढी वारीचे वेध लागले आहेत.हरिदास महाराज माहाकळकर यांच्या प्रेरणेतून आठ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या पायदळ दिंडीचे यंदाचे नववे वर्ष आहे. दिंडीचे वीणेकरी वसंत तडस तर चोपदार धनराज झाडे हे जबाबदारी सांभाळत आहेत. दिंडीत सहभागी होण्यासाठी अनेक वारकऱ्यांनी नावनोंदणी केली असून, नियोजनाची कामे वेगाने सुरू आहेत.सुमारे एक महिन्याच्या या पदयात्रेचा कालावधी २६ जून ते २३ जुलै असा राहणार आहे. पंढरपूर येथे पोहोचल्यानंतर अंतिम आठ दिवस दिंडी मुक्कामी राहणार असून, श्री संत केजाजी महाराज मठ, शेगाव घुमाला येथे निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. संत केजाजी नामदेव महाराज चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.दिंडीतील वारकऱ्यांच्या निवासासाठी विविध गावांतील धर्मशाळा, मंदिरे आणि शाळांची व्यवस्था करण्यात आली असून, भोजनाची जबाबदारी अन्नदात्यांनी स्वीकारली आहे. वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून समता, बंधुता आणि भक्तीचा संदेश देणारी चळवळ असल्याचे वारकरी भाविकांनी सांगितले.घोराड, सेलू, पवनार मार्गे निघणारी ही दिंडी सावंगी, रत्नापूर, कळंब, यवतमाळ, आर्णी, हिंगोली, औंढा, परभणी, गंगाखेड, परळी, पाथरी, बार्शी, वडशिंगी, शेटफळ आदी ठिकाणी मुक्काम करत २३ जुलै रोजी पंढरपूरात दाखल होणार आहे.

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन

**वर्धा/ जनमाध्यम**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त वर्धा शहरातील वंजारी चौक येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अहिल्याबाई



होळकर यांच्या कार्याचा यावेळी गौरवपूर्वक स्मरण करण्यात आला.या कार्यक्रमात वर्धा सोशल फोरमचे अध्यक्ष डॉ. अभ्युदय मेघे यांनी अहिल्याबाईंच्या लोककल्याणकारी प्रशासनाचा आदर्श आजच्या पिढीने घेण्याची गरज असल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यातून समाजसेवा, न्यायप्रियता आणि विकासाची प्रेरणा मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी फोरमचे सक्रिय सदस्य शालिग्राम टाकसांडे यांच्यासह पुण्यश्लोक अहिल्याबाई स्मृती मंदिराचे अध्यक्ष सुनील धाबाने, उपाध्यक्ष संदीप पुणसे, कोषाध्यक्ष गजेंद्र कापडे, सचिव दिलीपराव उपासे, संचालक सतीश धोपटे, शशांक हुलके, संचालिका योजना ढोक, मीनाताई पुणसे तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याला उजाळा देण्यात आला. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य आणि आदर्श शासनपद्धती यांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# व्यसनमुक्ती, संस्कार आणि अध्यात्माचा संदेश



**वर्धा/ जनमाध्यम**

सामाजिक जीवनात अध्यात्माची जोड माणसाला धैर्यवान, सहनशील आणि सकारात्मक बनवते. त्यामुळे प्रत्येकाने सद्गुणांचा अवलंब करून सद्गुरूची प्राप्ती करण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन व्यसनमुक्ती सम्राट हभप मधुकर खोडे महाराज यांनी केले.

अधिक मासानिमित्त माऊली परिवारातर्फे आयोजित शिदोरी काला व सत्संग कार्यक्रमात ते बोलत होते. विठ्ठल-रुक्मिणी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला वर्धा शहरासह पंचक्रोशीतील भाविकांची मोठी उपस्थिती लाभली.खोडे महाराज म्हणाले, आजची युवा पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनांच्या विळख्यात अडकत आहे. व्यसन हा समाजाला लागलेला कलंक असून त्याचे समूळ उच्चाटन होणे काळाची गरज आहे. प्रत्येक कुटुंबाने व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. समाज सुशिक्षित झाला असला तरी सुसंस्कृत होणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी आई-वडिलांची सेवा, चांगले संस्कार आणि सत्कर्म यांचे महत्त्व विशद केले.नामस्मरण, सात्विक जीवनशैली आणि धर्माभिमान जपण्याचे आवाहन करताना त्यांनी स्त्री सन्मान, दानधर्म आणि सकारात्मक विचारसरणी यांचे महत्त्व अधोरेखित केले. विविध दृष्टांत आणि उदाहरणांमधून त्यांनी श्रोत्यांना प्रभावी मार्गदर्शन केले.यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उपस्थित राहून मधुकर खोडे महाराजांचे समाजप्रबोधनाचे कार्य अतुलनीय असल्याचे गौरवोद्गार काढले. त्यांच्या हस्ते माजी न्यायमूर्ती दीपक भेंडे यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला गुरुकुंज मोझरीचे सर्वाधिकारी प्रकाश वाघ, हभप रामेश्वर खोडे महाराज, पवन महाराज खोडे, भाजप जिल्हा महामंत्री अशोक कलोडे, माजी न्यायमूर्ती दीपक भेंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बबन सोनूरकर, उल्हास लोहकरे, सतीश वडाळकर, राजुभाऊ मेंडुले, अनिल गोरे आणि घनश्याम ठाकरे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनील भांदककर यांनी केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १८५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# बदलत्या हवामानाला सामोरे जाण्यासाठी शास्त्रीय शेतीचे नियोजन गरजेचे

## खरीप हंगामापूर्वी बीजप्रक्रिया, आंतरपीक, जैविक खतांचा वापर व जलसंवर्धनावर भर द्या

### आम्ही बालाजी फाउंडेशनचे आवाहन

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** बदलते हवामान, अनिश्चित पाऊस, वाढते तापमान तसेच कृषी निविष्ठांच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आगामी खरीप हंगामाचे शास्त्रीय व दूरदृष्टीपूर्ण नियोजन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आम्ही बालाजी फाउंडेशन, महाराष्ट्रचे संचालक सुजित मुंदडा यांनी केले आहे. हवामान बदलाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानासह शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

फाउंडेशनचे ॲग्रोनॉमिस्ट विवेक चर्जन व त्यांच्या तज्ज्ञ टीमच्या मार्गदर्शनानुसार, धामणगाव रेल्वे व परिसरातील सोयाबीन, कपाशी आणि तूर उत्पादक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व तयारी, बीजप्रक्रिया, सरी-वरंबा (BBF) पद्धत, आंतरपीक लागवड, मृदा आरोग्य सुधारणा, सेंद्रिय खतांचा वापर, पाणी संवर्धन आणि हवामानाधारित नियोजन यावर विशेष भर द्यावा.

तज्ज्ञांच्या मते, सोयाबीन + तूर तसेच कपाशी + तूर यांसारख्या आंतरपीक पद्धती हवामानातील अनिश्चिततेमुळे निर्माण होणारा धोका कमी करण्यास मदत करतात. यासोबतच शेतातील प्रत्येक थेंब अडविणे, बांधबंदिस्ती, तण नियंत्रण, सेंद्रिय कर्ब वाढविणे, शेततळ्यांची निर्मिती आणि पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन या उपाययोजना भविष्यातील हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात.

जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढल्यास पाणी धारण क्षमता सुधारते आणि कमी पावसाच्या परिस्थितीतही पिकांना अधिक काळ ओलावा उपलब्ध राहतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत तसेच विविध जैविक घटकांचा संतुलित वापर करण्यावर भर द्यावा, असेही तज्ज्ञांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन, भारत सरकार, कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, हवामान विभाग आणि कृषी संशोधन संस्था शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहनही फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

आम्ही बालाजी फाउंडेशन, महाराष्ट्र मागील पाच वर्षांपासून धामणगाव रेल्वे तालुक्यात शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. कृषी मार्गदर्शन शिबिरे, मृदा व जलसंवर्धन जनजागृती, कृषी तंत्रज्ञान प्रसार, महिला सक्षमीकरण, वृक्षारोपण, शेतकरी मेळावे आणि विविध सामाजिक उपक्रमांद्वारे फाउंडेशन सातत्याने कार्यरत आहे.

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांपर्यंत वैज्ञानिक, सत्य आणि उपयुक्त माहिती पोहोचविण्यासाठी विविध मार्गदर्शन कार्यक्रम, माहिती मोहिमा आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनने दिली.


या उपक्रमात अर्जुन भंडारी,विवेक चर्जन, विवेक मोरे, निखिल उमप, सुयोग देशमुख, प्रतिक चरडे, कुणाल भगत, यश रीठे तसेच फाउंडेशनचे सर्व कार्यकर्ते व सहकारी सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

# दर्यापूर तालुक्यात पावसाची दमदार हजेरी

## -उकाड्यापासून नागरिकांना थोडा दिलासा

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात व तालुक्यात आज (१ जून ) ला सायंकाळी सात ते साडे सात वाजताच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली असून उकाड्याने त्रस्त नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गेल्या एक ते दोन महिन्यांपासून तापमानात मोठी वाढ झाल्याने नागरिक हैराण झाले होते. मात्र आज झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना दिलासा मिळाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

यासोबतच शेतकरी वर्गासाठीही हा पाऊस समाधानकारक मानला जात असून पेरणीपूर्व मशागतीसाठी तो लाभदायक ठरणार असल्याचे मत शेताकरी वर्गाने व्यक्त केले आहे. पावसामुळे तालुक्यात काही प्रमाणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून येत्या काही दिवसांत मान्सून सक्रिय होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**विज सेवा सुरळीत ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांची धडपड-** आज सायंकाळी पावसाचे दमदार आगमन झाले. काही ठिकाणी वाऱ्याचा वेगही वाढल्याने विद्युत वाहिन्यांमध्ये किरकोळ बिघाड निर्माण झाला. काही भागात विद्युत तारा तुटल्याच्या घटना घडल्या तर काही ठिकाणी विजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने मेंटेनन्सची कामे हाती घेण्यात आली.

अशा परिस्थितीत महावितरण विभागाचे कर्मचारी भर पावसातही रस्त्यावर उतरून वीज सेवा पूर्ववत करण्यासाठी धडपड करताना दिसून आले. मुसळधार पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता कर्मचाऱ्यांनी विविध भागात जाऊन विद्युत दुरुस्ती व मेंटेनन्सची कामे केली.

नागरिकांना अखंडित विजपुरवठा मिळावा, कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी महावितरण कर्मचारी तत्परतेने काम करत असल्याचे चित्र दर्यापूरात पाहायला मिळाले.

# मोर्शीतील शिबिरात १२१ रक्तदात्यांनी केले रेकॉर्ड ब्रेक रक्तदान

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड शाखा मोर्शी, तालुका पॉवर ऑफ मिडिया,निमा शाखा मोर्शी तथा रक्तदाता संघ मोर्शीच्या वतीने आज दि.१ मे रोजी मंगलदीप सभागृह छत्रपती शिवाजी चौक मोर्शी येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरात एकूण १२१ रक्तदात्यांनी रेकॉर्ड ब्रेक रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले.यावेळी मनीषा प्रमोद पोतदार, पल्लवी गोहाड,सौ.जयश्री मोरे,दीपमाला रावणगावकर,विशाखा यावले,शितल मंत्री, प्रेमा चिखले, वैशाली गाडवे या महिलांनी रक्तदान करून आपले सामाजिक दायित्व निभावले.जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून अनेक वेळा अपघात झाल्यास रुग्णाला रक्ताची नितांत गरज भासते तसेच शस्त्रक्रिया करतांना रुग्णाला रक्त मिळविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. प्रसंगी मोठी किंमत देऊन रक्त विकत आणावे लागते. जिल्ह्यामध्ये रक्तदान शिबिरे कमी होत असल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. अपघात घडल्यास वेळेवर रक्त उपलब्ध होत नसल्यास रुग्णाला प्राणास मुकावे लागते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन मोर्शी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या वतीने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्त संकलनासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ.प्रफुल्ल पेदाम,मिलिंद तायडे, योगेश पानझाडे, संगीता गायधने,जयवंत गावंडे,प्रवीण कळस्कर, उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील साक्षी मिश्रा,शेख युसूफ,सुजित वानखेडे, कांचन राऊत,अक्रम सौदागर,नागोराव खडसे उपस्थित होते. यावेळी राज्य संक्रमण परिषदेच्या मार्गदर्शन सूचनेनुसार प्रत्येक रक्तदात्यांचा यथोचित सत्कार करण्यात



आला. मनीषा प्रमोद पोतदार यांनी वीस वेळा रक्तदान केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.रक्तदान शिबिराला मोर्शी रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,कोषाध्यक्ष डॉ.प्रमोद पोतदार, कार्याध्यक्ष तथा जयदेवा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष मिलिंद ढोले,सचिव गजानन हिरुळकर, सहसचिव अजय पाटील मोर्शी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे दिलीप यावलीकर,अनंत नवघरे, अशोक नवघरे,प्रदीप पाचाडे,श्रीधर वडुरकर, सुभाष कराळे,सतीश चौधरी,पियुष तिडके, आदित्य मालानी,शैलेंद्र चौरे, अपर्णा यावलीकर, मोहिनी देशमुख,दिलीप दंडाळे,प्रणित यावलीकर, स्वप्निल यावले,चेतन अमृतकर,वैशाली फरतोडे, आरती गेडाम,कांचन सातपुते,वैभव काळे,कनक बेहरे,ऋषिकेश भेले,श्वेता दरवाई,भाग्यश्री अंबाडकर, कुणाल काळे,दीप्ती सुपले, वैष्णवी गायकी,दिनेश नेहारे,राजेश कळमकर, सुरज लोहे,नयन फुटाणे, अर्चना इंगळे,आरती चौधरी,वैभव सायखेडे, वैशाली गाडवे,विधान चव्हाण,मनीष राऊत,रश्मी आखरे उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला नगरसेवक रवींद्र गुल्हाने, सागर पाटील,श्रणीत राऊत,सौरभ कुकडे,संदीप कुबडे,संजय गारपवार, विकास पाटील,विजय सोमवंशी,एड.पवन अकर्ते,सुहास ठाकरे, विनय शेलुरे,प्रदीप तडस,नरेंद्र सोनागोते,श्रीकांत सिनकर,किशोर बहादुरकर,डॉ.सागर श्रीराव,डॉ.विजय वानखडे, डॉ.गजानन पाटील,डॉ. कुलदीप यावले,डॉ.साचिन कोरडे,डॉ.नामदेव रडके इत्यादींनी सदिच्छा भेट दिली.

# आ.बच्चू कडू यांचा सत्कार



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील रायपुरा येथील आदर्श हनुमान संस्थान येथे शिवसेना शिंदे गटाचे विधानपरिषद आमदार बच्चू कडू यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला .यावेळी विधानपरिषद आमदार बच्चू कडू यांचे शाल , श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन प्रहारचे माजी नगरसेवक संजय तट्टे मित्र मंडळीकडून सत्कार करण्यात आला. आमदार कडू यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,शिवसेना पक्षाचा विस्तार ,सामान्य माणसाच्या हक्कासाठी, हितासाठी लढा सुरूच राहणार आहे.

यावेळी शिवसेना शिंदे गटाचे ,प्रहार पक्षाचे पदाधिकारी ,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. माजी नगरसेवक संजय तट्टे ,दीपक धुळधर ,माणिक देशपांडे,गजानन लखपती,मोहन सातपुते ,नितीन आखुड,वैभव बोबडे आदी उपस्थितीत होते.

# जिल्ह्यात जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७ जणांवर दंडात्मक कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावतीद्वारे ३१ मे या जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यंदा हा दिवस 'आकर्षणाचा मुखवटा उतरवूया: तंबाखू आणि निकोटीनच्या व्यसनाचा प्रतिकार करूया' या संकल्पनेवर साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, जिल्ह्यातील शासकीय कार्यालये, बस स्थानक व रेल्वे स्टेशन येथे पोस्टर्स लावून जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान तंबाखू नियंत्रण कायदा (कोटपा-२००३) अंतर्गत दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या ७ व्यक्तींकडून १ हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच नागपुरी गेट पोलिसांच्या मदतीने पठाणपुरा व चांदणी चौक परिसरातील अवैध तंबाखू विक्रेत्यांवर धाड टाकून, १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू विकणाऱ्या आणि शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात विक्री करणाऱ्या १० विक्रेत्यांवर कारवाई करत २ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अशा प्रकारे एकूण १७ व्यक्तींकडून ३ हजार ३०० रुपयांची दंडवसुली झाली.

जनजागृतीचा भाग म्हणून रुग्णालयांमध्ये रुग्ण, नातेवाईक, आशा सेविका आणि बचतगटांच्या महिलांसाठी विशेष गटचर्चा व समुपदेशन सत्रे घेण्यात आली. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वच्छता वाहनांवरून आणि सोशल मीडियाद्वारे जनजागृती संदेश प्रसारित करण्यात आले. औद्योगिक व परिचर्या संस्थेतील विद्यार्थ्यांना तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली, तर रुग्णालयात रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. आकाशवाणी अमरावतीवरून जिल्हा सल्लागार डॉ. मंगेश गुजर यांचे मार्गदर्शन प्रसारित झाले. आज, दि. १ जून रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात सर्वांना तंबाखू मुक्तीची शपथ देऊन 'व्यसनाला नकार, आरोग्याचा स्वीकार' या आवाहनासह मोहिमेचा समारोप करण्यात आला.

# नांदगाव बाजार समिती उपसभापती विलास सावदे यांचा राजीनामा



**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती विलास पाटील सावदे यांनी २३ मे रोजी उपसभापती पदाचा राजीनामा बाजार समितीचे सभापती डॉ. राजेंद्र पांडे त्यांच्याकडे सादर केला. तेव्हा सभापती यांनी राजीनामा स्वीकारून मंजूर केला व ३० मे रोजी झालेल्या संचालकाच्या सभेमध्ये मंजुरात घेण्यात आली.

पुढील कार्यवाहीसाठी सहायक निबंधक सहकार, यांचे कार्यालयाकडे अहवाल पाठविण्यात आला. संचालकाच्या निवडणुकीनंतर ठरल्याप्रमाणे उपसभापती पदाचा पहिल्या टर्म चा कालावधी पूर्ण झाल्यामुळे उपसभापती सावदे यांनी सदर राजीनामा दिला तेव्हा आगामी होणाऱ्या दुसऱ्या टर्म साठी उपसभापती पदासाठी होणाऱ्या निवडणुकीत ठरल्याप्रमाणे प्रमोद ठाकरे यांना उपसभापती पदाची संधी मिळते की वेळेवर नवीनच राजकीय समीकरण जुळते काय हे पाहणे औसुक्याचे ठरणार आहे.

# श्रीक्षेत्र जहागीरपूर हनुमान मंदीरात दर्शन व अन्नदानाचा हजारो भाविक घेतात लाभ

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** विदर्भातील लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र जहागीरपूर येथील श्री महारुद्र मारुती मंदिरामध्ये गेल्या १७ मे २०२६ पासून सुरु झालेल्या अधिक मास व पुरुषोत्तम मास पर्वावर दर्शना करिता व दररोज सुरू असलेल्या अन्नदान क्षेत्रामध्ये हजारो भाविक अन्नदानाचा लाभ घेतात.

यावर्षी अधिक मास हा मे महिन्यात येवून उन्हाचा तडाखा असताना सुद्धा भाविक मात्र बऱ्याच दूरदूर गाड्यांनी येवून



दर्शन तर घेतात व दररोज सुरु असणाऱ्या श्री. महारुद्र मारुती संस्थानच्या भक्त निवास येथे सुरु असलेल्या अन्नदानाचा हजारो भाविक लाभ घेत आहेत. तसेच येत्या १५ जून पर्यंत असणाऱ्या अधिक मास मध्ये पंचक्रोशीतील व परिसरात दुर दुरून येणाऱ्या भाविकांसाठी मंदीराचे विश्वस्त मंडळ तसेच संस्थानचे कर्मचारी आणि सेवा देणारे सेवेकरी सुद्धा भाविक भक्तांची सोय करतात.

# माजी सैनिक व वीरपत्नींच्या पाल्यांना शैक्षणिक साहाय्य

## ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, वीरपत्नी आणि त्यांच्या पाल्यांसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार केंद्रीय सैनिक बोर्डाची (केएसबी) अधिकृत ऑनलाईन संकेतस्थळ प्रणाली सुरू झाली आहे. पात्र माजी सैनिक आणि वीरपत्नींच्या पाल्यांना सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे शैक्षणिक साहाय्य मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इयत्ता पहिली ते बारावी तसेच बीए, बी.कॉम आणि बी.एस्सी या पदवी अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यांचे अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आहे. सर्व पात्र माजी सैनिक आणि विधवा भगिनींनी आपल्या पाल्यांचे ऑनलाईन फॉर्म विहित मुदतीत भरावेत आणि फॉर्म भरून झाल्यानंतर त्याची प्रिंट व संकेतस्थळावर अपलोड केलेली सर्व संबंधित कागदपत्रे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

वाहेद खान उर्दु डी.एड्.कॉलेज, अमरावती

माध्यम: उर्दु (अल्प संख्यांक कायम विना अनुदानित )

डी.एल.एड्. प्रथम वर्ष प्रवेश सुचना २०२६-२७

प्रवेश पात्रता अटी:

३. ओळख इ. १० वी किंवा १२ वी उर्दु माध्यमातून उत्तीर्ण असावा.

| | | |
|---|---|---|
| अ. | विज्ञान शाखा | ५०% |
| ब. | कला | [illegible] |
| क. | वाणिज्य शाखा | [illegible] |
| ड. | [illegible] | [illegible] |

स्थळ :- वाहेद खान उर्दु डी. एड्.कॉलेज

प्राचार्य
वाहेद खान उर्दु डी.एड्.कॉलेज, अमरावती

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळून येते की, ॲड. उमेश त्र्यंबकराव शिंदे (वय ३७ वर्षे, रा.काजणा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) हे अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयात वकिली व्यवसाय करत असून, त्यांची भारत सरकारव्दारे नोटरी पब्लिक (Notary Public) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा भारत सरकार नोटरी नोदणीकृत क्रमांक ३१६१२ हा आहे.
दिनांक ०१/०४/२०२६ रोजी दुपारच्या सुमारास सुंदरलाल चौक, फ्रेजरपुरा अमरावती येथील एका हॉटेल परिसरातून अज्ञात इसमाने ॲड.उमेश त्र्यंबकराव शिंदे यांची वकिली व नोटरी साहित्य बॅगेतून चोरुन नेले आहे. सदर बॅगेतून खालील अधिकृत शासकीय व कायदेशिर दस्तऐवज व साहित्य होते :
**१. भारत सरकारचे अधिकृत नोटरी रजिस्टर (नोंदवही )**
**२. नोटरीचे गोल व चौकोनी शिक्के (एकुण १४ नग,ज्यावर नोंदणी क्रं.३१६१२ अंकित आहे )**
**३. शासकीय नोटरी तिकिटे व पावती पुस्तक**
सदर चोरीच्या घटनेबाबत फ्रेजरपुरा पोलीस ठाणे, अमरावती येथे रितसर तक्रार नोदविण्यात आली असून, पोलिसांनी **एन.सी.आर.क्रमांक ११३२/२०२६, दिनांक २९/०५/२०२६** अन्वये अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. तसेच याबाबीची अधिकृत माहिती मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अमरावती आणि मा.नोटरी सेल, नवी दिल्ली यांनाही सादर करण्यात आली आहे.
**सावधानतेचा इशारा व जाहीर प्रकटन :** या जाहीर नोटीसव्दारे तमाम शासकीय, निमशासकीय कार्यालये, बॅंका, न्यायालये, मुद्रांक विक्रेता आणि सर्वसामान्य नागरिकांना सुचित करण्यात येते की, दिनांक ०१/०४/२०२६ रोजी किंवा त्यानंतर ॲड.उमेश त्र्यंबकराव शिंदे यांच्या नावाच्या वरील चोरीस गेलेल्या नोटरी शिक्क्यांचा, रजिस्टरचा किंवा स्वाक्षरीचा वापर करुन जर कोणताही दस्ताऐवज, प्रतिज्ञापत्र, मुखत्यारपत्र (Power of Attorney) किंवा करारनामा तयार करण्यात आला असल्यास, **तो पूर्णपणे बेकायदेशिर, बनावट आणि शून्य (Null & Void) समजण्यात यावा.**
भविष्यात अशा चोरीच्या साहित्याचा वापर करन होणा-या कोणत्याही फसवणुकीला, गुन्ह्याला किंवा कायदेशिर वादाला **ॲड. उमेश त्र्यंबकराव शिंदे हे वैयक्तीक किंवा कायदेशिररित्या अजिबात जबाबदार असणार नाहीत,** याची सर्वांनी नोद घ्यावी.
सदर चोरीस गेलेले साहित्य कोणास आढळून आल्यास किंवा त्याबाबत काही माहिती मिळाल्यास खालील मोबाईल क्रमांकावर अथवा फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनला संपर्क साधावा.

**दिनांक ०१/०६/२०२६**
**स्थळ : अमरावती**

**जाहिरकर्ता**
**ॲड. उमेश त्र्यंबकराव शिंदे**
( भारत सरकार नियुक्त नोटरी अधिकारी)
चेबर नं.२२६ जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.९२९/२०२६
**अर्चना व इतर -वि- निरंक**
पुढील ता.२४.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** **Archana Ravindra Kalkonde**
Age 55 Yrs. Occu.: Household
R/o Near Patwari Bhavan, Jogalekar Plot, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **श्याम केशवराव गार्गे** हे दिनांक 04.03.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अर्चना विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्चना विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# २० वर्षांपासून तहानलेल्या वस्त्यांचा संयम सुटला

## ८ दिवसांत पाणी द्या, अन्यथा उग्र आंदोलन, शिवसेना शहरप्रमुख यांचा इशारा

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

शहरातील अंजनगाव-टाकरखेडा रोडवरील नवीन रहिवासी वस्त्यांमध्ये गेल्या २० वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. वारंवार निवेदने देऊनही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून केवळ आश्वासनेच मिळत असल्याने, आता नागरिक आक्रमक झाले आहेत.

येत्या ८ दिवसांत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना शहरप्रमुख मुन्ना (योगेश) इसोकार यांनी जीवन प्राधिकरण प्रशासनाला दिला आहे.

रेल्वे लाईन पलीकडील भागात वसलेल्या साईधाम नगर, सरस्वती नगर, गजानन नगर आणि स्वप्न नगरी या परिसरांत गेल्या दोन दशकांपासून नागरिक वास्तव्यास आहेत.

या चारही वस्त्यांमध्ये मिळून ३ हजारांहून अधिक लोकसंख्या आहे. मात्र, दुर्दैवाची बाब अशी की, २० वर्षे उलटूनही या परिसरात पिण्याच्या पाण्याची पाइपलाईन पोहोचलेली नाही.

येथील रहिवाशांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून, मूलभूत सुविधेसाठी त्यांना प्रशासनाचे



उंबरठे झिजवावे लागत आहेत.या पाणीप्रश्नाबाबत वस्तीतील नागरिकांनी आजवर अनेकदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासन, स्थानिक आमदार आणि खासदारांना निवेदने दिली. प्रत्येक वेळी 'लवकरच काम होईल' असे आश्वासन देण्यात आले, मात्र प्रत्यक्ष कृती शून्य राहिली. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.नागरिकांच्या या त्रासाची दखल घेत शिवसेना शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील नागरिकांनी जीवन प्राधिकरण कार्यालयावर धडक दिली. '२० वर्षे वाट पाहिली, आता सहन करणार नाही,' अशा शब्दांत त्यांनी आपला रोष व्यक्त केला. प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा देण्यात आला आहे की, जर पुढील ८ दिवसांच्या आत या वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची ठोस व्यवस्था झाली नाही, तर शिवसेना स्टाईलने उग्र आंदोलन केले जाईल.

यावेळी मुन्ना इसोकार यांच्यासह सचिन अब्रुक, सचिन वाघमारे, संदीप देशमुख, शाम बर्वे, रामहरी खोकले, अजिंक्य ठाकरे, कल्पेश भोपळे, तुषार चव्हाण यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त


### विद्यापीठात शिवराज्याभिषेक सोहळा

**अमरावती -** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' आणि 'एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ जून,२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता विद्यापीठ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृह येथे 'शिवराज्याभिषेक सोहळा' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.




प्रसिध्द व्याख्याता ॲड. वैष्णवी हागोणे ह्या 'छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य आणि व्यवस्थापन कौशल्य' यावर व्याखानाच्या माध्यमातून प्रकाश टाकतील.शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यापीठातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

# स्वरांजली म्युझिक अकॅडमीच्या किड्स म्युझिक समर कॅम्पचा समारोप



**नागपूर -** स्वरांजली म्युझिक अकॅडमी, नागपूर आयोजित किड्स म्युझिक समर कॅम्प २०२६ चा समारोप विद्यार्थ्यांच्या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहपूर्ण वातावरणात झाला.या समर कॅम्पचे आयोजन स्वरांजली म्युझिक अकॅडमीच्या संस्थापक व प्राचार्या नेहा इंदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.संगीत, नृत्य, नाट्य व व्यक्तिमत्त्व विकास अशा विविध कलात्मक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.समारोप कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून वामन भिवगडे उपस्थित होते.

तसेच नृत्य विभागासाठी इंद्राणी इंदूरकर यांनी अतिथी मार्गदर्शक म्हणून कार्य केले. तर नाट्य विभागासाठी ॲड. आसावरी रामेकर जोशी यांनी विशेष मार्गदर्शन केले. सीए श्रेयस इंदूरकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे विचार मांडले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'स्वागतम् कृष्णा' या गीतावर आकर्षक नृत्य सादर केले. तसेच विविध ॲक्शन साँग्सद्वारे उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'हम बच्चे वसुंधरा के' या नाटिकेतून पर्यावरण संवर्धनाचा आणि पृथ्वीप्रती असलेल्या जबाबदारीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आराध्या पात्रीकर हिने अत्यंत आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी पद्धतीने केले. तिच्या उत्कृष्ट निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली.उपस्थित पालक व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे तसेच स्वरांजली म्युझिक अकॅडमीच्या उपक्रमांचे भरभरून कौतुक केले.

या समर कॅम्पमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला असून त्यांचा आत्मविश्वास, शिस्त आणि सर्जनशीलता वृद्धिंगत होण्यास मदत झाली.कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने आणि उपस्थितांच्या भरभरून प्रतिसादात झाली.

# गणवेश योजनेतील बदलामुळे मुख्याध्यापकाची तारांबळ

## ऐनवेळी निकष बदलले-पहील्या दिवशी गणवेश देण्यास अडचणी

**अमरावती/का.प्र.**

समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश योजनेतील निकष ऐनवेळी बदलल्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती व मुख्याध्यापकांची तारांबळ उडणार असून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत गणवेश पुरविले जातात.

त्यासाठीचा निधी शाळा व्यवस्थापन समितीला उपलब्ध करून दिला जातो व शाळा व्यवस्थापन समितीमार्फत गणवेश खरेदी करून विद्यार्थ्यांना ते मोफत वितरित केले जातात. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश देता यावे या उद्देशाने अनेक मुख्याध्यापकांनी यापूर्वीच्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे निविदा प्रक्रियेबाबतची कार्यवाही सुरू केली आहे. परंतु मागील शासन निर्णयातील तरतुदीत शासनाने



ऐनवेळी बदल करण्याबाबतचा शासन निर्णय नुकताच निर्गमित केला आहे. त्यानुसार एका गणवेशाचा रंग ठरविण्याचा अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला असला तरी दुसरा गणवेश मात्र स्काऊट गाईडच्या धरतीवर शासनाने ठरवून दिलेल्या रंग व रचनेनुसार शिवून घ्यावा लागणार आहे. विशेष म्हणजे दरवर्षीप्रमाणे थेट पुरवठादाराकडून गणवेश खरेदी न करता, शाळा व्यवस्थापन समितीने गणवेशाचे कापड खरेदी करून स्थानिक महिला बचत गटाकडून विद्यार्थ्यांच्या मापानुसार शिवून घ्यायचे आहे. स्थानिक स्तरावर असे बचत गट उपलब्ध न झाल्यास शाळा व्यवस्थापन समितीने ठराव घेऊन प्रमाणित केल्यानंतरच बाहेरच्या बचत गटाकडून गणवेश शिवून घेता येणार आहे.शासनाच्या अशा प्रकारच्या धरसोडपणाच्या धोरणाबाबत शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व पालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. शिलाईचे न परवडणारे दर प्रति गणवेश रुपये ३०० प्रमाणे शाळा व्यवस्थापन समितीला निधी उपलब्ध करून दिला जातो, परंतु गेल्या अनेक वर्षांपासून यामध्ये एक रुपयाचीसुद्धा वाढ करण्यात आली नाही. चांगल्या दर्जाचे कापड खरेदी करून गणवेश उपलब्ध करून देण्यामध्ये अडचणी निर्माण होतात, त्यामुळे गणवेशाच्या दरामध्ये वाढ करण्याची गरज असल्याचे मुख्याध्यापकांचे म्हणणे आहे व विद्यार्थ्यांची संख्या तसेच यंत्रसामग्रीची कमतरता यामुळे गावातील बचत गट गणवेश शिवण्याकरिता तयार होत नाहीत, काही गावांत तर असे बचतगटच उपलब्ध नाही.

# मोहन ठोंबरे कडून वाचनालयास पुस्तके भेट



**कुऱ्हा -** शहीद भगतसिंग सार्वजनिक वाचनालय कुऱ्हा, येथे ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांची ३०१ जयंती साजरी करण्यात आली.त्या निमित्ताने येथील मोहन ठोंबरे यांच्याकडून वाचनायलास पुस्तके भेट देण्यात आली.या कार्यक्रमा वेळी वाचनालयाचे अध्यक्ष विवेक बिंड, सचिव अमोल भागवत आणि प्रमुख पाहुणे कुऱ्हा पोलिस स्टेशन चे अनिल निंघोट, विलास ढोले,ग्रंथपाल दीपक पोकळे,सागर माकोडे, मनिषा खंगार, तनुश्री सुरसाऊत, वैष्णवी घोडे, निशा दमाय, चेतन चौधरी, आदेश आमले, अजय चिरडे, रोहन दारोकार, सचिन निस्ताने, सुशील निस्ताने भावेश काळबांडे, यश निस्ताने, दर्शन बावणे, आकाश दारोकार, सौरभ दारोकार, हर्षल दारोकार, ऋषिकेश बोबडे,अक्षय नारळे, अक्षय अक्षय अंबाडकर प्रसाद शिंगाणे आकाश इंगोले, सागर शिंगाडे तसेच अभ्यासिकेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आदी उपस्थित होते.

# विभागीय आयुक्तालयात अहिल्यादेवी यांना अभिवादन

**अमरावती -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी नायब तहसिलदार संजय मुरतकर, नाझर शरद लोणारे यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.



# वाढत्या उष्णतेच्या नियंत्रणासाठी वृक्ष लागवड मोहीम राबवा !

## पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

राज्यासह विदर्भात दिवसेंदिवस तापमानात मोठी वाढ होत असून त्याचा परिणाम सर्वसामान्य जनजीवनावर होत आहे.वाढते तापमान,पाण्याची टंचाई,प्रदूषण आणि बदलते हवामान या समस्यांवर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड मोहिम राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेतला पाहिजे,असे मत विविध स्तरातून व्यक्त होत आहे.

शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वृक्षांची संख्या कमी होत चालली असून काँक्रीटीकरणामुळे उष्णतेचे प्रमाण वाढत असल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे प्रत्येक गाव, शहर, शाळा, महाविद्यालय, सार्वजनिक संस्था आणि शासकीय कार्यालय परिसरात वृक्ष लागवड करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. शहरातील




अमरावती यवतमाळ रोड, चांदूर रेल्वे रोड,पहूर रोडच्या दोन्ही बाजूने निंबाची वडाची पिंपळाची झाडे लावणे आणि ती जगविण्यासाठी त्यांना दररोज पाणी देणे तसेच शहरातील सर्व लेआऊट मधील ओपन स्पेस मध्ये आणि जिथे मोकळी जागा असेल तिथे सुद्धा मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.दरवर्षी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवड मोहिमा राबवल्या जातात, मात्र अनेक ठिकाणी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. लावलेल्या झाडांचे संगोपन आणि संवर्धन याकडे दुर्लक्ष होत नसल्याने अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत.त्यामुळे केवळ झाडे लावणे नव्हे तर त्यांचे संगोपन, नियमित पाणीपुरवठा आणि संरक्षण यावरही विशेष भर देणे आवश्यक आहे.तसेच प्रशासनाने विविध विभागांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करावी, पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे आणि युवक, सामाजिक संस्था तसेच स्वयंसेवी संघटनांना सहभागी करून मोठ्या प्रमाणावर लोकचळवळ उभी करावी,अशी मागणीही उत्तम ब्राम्हणवाडे यांनी केली आहे.वाढत्या तापमानाचा फटका शेती, आरोग्य आणि पाणी व्यवस्थेवरही होत असल्याने पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे. वृक्ष लागवड ही केवळ मोहीम न राहता ती लोकचळवळ बनली तरच भविष्यातील पर्यावरणीय संकटांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल, असा विश्वास सुद्धा उत्तम ब्राम्हणवाडे आणि नगरसेवक वासुदेव लोखंडे यांनी व्यक्त केला आहे.

## आज श्री हव्याप्र मंडळाच्या जलतरण तलावावर

# रंगणार चित्तथरारक क्रीडा कवायती



**अमरावती/का.प्र.**

भारतीय पारंपरिक आणि आधुनिक क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करत देश-विदेशात 'भारतीय गुरुकुल' अशी ओळख निर्माण करणाऱ्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने क्रीडा क्षेत्रात आणखी एक आगळावेगळा उपक्रम साकारला आहे.

मंडळाच्या ऐतिहासिक उन्हाळी शिबिराच्या निमित्ताने मंगळवार, दि. २ जून रोजी सायंकाळी ६ वाजता मंडळाच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या जलतरण तलावावर देशातील एकमेव पाण्यावरील चित्तथरारक क्रीडा कवायतींचे आयोजन करण्यात आले आहे.श्री हव्याप्र मंडळाच्या जलतरण विभागाच्या वतीने आयोजित या विशेष कार्यक्रमात जलक्रीडांचे विविध रोमांचक आणि नेत्रदीपक प्रकार सादर करण्यात येणार आहेत. यामध्ये सिंक्रोनाईज्ड स्विमिंग, वॉटर पोलो, स्विमिंग ड्रिल्स यांसह अंधारामध्ये पाण्यावर सादर होणाऱ्या जळत्या मशालींचे थरारक प्रात्यक्षिक आणि फाउंटन (कारंजा) शो हे विशेष आकर्षण ठरणार आहे.

कौशल्य, शिस्त, समन्वय आणि धाडस यांचा संगम असलेल्या या कवायती प्रेक्षकांना जलक्रीडांचा एक वेगळाच अनुभव देणार आहेत. विशेष म्हणजे, अशा प्रकारच्या पाण्यावरील कवायतींचे आयोजन देशात केवळ श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातच केले जात असल्याने या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्तरावरील वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे.गेल्या अनेक दशकांपासून मंडळ विविध पारंपरिक व आधुनिक क्रीडा प्रकारांच्या माध्यमातून युवकांमध्ये शारीरिक सुदृढता, राष्ट्रभक्ती आणि संस्कारांची जोपासना करत आहे. त्याच परंपरेचा भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या जलक्रीडा कवायती क्रीडाप्रेमींसाठी पर्वणी ठरणार आहेत.

# श्रीकृष्ण कथा, महानुभाव पंथीय मेळावा

**वरूड -** तालुका ग्रामीण महानुभव सेवा मंडळ व श्री चक्रधर मंडळ, वरूडच्या सौजन्याने प्रभाकर कपाटे यांच्या वाणीतून श्रीकृष्ण कथा तसेच महानुभाव पंथीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक श्री श्रद्धा राधा सेलिब्रेशन हॉल येथे ३ ते ७ जून दरम्यान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३ जून रोजी सकाळी ८ वाजता दुचाकी रॅलीने या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या भक्तिमय सोहळ्याला महानुभाव पंथातील असंख्य विद्वातरत्नांचे मार्गदर्शन व प्रबोधन लाभणार असून सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज सीरसोलीकर यांचे कीर्तन तसेच विशाल जोगदेव यांचा भक्तिसंगीत (मेरे चक्रधर मेरे शाम) कार्यक्रम होणार आहे. ३ जून रोजी प्रसन्न मुनी उर्फ नागराज बाबा यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. ६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता शहरातून महानुभाव ग्रंथाची व विशेषांची मिरवणूक निघणार असून ७जून रोजी सकाळी ९ वाजता पंचअवतार पूजनाने या सोहळ्याची सांगता होईल. विनयामुनी उपाख्य वैरागी बाबा पंजाबी, उज्वल डहाके, सतीश देशमुख, नरेंद्र पवाडे, प्रकाश डहाके, आशिष कांडल कर, अशोक डहाके, श्याम गावंडे, गोपाल वडनेरकर, उज्वल वानखडे, रोशन डहाके, गणेश सातपुते, मनोज खसारे, अनिल राऊत, राजेंद्र काकडे, प्रवीण लुंगे, देवेंद्र शेळके, बाबाराव खाडे आदीच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे.

जनमाध्यम
जाहिरात व बातम्या करिता संपर्क
चांदूर रेल्वे तालुका प्रतिनिधी
सुभाष जैन- ९७६६६७०२६१

# परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक ते ब्राह्मणसभा परिसरात अतिक्रमण हटाव मोहीम



**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर नगर परिषदेकडून १ जून रोजी परतवाडा शहराच्या मुख्य वर्दळीच्या ठिकाणी एक मोठी अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली. परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक ते ब्राह्मणसभा मंगल कार्यालय या दरम्यान असलेल्या रस्त्यावरील बेकायदेशीर बांधकामे आणि अतिक्रमणे हटवण्यात आल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

यावेळी अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी ,बांधकाम विभागाचे अभियंता, नगर रचना,पोलिस विभागाचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

परतवाडा शहरातील वाहतुकीची कोंडी रोखण्यासाठी आणि मुख्य मार्ग मोकळे करण्यासाठी अचलपूर नगर परिषदेकडून संबंधित अतिक्रमणधारकांना १५ ते २० दिवस आधीच कायदेशीर नोटीस बजावल्या होत्या. नोटिशीची मुदत संपल्यानंतर काल १ जून रोजी प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात झाली. या मोहिमेचे नेतृत्व अचलपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी धीरज गोहाड यांनी केले. यावेळी पालिकेचे अभियंता मनीष शर्मा, अभियंता शुभम काळे आणि परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के हे आपल्या पथकासह उपस्थित होते. जयस्तंभ चौक येथील लाकुड बाजाराला लागून असलेल्या मुख्य मार्गावरील दुकानांनी रस्त्यावर केलेले अतिक्रमण अचलपूर नगर परिषदेच्या पथकाने जेसीबीच्या साहाय्याने हटवले. मुख्य मार्गावरील कारवाईनंतर हे पथक ब्राह्मणसभा मंगल कार्यालयाच्या परिसराकडे वळले. या मुख्य मार्गावर झालेल्या कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले आहे. मात्र ही मोहीम सातत्याने सुरू राहावी, अशी मागणी जोर धरत आहे. पुन्हा एकदा या ठिकाणी अतिक्रमण होऊ नये, यासाठी नगर परिषदेने संबंधित ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून रहदारी सुलभहोईल, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**अचलपूर नगर परिषदेच्या वतीने परतवाडा शहरात नियमित अतिक्रमण हटाव मोहीम सुरू राहणार आहे. ज्या ठिकाणी नगर परिषदेच्या जागेवर शौचालय आणि बाथरूम परिसरामध्ये दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. त्या ठिकाणचे अतिक्रमण न्यायालयाच्या निर्णयानंतर निश्चितच हटविण्यात येईल.**

**धिरज गोहाड,**
मुख्याधिकारी न.प.अचलपूर.

# डोंगरावर पाहणी, टेबलाखाली मांडवली?

## कारवाईची तलवार म्यानात कशी गेली; पाहणीनंतर 'सगळं आलबेल' झाल्याची चर्चा




**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** गाजीपूर-रुदाळीच्या डोंगररांगांमध्ये सध्या खडकांपेक्षा प्रश्नच जास्त दिसत आहेत. काही दिवसांपूर्वी अचानक दाखल झालेल्या अधिकृत पथकाच्या पाहणीने खाण आणि क्रशर व्यावसायिकांच्या गोटात खळबळ उडाली होती. नियमभंग, प्रदूषण, परवानग्या आणि विविध कायदेशीर बाबींवर बोट ठेवत कठोर कारवाई होणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र पाहणी संपताच वातावरणात आलेला बदल आता नव्या संशयांना जन्म देत आहे.

स्थानिकांच्या मते, पाहणीच्या सुरुवातीला ज्या कडक शब्दांत प्रश्न विचारले जात होते, तेच अधिकारी काही तासांनंतर मवाळ भूमिकेत दिसू लागले. परिणामी, 'डोंगरावर पाहणी झाली खरी; पण निर्णय कुठे झाला?' हा प्रश्न आता गावागावांत चर्चिला जात आहे.

खाण परिसरातील धूळ अद्याप उडत आहे, यंत्रसामग्रीचे आवाज अद्याप घुमत आहेत आणि ज्यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते त्यांचे व्यवहारही फारसे विस्कळीत झाल्याचे चित्र दिसत नाही. त्यामुळे पाहणीचा उद्देश नेमका काय होता, याबाबत स्थानिकांमध्ये संभ्रम वाढत आहे.

### डोंगरावर प्रश्न, उत्तर मात्र वातानुकूलित खोल्यांत?

स्थानिक स्तरावर फिरणाऱ्या चर्चांनुसार, प्रत्यक्ष खाण क्षेत्रातील तपासणीपेक्षा काही बैठका अधिक महत्त्वाच्या ठरल्याची चर्चा आहे. पाहणीदरम्यान अनेक कागदपत्रे, परवानग्या आणि तांत्रिक बाबींवर चर्चा झाली. मात्र त्यानंतर परिस्थिती झपाट्याने निवळल्याचे चित्र दिसले. यामुळे गावकऱ्यांच्या मनात एक संशय डोके वर काढत आहे की; पाहणीचा निकाल डोंगरावर लागला की बंद दाराआड? अर्थात, या चर्चांना अधिकृत दुजोरा नाही. मात्र प्रश्न असा आहे की, जर सर्व काही नियमांनुसार होते, तर सुरुवातीला इतका कठोर सूर का होता? आणि जर गंभीर बाबी आढळल्या होत्या, तर पुढे त्याचे परिणाम का दिसले नाहीत?

### 'लाखमोलाचा सल्ला' अन् 'कारवाईतून सुटका'?

पाहणीनंतर संबंधित उद्योगांना काही सुधारणा करण्याच्या सूचना दिल्याची माहिती समोर येत आहे. परंतु स्थानिकांच्या मते, या सूचना इतक्या सौम्य होत्या की त्यामुळे मूळ प्रश्नांवर पडदा पडल्याची भावना निर्माण झाली. आदिवासी जमिनी, उत्खननाची व्याप्ती, पर्यावरणीय परिणाम, महसुली प्रश्न आणि परवानग्यांची वैधता यांसारखे गंभीर मुद्दे अजूनही कायम आहेत. त्यामुळे केवळ काही किरकोळ सुधारणा सुचवून इतक्या मोठ्या प्रकरणाची सांगता होऊ शकते का, असा सवाल उपस्थित होत आहे.

### कारवाईची भाषा, पण परिणाम शून्य?

सामान्यतः कोणत्याही गंभीर अनियमिततेची नोंद झाल्यास नोटिसा, दंड, परवाने स्थगित करणे किंवा अन्य दंडात्मक पावले अपेक्षित असतात. मात्र गाजीपूर-रुदाळी प्रकरणात पाहणीच्या गदारोळानंतर अशा ठोस हालचालींचा मागमूस अद्याप दिसून आलेला नाही. यामुळे स्थानिक पातळीवर एकच चर्चा रंगली आहे की, पाहणीचा उद्देश वास्तव शोधणे होता की केवळ उपस्थिती दाखविणे? अनेक ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, 'ज्या त्रुटी पाहणीत दिसल्या, त्या जर खरोखर गंभीर असतील तर कारवाई कुठे आहे? आणि जर गंभीर नव्हत्याच, तर एवढा गाजावाजा कशासाठी?'

### उपाययोजनांचा देखावा उभारण्याचा सल्ला

सदर ठिकाणी पाहणीदरम्यान संबंधित यंत्रणेला अनेक त्रुटी आढळून आल्या. या त्रुटी वरून गंभीर कारवाई होऊ शकते असे यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी संबंधिताला त्याच्या वातानुकूलीत कार्यालयात सांगत यावेळी सोडतो मात्र केवळ देखाव्यापुरत्या उपाययोजना तरी करा असा बहुमोलाचा सल्ला देत तेथून परत आपले कार्यालय गाठले असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त आहे.



# प्रवीण पोटे, निलेश विश्वकर्मा, बाजोरियांचे नामांकन दाखल

## -विधान परिषद निवडणुकीत महायुतीत फुट -हर्षजीत देशमुख यांनी भरला बी फॉर्म

**अमरावती/प्रतिनिधीः-** विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या नामांकन दाखल करण्याच्या अंतिम दिवशी महायुतीमधील अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. महायुतीत सर्व काही आलबेल नसल्याचे आज सोमवार १ जून रोजी स्पष्ट झाले. भाजपचे अधिकृत उमेदवार व माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी आज मोठ्या शक्तिप्रदर्शनासह आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, दुसरीकडे शिंदेसेनेचे परभणी-हिंगोलीचे माजी आमदार विप्लव (पान २ वर)






### प्रवीण पोटेंच्या विजयाचा दावा

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले की भाजपाचे प्रवीण पोटे १२०% निवडून येणार आहे. त्यांच्या विजयाचा आम्हाला विश्वास आहे. त्यांचा विजय निश्चित असल्याचे ते म्हणाले. प्रवीण पोटे यांनी सुद्धा विक्रमी मतांनी विजयाचा दावा केला आहे. ते म्हणाले, या मतदारसंघात माझे कौटुंबिक नाते जुळले आहे. त्यांच्या सुखदु:खात मी सोबत राहतो. महायुतीत कोणताही कलह नाही. भाजपचे एकही मत फुटणार नाही. याशिवाय इतर पक्षातील सदस्यांचीही मते मला मिळतील.

### विप्लव बाजोरिया यांनी वाढवले भाजपाचे टेन्शन-



परभणी-हिंगोली मतदार संघातून शिवसेना शिंदे गटातर्फे प्रबळ दावेदार असलेल्या माजी आमदार विप्लव बाजोरिया यांना उमेदवारी नाकारण्यात आल्यानंतर त्यांनी अमरावतीत धाव घेऊन अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. त्यामुळे आता महायुतीत धुसफूस होण्याची चिन्हे आहेत. त्यांनी भाजपाचे टेन्शन वाढवले आहे. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर पत्रकारांशी बोलताना विप्लव बाजोरिया यांनी सांगितले की, मी हिंगोली-परभणीचा आमदार होतो. पण, यावेळी अमरावतीत स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून मी निवडणूक लढवावी, अशी इच्छा येथील नगरसेवक असलेल्या मतदारांनी व्यक्त केली होती. त्यामुळे मी येथून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला आहे. या निवडणुकीत पक्षाचा संबंध नाही. मी थेट मतदारांच्या संपर्कात आहे. मी अपक्ष म्हणून निवडणूक लढत आहे. नगरसेवकांच्या आग्रहाखातर मी उमेदवारी दाखल केली आहे.

### अमरावतीत भरदिवसा धाडसी लूटमार!

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून दुचाकीस्वार फरार

### -अर्जुन नगर चौकातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात साखळीचोरी व लुटमारीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरदिवसा घडलेल्या धाडसी लुटीच्या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अर्जुन नगर चौक परिसरात दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी एका महिला कर्मचाऱ्याच्या गळ्यातील तब्बल १ लाख ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगलसूत्र हिसकावून पळ काढल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन नगर परिसरात राहणारी ३६ वर्षीय महिला एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालयात कार्यरत आहे. शुक्रवारी (२९ मे) तिची दुचाकी नादुरुस्त असल्याने ती भावासोबत कार्यालयात गेली होती. सायंकाळी कार्यालयीन कामकाज संपल्यानंतर (पान २ वर)

# तंत्रज्ञाची बदली दुर्भावनापूर्ण

## औद्योगिक न्यायालयाकडून बदलीस स्थगिती

**अमरावती/प्रतिनिधीः-** औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, अमरावती खंडपीठाने २६ मे रोजी आयआयएमसी अमरावती येथून आयआयएमसी दिल्ली येथे करण्यात आलेल्या संगणक तंत्रज्ञाच्या बदलीस स्थगिती दिली. तक्रारदाराने दुर्भावनापूर्ण कारवाईचा प्रथमदर्शनी खटला सिद्ध केल्याचे न्यायालयाने नमूद केले.

नुरूज्जमा बाबीउज्जमा शेख, वय ४२, आयआयएमसी अमरावती येथे २८ मे २०२४ पासून संगणक तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असून १ ऑगस्ट २०११ पासून तेथे काम करत आहेत. भारत विकास ग्रुप कंपनीने १२ मे २०२६ रोजी काढलेल्या बदली आदेशाला त्यांनी आव्हान दिले होते. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे सेवेत कायम करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेमुळे त्रास देण्यासाठीच ही बदली केल्याचा आरोप त्यांनी केला.

दिल्ली येथील नियुक्ती १,००० किमीहून अधिक दूर असल्याने २०,००० रुपये मासिक वेतनावर तेथे जाणे अशक्य असल्याचे शेख यांनी सांगितले. अमरावतीत वृद्ध आई, शाळेत जाणारी मुले आणि स्वतःला यकृताचा विकार व रक्तदाबाचा त्रास असल्याने अडचण (पान २ वर)

# वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसाने झोडपले

## झाडांची पडझड, जोशी मार्केटचे नुकसान





**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर आणि जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. सोमवारी दुपारी ३.३० वाजता अचानक वातावरणात परिवर्तन झाले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. वादळी वाऱ्या सह आलेल्या पावसामुळे शहरात काही ठिकाणी झाडे पडली तर शहरातील मध्य क्षेत्रात असणाऱ्या जे एनडी मॉल येथील शोकाच तुटून पडला तर महानगरपालिकेच्या पार्किंग मध्ये पाणी भरले होते. यामुळे प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या मान्सून पूर्व तयारीची पोलखोल झाली. अनेक भागात पावसाने (पान २ वर)

# वयोवृद्ध शेतकऱ्याला लुटणारा सराईत जेरबंद

## ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** वरुड तालुक्यातील राजुरा बाजार येथे खत खरेदीसाठी आलेल्या ७३ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याची फसवणूक करून त्यांच्याकडील १० हजार रुपये हिसकावून पळालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत अटक करून गुन्ह्याचा पर्दाफाश केला आहे. आरोपीकडून रोख रक्कम, मोबाईल व मोटारसायकलसह एकूण ५८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

माहितीनुसार, गाडेगाव येथील रहिवासी गणपत चिरकुटराव बांबल (वय ७३) हे २६ मे रोजी सकाळी खत खरेदीसाठी राजुरा बाजार येथे आले होते. त्यावेळी चेहऱ्यावर दुपट्टा बांधून आलेल्या एका युवकाने (पान २ वर)

# गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे व दोन तलवारींसह तिघे जेरबंद

### -अंजनगाव सुर्जी पोलिसांची कारवाई

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- शहरात अग्निशस्त्र आणि धारदार शस्त्रे बाळगून संशयास्पदरीत्या फिरत असलेल्या तीन तरुणांना अंजनगाव सुर्जी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून अटक केली. आरोपींकडून एक गावठी पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे, दोन धारदार तलवारी, तीन मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण सुमारे १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरात घडू शकणारा गंभीर गुन्हा वेळेत रोखण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, पिस्ता रंगाच्या सुझुकी ॲक्सेस मोपेडवरून तीन तरुण अग्निशस्त्रांसह शहरात फिरत असून त्यांचा एखादा गंभीर गुन्हा करण्याचा हेतू आहे. या माहितीची दखल घेत पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांनी तातडीने गुन्हे शोध पथकाला कारवाईचे आदेश दिले. पोलिसांनी परतवाडा रोडवरील हॉटेल पद्मश्री परिसरात सापळा रचला. काही वेळातच संशयित मोपेड दिसताच पथकाने काळेनगर (पान २ वर)

# शिक्षणसेवेच्या दोन दीपस्तंभांचा वैभवशाली अमृतमहोत्सवी गौरव

## भैय्यासाहेब देशमुख व दिलीपबाबू इंगोले यांचा भव्य सत्कार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींसह मान्यवरांची उपस्थिती







**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षणमहर्षी डॉ पंजाबराव देशमुख यांच्या समाजोन्नतीच्या आणि शिक्षणसेवेच्या विचारांचा वारसा पुढे नेत श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणारे अध्यक्ष हर्षवर्धन उपाख्य भैय्यासाहेब देशमुख आणि कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शिवपरिवाराच्या वतीने भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विशेष आयोजन समितीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेला हा सोहळा उत्साह, वैभव आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारा ठरला.

या नेत्रदीपक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री ना नितीन गडकरी, महाराष्ट्र राज्याचे मंत्री ना. डॉ. पंकज भोयर, खा. बळवंत वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी यांची उपस्थिती होती.

यावेळी आ.किरण सरनाईक, आ .संजय खोडके, आ.रवी राणा, आ.सुलभा खोडके, आ.प्रवीण तायडे, आ.राजेश वानखडे,प्रवीण पोटे, माजी मंत्री गुलाबराव गावंडे, किरणताई महल्ले, प्रिती बंड, सुरेखाताई ठाकरे, विलास इंगोले, नरेश पाटील, माजी खासदार अनंत गुढे यांच्यासह श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड .गजाननराव फुंडकर, ॲड .भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेश दादा खोटरे, प्रा .सुभाषराव बनसोड, सचिव डॉ .वि.गो ठाकरे यांच्यासह स्वीकृत सदस्य , प्राचार्य, प्राध्यापक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्यात भैय्यासाहेब देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या जीवनकार्याचा गौरव करणारे अनेक अभिनव उपक्रम राबविण्यात आले. डॉ.भाऊसाहेब देशमुख स्मृतिकेंद्र ते कार्यक्रमस्थळ अशी भव्य वारकरी गौरव दिंडी, जीवनकार्यावर आधारित ग्रंथाचे प्रकाशन, माहितीपट सादरीकरण, आकर्षक लेझर शो, विशेष सन्मानपत्र आणि भव्य पुष्पहार अशा विविध उपक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. या संकल्पनांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

अमरावती येथील पंचवटी चौकातील बी.पी.एड. महाविद्यालयाच्या विस्तीर्ण पटांगणात अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे प्रभावी आणि अर्थपूर्ण प्रास्ताविक आयोजन समितीचे सदस्य हेमंत वासुदेवराव काळमेघ यांनी केले. सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख आणि डॉ. राजेश मिरगे यांनी संयुक्तपणे केले, तर आभार प्रदर्शन संस्थेचे उपाध्यक्ष तथा आयोजन समितीचे अध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर यांनी केले.

या गौरव सोहळ्यासाठी विदर्भातील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, विविध शाळा-महाविद्यालयांचे आजी-माजी प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, डॉ. पंजाबराव देशमुख बँकेचे सभासद, सत्कारमूर्तींचे आप्तेष्ट आणि समाजातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भैय्यासाहेब देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांनी शिक्षण, समाजकारण आणि संस्थाविकासासाठी केलेल्या दीर्घकालीन योगदानाचा गौरव करणारा हा सोहळा श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या इतिहासातील एक संस्मरणीय आणि अभिमानास्पद पर्व ठरला. त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा भावी पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

दिलीप बाबू इंगोले यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, 'चांगल्या विचारधारेसोबत मी सदैव कार्य केले आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी आणि समाजहितासाठी केलेल्या कार्यात अनेकांचे सहकार्य लाभले. यापुढेही शेवटपर्यंत सर्वांच्या सहकार्याने याच विचारधारेसोबत राहून शिक्षण, समाजसेवा आणि संस्थाविकासाचे कार्य अधिक तीव्रतेने, अधिक समर्पित भावनेने पुढे नेण्याचा माझा प्रयत्न राहील.'

'तन, मन आणि धनाने समाजसेवा करणारी कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्वे संस्थेला भैय्यासाहेब देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या रूपाने लाभली आहेत. शिक्षण, समाजकारण आणि मानवसेवा यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. हा शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचाच आशीर्वाद आहे, असे मी मानतो.'

**-माजी सरन्यायाधीश भूषण गवई**

### कार्य निश्चितच अभिनंदनीय - ना.गडकरी

'शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी प्रज्वलित केलेला शिक्षणसेवेचा दीप अखंड तेवत ठेवत संस्थेची अधिकाधिक प्रगती साधणारे भैय्यासाहेब देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांचे कार्य निश्चितच अभिनंदनीय आहे. आज प्रगतीच्या शिखरावर विराजमान असलेली श्री शिवाजी शिक्षण संस्था त्यांच्या नेतृत्व, समर्पण आणि दूरदृष्टीची साक्ष देत आहे.'

हर्षवर्धन देशमुख यांनी उत्तरपर भाषणात सांगितले, 'अविचारी आणि विध्वंसक प्रवृत्तीच्या टीकेकडे लक्ष न देता, संस्थेच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आजीवन सभासदांच्या आदेशाने व मार्गदर्शनाने आजीवन संस्थेची सेवा करण्याची माझी तयारी आहे. संस्थेची गौरवशाली परंपरा आणि शिक्षणमहर्षी डॉ. भाऊसाहेब देशमुख यांचे विचार पुढे नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'